
बंदीहुकूम
हायकोर्टाचा आदेश
श्री. बर्वे यांचा रिट अर्ज
औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांचा हुकूम
लहान वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य
माणूस
८ मे १९७२ : पन्नास पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | ६ मे १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | एकूणपन्नास | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## सप्रेम नमस्कार....

□ श्री. रवींद्र पिंगे यांची शतपावली हे माणूसचं अलिकडचं खास आकर्षण आहे. त्यातही आजचा त्यांचा दुर्गाबाईंवरचा लेख अप्रतिम उतरला आहे. दुर्गाबाईंशी जवळून अगर दुरून ज्यांची ज्यांची थोडीफार ओळख आहे त्या सगळ्यांच्याच मनाला तो पटेल. खरं म्हणजे आम्हाला सगळ्यांना जे म्हणायचं होतं ते सांगण्याच काम श्री. रवींद्र पिंगे यांनी यांनी ए वन् केलं आहे. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

२८ एप्रिल, १९७२ — सौ. आशा भाजेकर, मुंबई

□ 'माणूस'च्या गेल्या अंकात श्री. रवींद्र पिंगे यांच्या शतपावलीत 'सत्कार' या मथळयाखाली माझ्यावर आलेल्या लेखात मुद्रणामुळे एक भयंकर चूक झालेली आहे. Indian Nation अस्तित्वात नाही असा अर्थाचा अनर्थ त्यात झाला आहे. इंडियन नेशन अस्तित्वात नाही असे कोण म्हणेल ? मी दोन शब्द पिंगे यांना सांगितले ते इंडियननेस व इंडियानिझम हे होत; इंडियन नेशन नव्हे. हे दोन शब्द मी तरी प्रथमच ऐकले व त्यावरून मला काही बोध झाला नाही, असा माझा म्हणण्याचा मुद्दा होता.

दुसरी चूक म्हणजे क्लॉइड स्ट्राउस ऐवजी क्लॉड लेव्ही-स्ट्राउस असे नाव आहे.

२९ एप्रिल, १९७२ — दुर्गा भागवत, मुंबई

[ नजरचुकीने हे मुद्रणदोष राहिले. क्षमस्व. —संपादक ]

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# मुंबई वरिष्ठ न्यायालय
# दि. २८ एप्रिल १९७२

सोमवार, दिनांक २४ एप्रिल १९७२ : माणूसतर्फे श्री. ग. माजगावकर व अनिल बर्वे यांचे, औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांनी बर्वे यांच्यावर बजावलेल्या हद्दपारी हुकुमाला आव्हान देणारे दोन रिट अर्ज मुंबई वरिष्ठ न्यायालयात दाखल.

प्रतिवादी क्रमांक एक : महाराष्ट्र शासन

प्रतिवादी क्रमांक दोन : आर. सि. सिन्हा<br>औरंगाबाद जिल्हाधिकारी<br>व जिल्हा न्यायाधीश.

वरिष्ठ न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. बी. एन्. देशमुख व श्री. एन्. डी. कामत यांनी अर्ज दाखल करून घेण्याचे वेळीच प्रतिवादीचे सरकारी वकील श्री. दळवी यांना बर्वे यांच्यावर बजावलेला हुकूम सरकारने मागे घ्यावा अशी सूचना केली.

सरकारी वकिलांनी विचारविनिमयासाठी तीन दिवसांची मुदत मागून घेतली.

अर्जदारांनी ताबडतोबीचा उपाय म्हणून औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांचा हुकूम स्थगित करण्यात यावा, या हूकमाच्या अंमलबजावणीस मनाई व्हावी अशी विनंती वरिष्ठ न्यायालयाला केलेली होती.

सरकारी वकिलांना दिलेली मुदत संपली व शुक्रवार, दिनांक २८ एप्रिलला अर्जदारांनी मागितलेल्या स्थगितीबाबतचे कामकाज वरिष्ठ न्यायालयात सुरू झाले.

औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांतर्फे एक खास दूत कागदपत्रे घेऊन न्यायालयात उपस्थित होता.

औरंगाबाद जिल्हाधिकारी, म्हणजेच सरकार, आपला हद्दपारीचा हुकूम मागे घेण्यास तयार नाही असे सरकारी वकिलांनी न्यायमूर्तींना सांगितले.

वर्वे यांची अटक, जामिनावरची सुटका इत्यादी अनेक मुद्दे सरकारी वकिलांनी उपस्थित केले.

वरीच उलटसुलट चर्चा झाली.

सरकार आपला हुकूम मागे घेणार नसेल, तर आपण सरकारचा, म्हणजे औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांचा, हुकूम स्थगित करणार आहोत, असे न्यायमूर्तींनी सरकारी वकिलांना स्पष्टपणे सांगितले.

निदान बर्वे यांनी पुन्हा जाण्यापूर्वी औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांना कळवावे, तशी अट बर्वे यांच्यावर घातली जावी अशी मागणी यावर सरकारी वकिलांकडून केली गेली.

ही मागणीही फेटाळण्यात आली.

वर्वे यांच्यावर अशा स्वरूपाची कोणतीही अट घालणे योग्य नाही, त्यांना औरंगाबादेत केव्हाही विनाअट जाण्यास मुभा राहील असे सांगून न्यायमूर्तींनी औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांचा १४ एप्रिल १९७२ चा हद्दपारी हुकूम स्थगित केला, त्याच्या अंमलबजावणीला मनाई केली.
(The operation of the order is suspended pending the final hearing of the petition)

वृत्तपत्र स्वातंत्र्याशी निगडीत असा हा प्रश्न असल्याने कोर्टात या क्षेत्राशी संबधित अशी इतरही काही मंडळी उपस्थित होती. वकील वर्गातही या प्रकरणात बरीच उत्सुकता दिसली.

'माणूस 'तर्फे ॲडव्होकेट जे. व्ही. प्रधान यांनी काम पाहिले.

बॅरिस्टर रामराव आदिक, बॅरिस्टर सिंघवी या ज्येष्ठ वकिलांचेही या प्रकरणी बहुमोल मार्गदर्शन 'माणूस 'ला लाभले.

—संपादक, माणूस

# क्रांतिकारी गनिमी युद्ध



युद्धशास्त्राचा एक अभ्यासक म्हणून युद्धकाळात बांगला देशला जाऊन आलेल्या एका विद्यार्थ्याचे बांगला देश मुक्तिवाहिनी आणि क्रांतिकारी गनिमी युद्ध या विषयावरचे विचार.

## जगदीश गोडबोले

स्वतंत्र भारताच्या पाव शतकाच्या इतिहासात अथवा तथाकथित भरतखंडाच्या अनेक शतकांच्या इतिहासात, भविष्यावर दूरगामी परिणाम करू शकेल असा निर्णायक लष्करी व राजकीय विजय आपण प्रथमच मिळविला आहे. आपल्या या दुर्दम्य आणि दुर्मिळ विजयाबद्दल आपला ऊर भरून येणे अगदी साहजिकच आहे. पण आपल्या सेनादलांच्या व राज्यकर्त्यांच्या यशाच्या नौबती झडत असताना वा 'मुक्ति-वाहिनीच्या' शूर-वीर सैनिकांच्या पराक्रमाचे पवाडे गात असताना, भवितव्याच्या दारी किणकिणणाऱ्या भयसूचक घंटानादाकडे आपले दुर्लक्ष होण्याचा फार संभव आहे. आपल्या सेनादलांच्या डावपेचांचे व मुजुरतगिरीचे कौतुक करत असतानाच, आपण व आपली सेनादले संभाव्य धोक्याला तोंड द्यायला मनाने व शस्त्रसामग्रीने कितपत तयार आहोत याचा आपण शोध घेतला पाहिजे. पराक्रमी मुक्ति-वाहिनी व तिची ध्येयनिष्ठा आदर्श तर खरीच, पण पुढे-मागे त्यातून उद्भवणारे वादळ आपल्याला कितपत मानवणार व झेपणार आहे, याचा ठोकताळा आपल्याला आत्ताच बांधावा लागेल. भावनांना दूर सारून व विचारांना प्रधान करून आपल्याला भविष्याचा वेध घ्यायचा आहे व त्याकरिता मुक्ती-वाहिनी, तिने लढविलेले 'गनिमी युद्ध' व त्याचे दूरगामी परिणाम यांचा आपण इथे विचार करणार आहोत.

मुक्ती-वाहिनी व तिने लढविलेले 'गनिमी युद्ध' यावद्दल अनेकांचे अनेक समज.

गैरसमज आहेत. अगदी मुक्ति-फौजेच्या बुरख्याखाली भारतीय सैनिकांनीच सर्व महाभारत घडविले इथपासून ते मुक्ति-वाहिनीने क्रांतिकारी गनिमी युद्धात नवा इतिहास घडवला इथपर्यंत जाणत्यांनी व नेणत्यांनी विचार व्यक्त केले आहेत. मुक्ति-वाहिनी किती परिणामकारक होती याचा विचार करण्यापूर्वी, मुक्ति-वाहिनीने लढविलेले युद्ध खरोखरीच क्रांतिकारी गनिमी युद्ध होते काय, याचा प्रथम तपास करायला पाहिजे. कारण साधे गनिमी युद्ध व स्वातंत्र्ययुद्ध यांची क्रांतिकारी गनिमी युद्धाशी गल्लत करणे नुसते चूकच नाही, तर धोकादायकही आहे.

क्रांतिकारी गनिमी युद्धात अगोदर आखणी-पेरणी होऊन मगच योग्य काळी व योग्य स्थळी शत्रूशी चकमकी झडायला सुरुवात होते, तर स्वातंत्र्य युद्धात सुरुवातीच्या उत्स्फूर्त चकमकींना नंतर संघटित करण्याचा प्रयत्न होतो. तसेच जीवनाचा प्रत्येक पैलू झपाटून टाकणारी एखादी विचार-धारा क्रांतिकारी गनिमी-युद्धाची जीवनज्योत असते, तर स्वातंत्र्ययुद्ध साधारणत: 'स्वातंत्र्याच्या उंबरठ्या' वर येऊन विसावते. त्यामुळेच जर्मन व जपानी आक्रमक सेनेविरुद्ध फ्रेंच मॅक्वीस, रशियन शेतकरी-कामकरी वा फिलिपाइन, ब्रह्मदेश इ. देशांत जनतेने दिलेले युद्ध, क्रांतिकारी गनिमी युद्ध नव्हते तर ते 'स्वातंत्र्ययुद्ध' वा संकुचित लष्करी दृष्ट्या 'गनिमी-युद्ध' होते. याउलट मार्शल टिटो, चेअरमन माओ व अंकल हो यांनी स्वातंत्र्यलढ्यातच क्रांतिकारी गनिमी युद्धाची बीजे पेरली व त्यामुळे त्यांची झुंज स्वातंत्र्याचे माप ओलांडून जीवनाचे सर्व कप्पे झपाटून राहिली. थोडक्यात काय, तर मुक्ति-वाहिनीने लढवलेले युद्ध खऱ्या अर्थाने क्रांतिकारी गनिमी युद्ध नव्हते, पण ते समजण्याकरता 'क्रांतिकारी गनिमी' युद्धाचे स्वरूप, विकास व विस्तार आदी गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत.

'क्रांतिकारी गनिमी युद्धाचे' थोडेफार 'समाजवादा'सारखे झाले आहे. समाजवादाची टोपी कोणीही डोक्यात घातली तरी त्याला ती फिट्ट बसते. नाझी भस्मासूर हेर हिटलर याचाही 'समाजवाद', साम्यवादी रशियाचाही समाजवाद व इतके दूरचे कशाला आपल्या शंकरराव मोहिते पाटलांचाही 'समाजवादच'! त्यामुळे समाजवाद म्हणजे नेमके काय हे जसे आपणा अज्ञजनांना कळत नाही, तसेच 'क्रांतिकारी गनिमी युद्ध' म्हणजे नेमके काय याचा उलगडा होत नाही. एखाद्याने ते समजून घेण्याचा प्रयत्न केलाच तर 'छोटे युद्ध' 'अघोषित युद्ध' 'घातपाती युद्ध', 'अपारंपारिक युद्ध' इ. शब्दांच्या आणि व्याख्यांच्या युद्धात तो सापडतो आणि त्यातून शिर सलामत ठेवून बाहेर पडणे मुष्किल होते. त्यामुळे प्रसिद्ध योद्धा हॅनिबॉल याच्याशी फॅबियस मॅक्सीमसने वा औरंगजेबाच्या प्रबळ सेनेला धनाजी-संताजीने दिलेला छुपा लढा, नेपोलियनच्या आक्रमक सेनेविरुद्ध स्पॅनिश शेतकऱ्यांनी दिलेली लढाई, पहिल्या महायुद्धकाळात तुर्की सेनेविरुद्ध लॉरेन्सच्या गनिमांनी दिलेली झुंज, दुसऱ्या महायुद्धात जपानी-जर्मन आक्रमक सेनेविरुद्ध फ्रान्स, रशिया युगोस्लाविया, रशिया, चीन, फिलिपाइनस्, मलाया, ब्रह्मदेश इ. देशात स्वातंत्र्य

योद्धांनी दिलेल्या लढाया; स्वदेशीय प्रस्थापित सरकारविरुद्ध चीन, क्यूबा, व्हिएटनाम, फिलिपीनीज, मलाया, इथे झालेले युद्ध; सिलोन, थायलंड, पश्चिम बंगाल, बिहार, आंध्र इ. ठिकाणी झडलेल्या चकमकी व जर्मन-जपानी सेनेच्या पिछाडीला दोस्तांच्या निवडक सैनिकांनी केलेले छुपे हल्ले इ. सर्वच लढाया ' गनिमी युद्धाच्या ' घोंगडी-खाली झाकण्यात येतात. त्यामुळे फॅबियस मॅक्सीमस, संताजी-धनाजी, लॉरेन्स, माओ, चे-गुव्हारा, कॅस्ट्रो, चाचा हो, जनरल जियाप, इतकेच काय पण कर्नल एडसन् रॉफ, ज. विंगेट, क. स्कोर्झेनी इ. सर्वच रथी-महारथी ' गनिमी योद्धे ' या एकाच पातळीला व पंक्तीला येऊन बसतात. पण त्यातल्या प्रत्येकाने लढलेल्या लढ्याचे स्वरूप व व्याप्ती आज पूर्णपणे विकसित झालेल्या ' क्रांतिकारी गनिमी युद्धाच्या ' (यालाच सरसकट ' गनिमी युद्ध ' असे सर्वजण म्हणतात. पण ग्यानबाची मेख ' क्रांतिकारी ' शब्द जोडल्याने स्पष्ट होईल अशी आशा आहे.) संदर्भात आपण समजून घेतली नाही, तर इतिहास आपल्याला कधीच क्षमा करणार नाही आणि सामर्थ्याचा गर्व वहाणाऱ्या अमेरिका-फ्रान्ससारख्या प्रबळ देशांना याबाबत इतिहासाने भयंकर धडा शिकविला आहे. अर्थात इतिहासापासून काहीच न शिकण्याचा आपला आजवरचा इतिहास आहे, तोच जर आपण चालू ठेवणार असलो तर अल्ला आपल्यावर रहम करो !

' भांडवलदार ' हा शब्द उच्चारल्यावर आपल्या डोळ्यांसमोर अमेरिका उभी रहाते, तसेच ' गनिमी युद्ध ' म्हटल्यावर एकदम रशिया वा चीन आठवतात. पण ' गनिमी युद्धा'चा शोध व उपयोग ही काही केवळ साम्यवाद्यांचीच मिरासदारी नव्हे, तर प्रत्येक देशात व प्रत्येक कालखंडात ते लढले गेले आहे. मात्र पूर्वीचे गनिमी युद्ध व आजचे क्रांतिकारी गनिमी युद्ध यांच्या स्वरूपात व व्याप्तीत कमालीचा फरक पडला आहे. खुद्द युद्धाचेच स्वरूप सरदार-दरकारांच्या लहान मोठ्या चकमकींपासून ते राष्ट्राची सर्व जीवनशक्ति शोषणाऱ्या सर्वंकष युद्धापर्यंत विकसित झालेले आहे. तसेच ' गनिमी युद्ध निव्वळ लष्करी डावपेच उद्दिष्टांपासून व दुबळ्यांच्या असहाय्य प्रतिकारापासून ते जीवनाच्या सर्व अंगांना झपाटणाऱ्या व त्यात मूलगामी बदल घडवू इच्छिणाऱ्या ' क्रांतिकारी गनिमी युद्धापर्यंत परिणत झाले आहे. म्हणजे हा बदल केवळ व्याप्तीचाच नाही तर स्वरूपाचा पण आहे. आज त्याच्याकडे केवळ लष्करी डावपेच-उद्दिष्टे यांच्या संकुचित दृष्टीतून पहाणे चूक ठरेल.

## गनिमीयुद्धाचा श्रीगणेशा

' गनिमी युद्ध ' (Guerrilla War) या शब्दाचा उगम ' ग्युयेरा ' (छोटे युद्ध) या स्पॅनिश शब्दामधून झाला व त्याचा आधुनिक कालखंडातील श्रीगणेशा स्पॅनिश शेतकऱ्यांनीच नेपोलियनच्या आक्रमक सेनेविरुद्ध प्रथम गिरवला. नेपोलियनच्या प्रबळ सेनेपुढे स्पॅनिश लष्कराने नांगी टाकल्यावर, फ्रेंच सेनेचे जुलुम असह्य झाल्या-वर दुबळ्या शेतकऱ्यांनी नांगर टाकून हातात शस्त्र धरले व फ्रेंच सेनेला त्राही भगवान करून सोडले. त्यांच्या शौर्याची व मदतीची इंग्लिश सेनानी वेलिंग्टन यानेही मुक्तकंठाने स्तुती केली. पण इंग्लिश सेनेच्या दैदीप्यमान विजयापुढे

स्पॅनिश शूर वीरांचा लढा फिका पडला व विस्मरणाच्या अंधारात विझून गेला तथाकथित लष्करी तज्ज्ञांनीही त्यांची विशेष दखल घेतली नाही व फारतर किरकोळ मारगिरीकरता ह्यांचा उपयोग जरी सर्वांनी मान्य केला तरी १८१४ ते १९१४ या शतकात, 'गनिमी युद्धाचा' एकूण रणनीतीच्या व उद्दिष्टांच्या दृष्टिकोनातून कोणीच विचार केला नाही.

एकूण रणनीतीच्या आखणीच्या व उद्दिष्टांच्या दृष्टीने 'गनिमी युद्ध' किती परिणामकारक काम करू शकते याचा प्रत्यय टी. इ. लॉरेन्स याने पहिल्या महायुद्धात तुर्कांविरुद्ध प्रथम आणून दिला. लॉरेन्सने 'गनिमी युद्धा'ला तथाकथित साहसवादावरून एका संघटित व आखणीबद्ध शास्त्रात-विचारात परिणत केले. त्याने केवळ निरुपाय म्हणून गनिमी युद्धाचा उपयोग न करता अग्रहक्क देऊन ते उपयोगात आणले.

पहिल्या महायुद्धात अरबस्तानामध्ये तुर्कांच्या प्रबळ व शिक्षित सेनेविरुद्ध अरबांचा काही केल्या पाडाव लागेना. अरबी टोळ्या संघटित होऊन पुन्हा पुन्हा तुर्कांविरुद्ध पाय रोवून लढाईला उभ्या टाकत होत्या आणि पराभूत होऊन माघार घेत होत्या. अरबांचा प्रतिकार संघटित व परिणामकारक करण्यासाठी आलेल्या लॉरेन्सने एकूण परिस्थितीचा व डावपेचांचा शांतपणे विचार केला. तेव्हा त्याला आढळून आले, की 'क्लाउत्झे वित्झ व त्याचे युद्धसिद्धांत हे युरोपीय युद्धांना कितीही शिरसावंद्य असले, तरी आपण युरोपी युद्ध अरबस्तानच्या रेताड वाळवंटावर, प्रबळ तुर्कसेनेविरुद्ध व तेही अर्ध शिक्षित व शस्त्रविहीन अरब टोळीवाल्यांनिशी लढत आहोत. ही उघड व पारंपारिक लढाई मूर्खपणाची आहे. केवळ तुर्की सैनिक मारणे वा त्यांना मागे हटविणे यापेक्षा युद्ध साहित्यात कमजोर असलेल्या तुर्की सेनेच्या युद्ध-साहित्यावरच जर डल्ला मारला, तर ते जास्त सोयीचे पडेल. तुर्की सैन्याला मागे हटविण्यात दादागिरी करण्यापेक्षा, त्यांना फायदेशीररीत्या इथे रहाणेच मुष्किल करणे शहाणपणाचेच आहे. (The plan was to convince the Turks that they could not stay, rather than to drive them out.) परिस्थितीनुसार लवचिक धोरण आखणाऱ्या हिकमी व चाणाक्ष लॉरेन्सच्या लढवय्यांनी लगेच त्याप्रमाणे पवित्रे टाकले व ब्रिटिश सेनेच्या सीरिया व पॅलेस्टाईन मधील चढाईत त्यांना बहुमोलाची साथ दिली.

## क्रांतिकारक बदल

'लॉरेन्स ऑफ अरेबिया' विषयीच्या अतिरंजित कहाण्यांचा भाग जरी सोडला तरी त्याने संघटित केलेल्या व शर्थीने लढविलेल्या गनिमी युद्धाचे महत्त्व त्याच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल. पण लॉरेन्सच्या विचारांची व डावपेचांची महती इंग्लंड वा इतर लोकशाही राष्ट्रांपेक्षा साम्यवादी लेनिन व माओ यांनाच जास्त पटली. (इंग्लंड केवळ याच बाबतीत दुर्दैवी नाही, तर चिलखती दलाच्या

नवीन आक्रमक डावपेचांचा भाष्यकार कॅ. लिडेल हार्ट याच्या लिखाणाचा जास्तीत जास्त फायदा जर्मन सेनापतींनी उठवून दुसऱ्या महायुद्धात इंग्लंड व फ्रान्सला धूळ चारली. पिकते तिथे विकत नाही हेच खरे! )पण प्रामुख्याने लष्करी डावपेच व स्वरूप असलेल्या लॉरेन्सच्या गनिमी युद्धाच्या कुडीत लेनिन, माओ, चे-गुव्हारा यांनी दूरगामी राजकीय, सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांचे पंचप्राण ओतले व आधुनिक क्रांतिकारी गनिमी युद्धाला जन्म दिला. आणि इथूनच मूळच्या पारंपारिक 'गनिमी युद्धात' क्रांतिकारी बदल झाला. तरी देखील अजून आपण 'गनिमी युद्ध' व 'क्रांतिकारी गनिमी युद्ध शब्द समान अर्थानेच वापरत आहोत व एकाच मापाने तोलत आहोत. क्रांतिकारी गनिमी युद्धाचे उद्दिष्ट केवळ 'स्वातंत्र्य वा एक सरकार उलथवून त्या जागी दुसरे सरकार स्थापणे यापुरतेच मर्यादित रहात नाही तर प्रचलित समाज-पद्धती व त्यातील दोष यांचा चोळामोळा करून त्या जागी 'नव्या मनूचे नवे राज्य' आणण्यासाठी लष्करी, सामाजिक, अर्थिक, राजकीय इ. सर्व आयुधांनिशी पुकारलेला तो जेहाद असतो. चार-दोन लष्करी विजय वा ऐसपैस मुलुख हे त्याचे ध्येय नसते; तर माणसांचे मन व हृदय काबीज करण्याचा त्यात अट्टाहास असतो. मुख्य लढाई रणांगणावर न होता माणसाच्या मना-हृदयात लढविली जाते. त्यात जो हरतो तो पार खलास होतो.

माओ व चे-गुव्हारा यांना आधुनिक गनिमी युद्धाचे प्रमुख भाष्यकार मानण्यात येते. पण माओ हा काही गनिमी युद्धाचा जनक नव्हे व तसा दावा त्यानेही कधी केला नाही. तर सन झू पासून ते लॉरेन्स, लेनिन, यंग चुन इ. सर्व गुरूजनांची 'वाट पुसतु' त्याने क्रांतिकारी गनिमी युद्ध संघटित केले व लढविले. पण माओचे खरे मोठेपण क्रांतिकारी गनिमी युद्धाचे शास्त्र व तंत्र बसविण्यामध्ये नसून जुलुमाने व दुःखाने पिडलेल्या चिनी जनतेचे दुखणे नेमके ओळखून, त्यावर पाहिजे ते व तेवढेच औषध लागू करण्यामध्ये आहे. माओचे विचार म्हणजे साम्यवादी विचारधारा, चिनी राष्ट्रवाद व इतिहास, सर्वस्पर्शी दृष्टी व प्रत्यक्ष गनिमी युद्धाचा प्रदीर्घ अनुभव यांचा मजेशीर व विशाल संगम आहे. पण त्याने वास्तवाची कास कधीही सोडलेली नाही. क्रांतिकारी गनिमी युद्धातल्या या महान योद्धयाने क्रांतिकारी गनिमी युद्ध म्हणजेच सबकुछ अशी भूमिका कधी घेतली नाही, वा त्याला रोमांच-वादावर (जी चूक चे-गुव्हारा याने केली) व अतिवास्तवाच्या उचीवर नेले नाही. जपानी व चँग के शेकच्या सुसरीचे मऊ पोट ओळखून व मागासलेल्या शेतीप्रधान चिनी जनतेची कुवत जाणून माओने या युद्धाचा वापर केला व ते करत असताना क्रांतिकारी गनिमी युद्ध व पारंपारिक युद्ध, राष्ट्रीय उद्दिष्टे, राजकीय प्रश्न यातील संबंध व त्यांच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत.

माओने अंगिकारलेल्या क्रांतिकारी गनिमी युद्धाचे पडसाद केवळ चीनपुरतेच

पृष्ठ ५५ वर

अय्यय्यो ! मदरास्स !

नलिनी अंबाडे

# जुळल्या तारा, सूर लागले !

गायनाला म्हणे मग मजा येते ! का ? सतारीच्या तारा जुळल्या आणि पेटीचे सूर लागले म्हणून ! व्यवहारातही कधीकधी दोघांच्या तारा जुळतात, सूर लागतात, अन्...! आता ती दोघे 'तो' आणि 'ती'च हवीत हा आग्रह कशाला ? दोन 'ती'च्या जर तारा जुळल्या तर किती बहार येते म्हणता ! पण कधीकधी हे सारं जुळूनदेखील मैफिल रंगतच नाही, अन् वाटू लागते ' चला परत जाऊ घरी, नाहीतर दुसरीकडे कुठे !'

एकदा, एकाने दुसऱ्याला ' गाढव ' म्हटले ! झाले ! दुसरा संतापला, तणतणला आणि वरिष्ठांकडे तक्रार घेऊन गेला. साहेबांनी पहिल्यास विचारले—

' याला गाढव म्हटले ?'

' हो.'

' बदनामी केली हे मान्य आहे ?'

' हो. '

' मग त्याबद्दल वाईट वाटते का ?'

' होय, पश्चात्ताप होतो. '

एवढे ऐकले मात्र ! पहिला विजयाच्या आनंदात, त्या साहेबांच्या खोलीबाहेर पडला. दुसऱ्याचे नंतरचे शब्द त्याने जणू ऐकलेच नाहीत. दुसरा पुढे म्हणाला होता, ' यात त्या चार पायाच्या गाढवाची जी बदनामी झाली, त्याबद्दल मला वाईट वाटते, आणि पश्चात्ताप होतो !' साहेब हसला. जणू दुसऱ्या व्यक्तीशी सूर जुळले आणि तारा लागल्या !

असाच काहीसा प्रकार परवा त्रिवेंद्रमला झाला. तेथे ' थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशन ' आहे हे वाचकांच्या आता परिचयाचे झालेले आहे. सिमेंटचे ठोकळे समुद्राच्या पाण्यामध्ये टाकताना झालेली दंगल, कोळ्यांची चळवळ, १००% स्थानिक केरळीयासच नोकऱ्या हव्यात म्हणून झालेली गडबड हे वाचलेले अद्याप आठवतच असेल. 'इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च'तर्फे फ्रान्स, अमेरिका व रशियाच्या सहकार्याने दहाबारा वर्षांपूर्वी ही योजना साकार झाली. १९६३ च्या नोव्हेंबरात

पहिले रॉकेट उडवले गेले. डॉ. विक्रम साराभाईंच्या निधनापर्यंत या स्टेशनची व्यवस्था मध्यवर्ती सरकारच्या अणुशक्ती खात्याकडेच होती. आता हे एक स्वतंत्र खाते झालेले असून प्रो. एम्. जी. के. मेनन (पद्मश्री—१९६१, पद्मविभूषण १९६८) हे खातेप्रमुख म्हणून नेमले गेले. सदर खात्याचे एकूण १४ विभाग असून, त्यांपैकीच 'सॅटेलाईट सिस्टिम डिव्हिजन' ही एक शाखा आहे. योजनेप्रमाणे १९७४ मध्ये पहिला उपग्रह आकाशात फिरायला हवा. तसे मध्यवर्ती सरकारने तेथील शास्त्रज्ञांना विचारले—

'१९७४ पर्यंत कृत्रिम उपग्रह व्हायला पाहिजे.'

'होय, व्हायला पाहिजे.'

'तीमध्ये उशीर होता कामा नये.'

'अगदी बरोबर'—तेथले शास्त्रज्ञ म्हणाले.

'मग १९७४ पर्यंत काम पूर्ण होईल ?'

'पूर्ण होईल.'

बस्स ! इथवरच दोघांच्या तारा जुळल्या अन सूर लागले. कारण दिलेली मुदत संपण्याच्या आत, त्वरेने काम व्हावे म्हणून सरकारची सूचना होती, की ही सॅटेलाइट सिस्टिम डिव्हिजनच येथून हैद्राबाद किंवा बंगलोरला हलवावी आणि नेमक्या त्याच कारणासाठी म्हणजे १९७४ मध्ये उपग्रह आकाशात फिरावा असे वाटत असेल तर, विभाग इथेच ठेवावा असे काही लोक म्हणू लागले ! तारा जुळल्या, पण सूर दुसरेच निघू लागले. सरकारचा विचार तसा बरोबर आहे. बंगलोर येथे संरक्षण खात्याची, विजेच्या उपकरणांची मोठ्ठी व अद्ययावत प्रयोगशाळा अनायासे आहेच. तशीच एक प्रयोगशाळा हैद्राबाद येथेही आहेच. ती सध्या 'इलेक्ट्रॉनिक कार्पोरेशन ऑफ इंडिया'चे काम पहाते. या दोघींचा उपयोग करून घ्यावयाचा, का केवळ रॉकेटमधील इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे तपासणीसाठी एक स्वतंत्र प्रयोगशाळा त्रिवेंद्रमला स्थापावयाची असा प्रश्न सरकारपुढे पडला. त्रिवेंद्रमहून दरवेळी शास्त्रज्ञांनी विमानाने बंगलोर, हैद्राबादच्या खेपा करावयाच्या, शिवाय वेळेचा अपव्यय. हे टाळण्यासाठी एक शाखाच तिकडे जाणं शहाणपणाचे !

नेमके हेच स्थानिक मंडळींना आवडले नाही. आता सामान्य जनतेचा पाठिंबा हवा असेल तर तिला भडकवून दिलेच पाहिजे. प्रचार सुरू झाला की, सर्वच्या सर्व प्रकल्पच बाहेरच्या राज्यात जाणार—सारेचजण बेकारीच्या खाईत कोसळणार !

वास्तविक प्रकल्पाच्या एकूण १४ शाखा आहेत. त्यापैकीच ही एक शाखा. एकूण २००० सेवकांपैकी फक्त ८० जण ह्या शाखेत. त्यांपैकीही २० जण अहमदाबादच्या मोठ्या प्रयोगशाळेतून येथे त्रिवेंद्रमला 'डेप्युटेशन'वर आलेले. म्हणजे फक्त ६० जणांवर बदलीची वेळ येईल. बाकीची सर्व तेरा खाती येथेच रहातील.

लोकसभेत दिल्लीला पंतप्रधान म्हणाल्या, 'ह्या सॅटेलाइट विभाग फक्त दुसरीकडे हलविण्याचा विचार आहे.' तेच विचार के. सी. पंत (मिनिस्टर ऑफ स्टेटस् फॉर होम) यांनी निराळ्या शब्दात मांडले, की 'संपूर्ण प्रकल्प हलविण्याचा सरकारचा विचार नाही!' केरळा प्रदेश काँग्रेस कमिटीने ह्या दोन्हींची भेसळ करून दिली. जनता मात्र गोंधळात पडली. शेवटी केंद्रसरकारने जाहीर केले, की 'निर्णय तुमच्या खात्याचे अध्यक्ष मेनन करतील, हलवायचे की नाही ते त्यांना ठरवू देत. एप्रिलच्या शेवटच्या दिवशी ते परदेश दौऱ्यावरून परतताच प्रकरण त्यांच्यासमोर ठेवले जाईल'–वादळ तात्पुरते शमले!

केरळातील औद्योगिक प्रकल्पांना जणू 'लेबर ट्रबल्स' नामक क्षयरोग पायाचा दगड बसविण्यापूर्वीच लागलेला असतो की काय कोण जाणे! १४ पैकी १० प्रांतिक–सरकारी कारखाने सध्या तोटयात आहेत. चहामळे, रबरमळे व जंगलांचे राष्ट्रीयकरणाने तिकडेही नफा होण्याची फारशी शक्यता नाही. खुद्द येथे त्रिवेंद्रम-लाही काही ना काही कारणांखाली कामगारांच्या चळवळी नेहमी प्रगतीच्या पायात खोडा घालीतच असतात. थुंबा येथील शास्त्रज्ञांना ही शाखा बाहेर जाण्यास का नको त्याचे उत्तर परवाच्या एका घटनेत कदाचित मिळेल!

प्रकल्पांतून विजेची उपकरणे, सामान आणि इतरही काहीबाही 'जाण्याच्या' तक्रारी अधिकाधिक येऊ लागल्या. कुणकुण वाढून कुजबुज होऊ लागली. कुज-बुजीची चर्चा व नंतर उघड आरोप. कशी कोण जाणे पण ह्या चोऱ्यांची माहिती पार दिल्लीच्या सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनपर्यंत पोचली, आणि एका अंधाऱ्या रात्री दिल्लीहून धाड आली – धाड आली अन् पडली ती सरळ एका गॅझेटेड ऑफिसरचे घरावर! नुसताच गॅझेटेड ऑफिसर नव्हे, तर एका विभागाचा प्रमुखही! बुधवार दि. १९ एप्रिलला शुद्ध षष्टी होती पंचांगात आणि प्रत्यक्षात सी. आय. बी. चे अधिकारी, शास्त्रज्ञ महाशयांची शास्त्रोक्त पद्धतीने 'षष्ठी' करीत होते. केंद्रातून नाहीसा झालेला खूप माल तेथे सापडला म्हणे. त्यामध्ये एक एअर-कंडिशनरही सापडला. सदर शास्त्रज्ञ महाशय पत्नीचे नावावर एक दुकानही चालवितात व धाड नंतर दुकानावरही गेली. पंचनामा झाला. ह्यामध्ये खरा चोऱ्यांचा भाग किती आणि शास्त्रज्ञ महाशयांना बदनाम करण्याचे कारस्थान किती हे परमेश्वरच जाणे!

एक मात्र खरे, की सरकारी सेवक – दारावरचे पहारेकरी – स्टोर्स खात्यातील गोडाऊनकीपर्स यांच्या तारा जुळल्या आणि सूर लागले, की वाटेल ते सामान 'बाहेर जाण्याचा' आवाज करू लागते. आवाज जितका सहजपणे बाहेर जातो तितक्याच सहजपणे सामान बाहेर जाते! पण त्रिवेंद्रमला नेमके कुणाचे सूर जुळले ते अद्याप बाहेर यायचे आहे!

◻ ◻ ◻

## सप्रेम नमस्कार....

गेल्या आठवड्यात 'वेस्टर्न नेव्हल कमांड, नव्हीनगर मुंबई' इथे जाण्याचा योग आला. माझे मित्र लेफ्ट. एन. एम. नदाफ यांचे पोस्टिंग नुकतेच बोटीवरून नेव्हल वर्कशॉपमध्ये झाल्याचे कळले. भारत-पाक युद्धात पूर्व सागरामध्ये झालेल्या संग्रामात भाग घेतलेल्या आय. एन. एस. बियास या लढाऊ बोटीवर लेफ्ट. नदाफ होते. या बोटीने फार मोठा पराक्रम गाजविल्याचे अगोदरच कळले होते. सर्व हकीकत त्यांच्या तोंडून ऐकण्याच्या उद्देशाने त्यांची भेट घेतली. प्रत्यक्ष भेटीत त्यांनी सांगितलेली ही साहसकथा.

लेफ्ट. नदाफ हे सांगली जिल्ह्यातील तासगावच्या एका गरीब प्राथमिक शिक्षकाचे ज्येष्ठ चिरंजीव. १९६७ मध्ये भारतीय आरमारात परमनंट कमिशनसाठी त्यांची निवड झाली. मेकॅनिकल इंजिनिरिंगची पदवी विशेष प्राविण्यासह घेतल्या नंतर १९६९ साली त्यांनी भारतीय आरमारात प्रवेश केला. सुरुवातीचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर आय. एन. एस. दीपकवर आणि नंतर बियासवर त्यांची नेमणूक झाली. गेल्या वर्षी बढती मिळून ते लेफ्टनंट झाले. गेल्या युद्धातील कामगिरीबद्दल विशिष्ट सेवा पदकासाठी त्यांची शिफारस झाली होती. पण या बहुमानास ते फारच अल्पवयी (ज्यूनियर) असल्याने तो बहुमान त्यांना मिळू शकला नाही.

—चंद्रमोहन शिंदे

# आम्ही सागरवीर

संध्याकाळचे साडेसहा वाजले आहेत. वेस्टर्न नेव्हल कमांडच्या ऑफिसर्स मेसमधील बॉलरूममध्ये नेव्हीच्या रुबाबदार युनिफॉर्ममधील तरुण अधिकाऱ्यांची वर्दळ वाढत आहे. उद्या होणाऱ्या नृत्याच्या कार्यक्रमाची तयारी जोरात सुरू आहे. तरुण अविवाहित अधिकाऱ्यांच्या घोळक्यातून मधूनच हास्याचे कारंजे उडते. विवाहित अधिकारी आपापल्या सहचारिणींसह फेरफटका मारताना दिसताहेत. प्रत्येकाच्या नजरेत वेडरपणा, येणाऱ्या क्षणाची मौज लुटण्याची उत्सुकता, चालीमध्ये लष्करी डौल, वागण्यात पाश्चिमात्य भारदस्तपणा दिसतोय. लेफ्ट. नदाफ आम्हाला प्रत्येकाचा थोडक्यात परिचय दुरूनच करून देतात. गेल्या युद्धांत प्रत्येकाने गाजवलेल्या पराक्रमाची थोडीशी झलक पेश करतात. 'हे लेफ्ट. खानझोडे. दुर्दैवी आयं. एन. एस. कुकरीवरील वाचलेल्या नशीबवान नौसैनिकांपैकी एक. हे लेफ्ट. सत्पथी ओरीसातले. ते दोघे कृष्णवर्णीय अधिकारी आहेत केनियातील. प्रशिक्षणासाठी आलेले.' हळूहळू आमच्या गप्पा सुरू होतात. मित्रमंडळींची चौकशी झाल्यानंतर मी मुख्य मुद्याला हात घालतो आणि म्हणतो 'बंड्या, आता सुरू कर युद्धातील तुझ्या पराक्रमाची गाथा.' क्षणभर स्तब्धता पसरते. लेफ्ट. नदाफांच्या डोळ्यांसमोर युद्धातील प्रसंग तरळू लागतात. आणि गंभीर आवाजात लेफ्ट. नदाफ सांगू लागतात. --

"बांगला देशात २५ मार्चपासून चालू झालेल्या आकांतामुळे युद्धाचा प्रसंग आता लवकरच येणार आहे याची जाणीव आम्हाला अगोदरच झाली होती. प्रत्यक्षात युद्ध सुरू झाले डिसेंबरात. पण साधारणत: एप्रिलपासूनच आमच्या योजना सुरू झाल्या होत्या. कोणत्याही आरमारास परिस्थितीनुरूप अशा योजना तयार ठेवाव्या लागतातच. त्यांची अनेकवेळा गुप्तपणे चाचणी घ्यावी लागते. अशा योजना जर तयार नसतील तर ऐनवेळच्या योजनांनी विस्कळीतपणा वाढण्याचा आणि सुसूत्रता नाहिशी होण्याचा संभव असतो. आमच्या योजना आम्ही लुटूपुटींच्या प्रात्यक्षिकांद्वारे कित्ता गिरवल्याप्रमाणे घटवून तयार ठेवल्या होत्या. आमच्या

शत्रूकडे त्याच्या मित्रांकडून मिळालेल्या लढाऊ बोटी आणि अत्याधुनिक पाणबुड्या होत्या व एप्रिल पासूनच पूर्वसागरामध्ये त्यांचा संचार सुरू झाला होता.

पण एक गोष्ट उघड होती. मित्रराष्ट्रांकडून पाकिस्तानला अत्याधुनिक नौदल मिळाले असले, तरी त्याचे सारथ्य करणारे हात आणि मने होती पाकिस्तानी! अरब-इस्रायल युद्धात आधुनिक रशियन अस्त्रांनी सज्ज असलेल्यांना ती अस्त्रे कशी चालवावी हे माहीत नसल्याने त्यांचा फारसा प्रभाव पडू शकला नाही. १९६५ च्या युद्धात पाकिस्तानी पॅटन्सचे अपयश असेच होते. त्यामुळे तथाकथित आधुनिक पाकिस्तानी नौदल आमच्या विरुद्ध कितपत प्रभावी ठरू शकेल याची शंकाच होती.

पण गाफील राहून चालणार नव्हते. डोळ्यांत तेल घालून आम्ही आमच्या किनाऱ्याचे रक्षण करीत होतो. शत्रूच्या हालचालींचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करीत होतो. भारतावरील हवाई मार्ग बंद झाल्याने पाकिस्तानला आपली सर्व रसद, दारूगोळा, सैनिक समुद्रमार्गेच न्यावा लागत असे. त्यासाठी काही परदेशी जहाजेदेखील त्यांनी भाड्याने मिळवली होती. त्यांच्या हालचालींच्या बित्तंबातम्या आम्हाला आमच्या हेर बोटींकडून कळत असत. शत्रूदेखील तितकाच चलाख होता. बुद्धीबळातील चाली प्रतिचाली प्रमाणे आमच्या चालीप्रतिचाली चालल्या होत्या. फक्त ठिणगी पडायचा अवकाश होता! अशा धीम्या चालीमध्ये सप्टेंबर उजाडला.

जगाच्या राजकीय रंगमंचावर चाललेल्या नाट्यातील दृश्ये झपाट्याने बदलत होती. आपल्या देशाने देशोदेशी आपले दूत पाठवून व वकिलातीमार्फत बांगला देशातील सत्यस्थिती जगासमोर उघडी केली होती. जोपर्यंत तोंडातून आक्रमक आणि उद्धटभाषा निघत नाही तोपर्यंत जग तुमच्याकडे लक्ष देतच नाही. निर्वासितांच्या लोंढ्यामुळे नवनवे प्रश्न उभे ठाकले होते. बहुतेक देशांनी कोरडी सहानुभूती आणि भरीव मदतीची आश्वासने आमच्या तोंडावर फेकून मूगच गिळले. पण याच वेळी भारत-रशिया संरक्षण करारामुळे भरतखंडात चाललेले रौद्रभीषण नाट्य वेगळेच वळण घेणार हे दिसू लागले.

आता लवकरच निर्णायक युद्ध सुरू होणार याची जाणीव होऊ लागली. आमच्या हालचाली अतिसावध झाल्या. पाकिस्तान्यांचा डोळा होता आय. एन. एस. विक्रांतवर. भारतीय नौदलाची ही ध्वजनौका नौदलाची मानबिंदू आहे. याप्रकारची विमानवाहू नौका आपल्याकडे फक्त एकच असल्याने शत्रूच्या पाणबुड्या या आधुनिक बोटीचा नाश करण्यास सदैव टपलेल्या होत्या. चीन, अमेरिका आणि फ्रान्स यांच्याकडून मिळालेल्या या पाणबुड्या आधुनिक अस्त्रांनी सज्ज होत्या. त्यांची इंजिने अत्यंत कार्यक्षम होती. खरा धोका या पाणबुड्यांकडूनच होता. विक्रान्तचे रक्षण करण्यासाठी आय. एन. एस. बियास, ब्रह्मपुत्रा, किलतान आणि

करसुरा ही लढाऊ जहाजे देण्यात आली. विक्रान्त सहजासहजी गमावून चालण्यासारखे नव्हते. आगामी युद्धात तिला महत्त्वाची कामगिरी बजावायची होती.

## अंदमान गाठले

आमची आय. एन. एस. बियास ही भारतीय आरमारातील एक सुसज्ज लढाऊ बोट आहे. पाण्याखालील पाणबुडीवर या नौकेन मारा करता येतोच, शिवाय पाण्यावरील जहाजावर, बॉम्ब वर्षाव करणाऱ्या विमानावर आणि किनाऱ्यावरील प्रदेशातदेखील या बोटीवरून मारा करता येतो. टॉरपेडोविरोधी, पाण्यातील मिसाइल्स विरोधी, विमानविरोधी तोफा अशा मारगिरीच्या साधनांनी, तसेच रडार, पाण्याखालील शत्रूंच्या हालचालीचा मागोवा घेणाऱ्या इलेक्ट्रानिक उपकरणांनी ही बोट सुसज्ज आहे. सप्टेंबरपासूनच आमच्यामागे पाकिस्तानी पाणबुड्यांचा वावर सुरू झाला असल्याची कल्पना आम्हाला होती. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात आम्ही मुंबईचा किनारा सोडला. वास्को, कोचीन, सिलोनला वळसा घालून लपत छपत फारसा गाजावाजा न करता विशाखापट्टणला आम्ही पोहचलो. आवश्यक साधनसामग्री, तेल, अन्नसाठा जहाजावर चढवून पुन्हा आमचा प्रवास सुरू झाला, अंदमानकडे ! आता तर विक्रान्तकडे ससाण्याच्या नजरेने आमची टेहळणी होती. आमच्या मागे शत्रूच्या दोन पाणबुड्या यावेळीदेखील होत्याच. त्यांना हुलकावणी देऊन आम्हाला अंदमान गाठावयाचे होते. आणि आम्हाला यश आले ! त्या दोन पाणबुड्यांना गुंगारा देऊन सप्टेंबरच्या मध्यावर आम्ही अंदमान गाठले.

अंदमानात आम्हाला स्वस्थ बसून चालण्यासारखे नव्हते. आमचा माग शत्रू कधी काढेल याचा नेम नव्हता. भावी युद्धासाठी आमची शस्त्रे घासून पुसून तयार ठेवायची होती. नौकेच्या इंजिनांची पोटच्या मुलाप्रमाणे काळजी घ्यायची होती. ऐनवेळी जर इंजिनांनी दगा दिला तर पंख कापलेल्या गरुडाप्रमाणे आमची स्थिती झाली असती. बोटीत आणीबाणीच्या काळी पुरून उरेल इतके तेल घ्यायचे होते. अंदमानातील रहिवाश्यांपासून खूपच दूर रहावयाचे होते. युद्धतयारीचा गाजावाजा करून उपयोग नव्हता. एक गोष्ट आमच्या फायद्याची होती. अंदमान बेटाच्या आसपास सुमारे चारशे छोटी मोठी बेटे आहेत. आज या बेटावर तर उद्या त्या बेटावर असे करत पाणबुड्यांना हुलकावणी देणे सहज शक्य होते.

अंदमानातील अडीच ते तीन महिन्यांचे जीवन फारच कंटाळवाणे आणि जिकिरीचे गेले. पोर्ट कॉर्नवॉलिस आणि पोर्ट ब्लेअर हे दोनच नाविकतळ त्यातल्या त्यात मोठे आहेत. पण या बेटाभोवती भ्रमंतीत खूपच थोडे दिवस आम्ही या तळावर असू. घरची पत्रे खूप उशीरा मिळायची. पण करणार काय ? आमचे जीवन पाण्यातले ! आज विशाखापट्टणला असायचो तर उद्या अंदमानातील कुठल्या तरी छोटया बेटाभोवती, तर परवा पोर्ट ब्लेअरला. आमचा पत्ता शोधीत असलेल्या डाक आणणाऱ्या विमानाची आणि आमची जेव्हा गाठ पडायची तेव्हाच पत्रे

मिळायची. कधी कधी बोटीतील रेशन संपायचे. दुसरे रेशन भरून घेई पर्यंत अर्ध पोटी रहाण्याची वेळ येई. असे प्रसंग क्वचित येत असत. असे नीरस जीवन सुसह्य करण्याचा मार्ग आमच्या सुपीक डोक्यातून निघाला. कधीकधी आम्हाला सुट्टी मिळे. त्यावेळी इतर सहकाऱ्यांबरोबर आम्ही शिकारीस जात असू. एक दोन बंदूका, भरपूर काडतुसे आणि तळावरील एखादी जीप घेतली, की चालली आमची स्वारी शिकारीला अंदमानच्या जंगलात ! कधी हरणाची, कधी सश्याची शिकार आम्हाला मिळायची. अशावेळी नागरी वस्तीपासून दूर रहाण्याच्या कडक सूचना आम्हाला मिळत. कधीकधी छोट्या बोटीतून माशांची शिकार करण्यासाठी आम्ही बाहेर पडत असू. तंग वातावरणात विरंगुळा मिळविण्याचे प्रयत्न आम्ही नेहमीच करीत असू. आम्हाला शिकार करायची होती क्रूर पाकिस्तानी लांडग्याची ! हरीण, ससा, मासे यांच्या शिकारीत काहीच दम नव्हता. ताणलेले रबर कधीतरी तुटतच असते. भारतीय पायदळाचे संरक्षणात्मक हल्ले पूर्व पाकिस्तानच्या सीमेवर सुरू झाले होते. युद्ध सुरू होणार ही गोष्ट काळ्या दगडावरच्या रेघेप्रमाणे होती. युद्धात जिवाचे बरे वाईट होण्याचा संभव असल्याने प्रत्येकाच्या अंगी बेछूट वृत्ती यावी यात नवल ते कसले !

नोव्हेंबर संपत आला. बोटीवरील ऑपरेशन्स रूममध्ये संदेशाची देवाणघेवाण वाढत चालली. पायदळाने केलेल्या हल्ल्यांना पूर्ण यश मिळत असल्याच्या बातम्या यायच्या. परदेशी नागरीक आणि बंगाली फितूर यांची पळापळ चाललेली दिसून यायची. निरपराध लोकांची अमानुष कत्तल करून केलेल्या लुटीची जहाजे पाकिस्तानच्या वाटेवर वेगाने चालल्याच्या बातम्या हेरांकडून समजायच्या. आता शत्रूशी दोन हात करण्यासाठी आमचे बाहू स्फुरण पावत होते. जहाजांवरील यंत्रावर, शस्त्रांवर अखेरचे हात फिरू लागले. एकमेकांचा अखेरचा निरोप नौसैनिक घेऊ लागले, जगलो वाचलो तर पुन्हा भटूच पण कामी आलो तर हाच अखेरचा निरोप ! अंतिम हल्ल्यासाठी इंधन भरून जहाजे तयार झाली. हुकूमाची वाट सर्वजण आतुरने पहात होते ! डिसेंबरची एक तारीख आली. आमचा काफिला त्यावेळी पोर्टकॉर्नवॉलिसमध्ये होता. युद्ध सुरू झाल्याची बातमी केव्हाही येण्याचा संभव होता. मानसिक ताण असह्य झाला होता. दोन तारीख उजाडली. संध्याकाळी कंट्रोलरूममध्ये अचानक संदेश धडकला. 'पाकिस्तानी विमानांनी भारतीय विमानतळावर आक्रमक हल्ले चढवले आहेत. तुमच्या योजनाप्रमाणे तुम्ही पुढे चला ! (Proceed according to your plans.) 'आमच्या कप्तानाने हुकूम दिला.

'पूर्ण वेगानिशी पुढे चला ! (Go ahaid with full speed). क्षणार्धात काफिल्यातील पाचही बोटींची इंजिने धडधडू लागली आणि आम्ही चितगाव व कॉक्ससबजारच्या दिशेने कूच केले !

आमच्या पाच जहाजांची एक विशिष्ट रचना आम्ही केली होती. मधोमध

विक्रांत, तिच्या उजव्या बाजूला बियास, डाव्या बगलेवर ब्रह्मपुत्रा, पुढे किलतान आणि मागे करसूरा. आमच्यावर सोपविलेली कामगिरी होती चितगाव आणि कॉक्ससबजारच्या नाविकतळाचा आणि विमानतळाचा नाश करणे; पूर्वसागराची पूर्णतः–विशेषतः ब्रह्मदेशच्या बाजूने–कडक नाकेबंदी करणे; कारण पळपुटे पाकिस्तानी आम्हाला टाळून ब्रह्मदेशाच्या बाजूकडून धूम ठोकतील असा आमचा अंदाज होता. आम्हाला थोडीफार काळजी होती सेबरजेटस्ची. अमेरिकेकडून मिळालेल्या या शक्तिशाली बॉम्बफेकी विमानात साइडविंगर मिसाइल्स बसवलेली असतात. त्यांची क्षमता मोठी असल्याने आपल्या विमानांच्या अनेक पटीने अधिक बॉम्ब्ज ही विमाने वाहून नेऊ शकतात. वर्मी बसलेल्या मिसाइलमुळे बोट बुडण्याचा धोका असतो. पण आमच्या बोटीवरील विमान-विरोधी तोफांचे गनर्स डोळ्यांत तेल घालून आकाशाचे वेध घेत होते. अशा सेबर जेटसच्या माऱ्यापासून वाचण्यासाठी आम्ही एक योजना आखली होती. विक्रांतवरील विमाने हल्ला करून परत आली, की आम्ही चटकन समुद्रातील आमचे ठिकाण बदलून आजूबाजूस सुमारे १५० मैलांच्या परिसरातील दुसऱ्या जागी जाणार होते. या कारणाने सेबरजेटस्ना आमचे निश्चित स्थान चटकन शोधता आले नसते. कदाचित त्यानी आम्हाला शोधून काढले असते, तरी आमच्या विमानविरोधी तोफा त्यांचा समाचार घेण्यास सिद्ध होत्या. विमान हल्ल्याचा संभव असल्याने आमच्या काफिल्यातील बोटींवरील दिवे बंदच होते.

## बोट गमावू नका

तीन तारखेस आम्ही चितगावपासून सुमारे दीडशे मैलांवर पोचलो. विक्रांतवरील सहा विमानांना संध्याकाळच्या वेळेस चितगाववर हल्ला करण्याचा आदेश दिला गेला. क्षणार्धात त्या पथकाने आकाशात गरुडभरारी मारली आणि ती चिमुकली विमाने थोड्याच वेळात दिसेनाशी झाली. पाणबुड्याचा शोध इकडे चाललाच होता. कंट्रोल ऑपरेटरर्स रडारस्क्रीनसमोर डोळे ताणून बसले होते. विक्रांतवरील डेकवर प्रत्येकजण आकाशाकडे डोळे लावून होता. मी त्यावेळी बियासच्या इंजिनरूममध्ये होतो. हाताखालच्या नाविकांना मी शेवटची आज्ञा दिली होती, 'तुम्ही शूर भारतीय नौसैनिक आहात. मी ज्यावेळी पूर्ण वेगाने पुढे जा असा आदेश देईन त्यावेळी इंजिने पूर्ण वेगानिशीच सुरू झाली पाहिजेत. तुमच्या जिवाची पर्वा करू नका. तुमचा एकट्याचा जीव महत्त्वाचा नाही; महत्त्वाची आहे आपली लढाऊ बोट. हिला गमावून चालणार नाही'

[Look ! you are brave Indian Navy boys. When I say " Go ahead with full speed " it means go ahead with maximum possible speed. Don't care for your life. Your individual life is not important. What's important is our Ship !]

आणि...परत येऊ लागलेली आमची विमाने क्षितिजावर दिसू लागली. त्यांना उतरवून घेण्यासाठी विक्रांत आपली दिशा बदलू लागली. पण सुरुवातीस फक्त चारच विमाने दिसली. आमच्या मनात पाल चुकचुकली. 'पहिल्याच हल्ल्यात आम्ही दोन विमानें गमावली वाटतं!' पण...आणखी काही मिनिटांनी ती दोन विमानेदेखील आकाशात दिसू लागली. त्यांना पहाताच हर्षातिशयाने प्रत्येकजण ओरडला 'हुर्रे!' याचवेळी दुसरी सहा विमाने आकाशात झेप घेत होती कॉक्सस-बजारच्या दिशेने.

आपण केलेला हल्ला ठरवून दिलेल्या लक्ष्यावर अचूकपणे केला आहे किंवा नाही हे समजण्यासाठी प्रत्येक बॉम्बरवर फिल्म घेण्याची व्यवस्था असते. सहाही विमानांनी घेतलेल्या फिल्मस् डेव्हलप होऊ लागल्या. आमच्या अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर ते फोटो पहाताना स्मित झळकू लागले. हल्ला शंभर टक्के यशस्वी झाला होता! सहा विमानांच्या अग्निवर्षावामुळे चितगावच्या तेलटाक्या पूर्णपणे पेटवून पाकिस्तानी लष्करापुढे इंधनाची समस्या आम्ही उभी केली होती. शेवटी आलेल्या दोन विमानांनी चितगावचा विमानतळ उध्वस्त केला होता. चटकन डागडुजी करून तो वापरता येण्याजोगा नव्हता. विमानांची दुसरी तुकडीदेखील परतली. त्यांनी कॉक्ससबजारच्या विमानतळाचा निकाल लावला होता. आता आम्हाला भीती नव्हती सेबरजेटस्ची. अगोदरचा पूर्वभागात पाकिस्तानने तुटपुंजे विमानदळ ठेवले होते. आमच्या विमानदलाच्या माऱ्याने त्यातले अर्धेअधिक पहिल्या दोन दिवसांतच गारद झाले होते. आणि आमच्या विमानहल्ल्याने विमानतळावरील काही सेबरजेटस्ची मोडतोड झाली होती. हल्ल्यातून बचावलेली विमाने उडूच शकत नव्हती. विमानतळच खराब झालेले होते! तीन तारखेचा दिवस आम्हाला शंभर टक्के यश देऊन मावळला.

चार तारीख उजाडली. सकाळच्या प्रहरी विक्रांतच्या रडारवर दोन छोटे ठिपके दिसू लागले. आमच्या भोवती गेले तीन महिने घुटमळणाऱ्या त्या दोन पाकिस्तानी पाणबुड्या होत्या. अल्पावधीत विक्रांतवरून सर्वांना संदेश दिला गेला. 'दोन पाण-बुड्या आपल्याभोवती घुटमळत आहेत.' सध्यातरी त्या आमच्या माऱ्याच्या टप्प्यात नव्हत्या. त्या आमच्या जाळ्यात कधी येतात याची आम्ही वाट पाहू लागलो. टॉरपेडो विरोधी बॉम्ब फेकणारे गनर्स दक्षचित्ताने येणाऱ्या क्षणाची वाट पाहू लागले. भराभर हुकूम सुटू लागले. विक्रांतबरोबर आलेल्या आमच्या चार विनाशिका त्या पाणबुड्यांचा घास घेण्यास सिद्ध झाल्या. या दरम्यान आमच्या काफिल्याच्या कप्तानाने बियास, ब्रह्मपुत्रा आणि करसुरा या तीन विनाशिकांना त्या पाणबुड्यांचा समाचार घेण्यास सांगितले. विक्रांतच्या रक्षणासाठी किलतानची नेमणूक झाली. विक्रांतने आपला मार्ग बदलला. यावेळेपर्यंत आमची पाच जहाजे चितगाव आणि कॉक्ससबजारला समांतर रेषेत होती. विक्रांतने आपली दिशा

बदलून चितगाव आणि कॉक्सबजारला लंबरेषेत डाव्या बाजूने पूर्ण वेगानिशी किलतानसह मुसंडी मारली.

आमच्या तीनही बोटींनी त्या दोन पानबुड्यांना घेरण्याचे ठरवले. पण शत्रूही तितकाच चलाख होता. त्याच्या दोन पानबुड्यांपैकी एका पाणबुडीने आपला मार्ग बदलला आणि आम्हाला वळसा घालून विक्रांतच्या मागावर ती निघून गेली. आता राहिली आमची तीन जहाजे आणि ती पाणबुडी.

## माऱ्याची पद्धत

मारा करण्याची पाणबुडीची एक ठराविक पद्धत असते. मारा करण्यापूर्वी ती पृष्ठभागालगत येते. पेरिस्कोप बाहेर काढून शत्रूच्या जहाजांची टेहेळणी करते आणि चटकन पाण्याखाली डुबकी मारून नाहीशी होते. पाण्याखाली सुमारे २० ते ३० फूट गेल्यानंतर जहाजांवर टॉरपेडो सोडते. टॉरपेडो म्हणजे छोटया रॉकेट-सारखे दिसणारे एक स्फोटक अस्त्र. १० ते १२ फूट लांब आणि ३ ते ४ फूट व्यासाचे हे भयानक अस्त्र दोन प्रकारचे असते. पहिल्या प्रकारामध्ये येणाऱ्या टॉर-पेडोला आपली दिशा बदलता येत नाही. फेकलेल्या दिशेने ते सरळ रेषेत पुढे जात असते. दिशेच्या नियंत्रणासाठी दोन्ही प्रकारच्या टॉरपेडोंना पंखे (propellers) असतात. दुसऱ्या प्रकारचे टॉरपेडो, बोटीने आपली दिशा बदलली असता, आपलीही दिशा बदलून बोटीवर अचूकपणे आदळतात. दिशा बदलताना बोटीच्या पंख्याचा प्रचंड आवाज येतो. या आवाजाच्या ध्वनीलहरी आणि त्यांची फ्रीक्वेन्सी यांच्यामुळे बोट कोणत्या दिशेस जात आहे हे इलेक्ट्रॉनिक उपकरणाने समजू शकते. अशी उपकरणे या टॉरपेडोंचा मार्ग नियंत्रित करतात. टॉरपेडोचा एक आघात संपूर्ण बोट दुभंगण्यास पुरेसा असतो. टॉरपेडो फुटल्यानंतर बोटीच्या संपूर्ण तेल-साठयास आग लागते व बोट दुभंगून पहाता पहाता पाण्याखाली जाते. केवळ दोन ते तीन मिनिटे यासाठी पुरेशी असतात. शेवटी त्याठिकाणी बोटीच्या अस्तित्वाची खूण दर्शविणारा तेलाचा भलामोठा तवंग पाण्यावर शिल्लक रहातो.

इतक्यात त्या पाणबुडीने एक टॉरपेडो आमच्यावर फेकला. आमच्या तीनही बोटींवरील रडारवर वेगाने पुढे चाललेला छोटा ठिपका दिसू लागला. डेकवरील नौसैनिक पाण्याखालून जाणारे ते अस्त्र पाहू शकत होते. आमच्या तोफा धडधडू लागल्या. टॉरपेडो विरोधी तीन तोफगोळे आम्ही त्यावर सोडले. नाविक युद्धाचा अनुभव आम्हाला प्रथमच येत होता. आमचे तीन तोफगोळे त्या टॉरपेडोच्या आजू-बाजूला पडले. पण टॉरपेडोचा नेम तरी कुठे बरोबर होता? करसुराच्या बाजूलाच तो टॉरपेडो फुटला. पाणबुडीत चाललेले पंजाबी भाषेतील बोलणे आमच्या कंट्रोल-रूममध्ये स्पष्ट ऐकू येत होते. 'वियासपर फायर करो. उसको छोडो मत!' शत्रू प्राणपणाला लावून आमच्या तीनपैकी एका बोटींचा तरी घास घेण्यास सिद्ध झाला होता.

इतक्यात ब्रह्मपुत्रेच्या रोखाने पुढे जाणारे दुसरे धूड आम्हाला डेकवरून दिसले. प्रचंड वेगाने पाणी कापत जाणारे ते भयानक अस्त्र पहाताक्षणीच आम्ही ब्रह्मपुत्रेला संदेश दिला. 'टॉरपेडो तुमचा पाठलाग करीत आहे !' (Torpedo is following you !) क्षणाचाही विलंब न करता ब्रह्मपुत्रेने वेग घेतला आणि डाव्या बाजूस तिने मुसंडी मारली. बिचारा टॉरपेडो थोडयाच फुटांच्या अंतराने तिच्या जवळून निघून गेला. ब्रह्मपुत्रेने आपली दिशा वळवली. पाणबुडी तिच्या माऱ्याच्या टप्प्यात येईल अशा अंतरावर ती आली. या अवधीत आमच्यावर एक टॉरपेडो फेकला गेला होता. ती पाणबुडी आणि तो टॉरपेडोदेखील आता आमच्या माऱ्याच्या टप्प्यात होते. आमच्या गनरला हुकूम मिळाला 'फायर' आणि दुसऱ्या क्षणी त्या टॉरपेडोचे दोन तुकडे ! पाणबुडीच्या अंतराचा अंदाज घेऊन पुन्हा एक चार्ज फायर केला. आता आमच्या तीनही बोटीवरून पाणबुडीच्या आजूबाजूला गोळे उडत होते. अखेर पाणबुडीने नांगी टाकली. आम्हाला तिने संदेश दिला 'आम्ही पाण्यावर येत आहोत. कृपया हल्ला करू नका !' (We are surfacing do not attack) आणि ती पाण्यावर येऊ लागली. ही कदाचित चाल असण्याची शक्यता होती. दगाबाज शत्रूला दया दाखविणे मूर्खपणाचे होते. आम्ही ठरवले, 'No mercy business !' आमच्या गनरने एक निर्वाणीचा चार्ज फायर केला. त्या चार्जने आपली कामगिरी बरोबर बजावली. कानठळ्या बसविणारा आवाज करीत ती पाणबुडी शेवटचे आचके देत तळाशी जाऊ लागली. आमच्या बोटींवरील नौसैनिकांनी आनंदाने एकच हलकल्लोळ माजवला.

आम्ही विक्रांतला संदेश दिला. एव्हाना तिच्या मागावर असलेल्या पाणबुडीला आपल्याबरोबरची पाणबुडी बुडाल्याचे कळले होते. त्यामुळे तीदेखील गर्भगळीत अवस्थेत होती. पण जाताजाता एखादा हल्ला करून विक्रांतला धोका पोचविण्याचा तिचा प्रयत्न होता. या पाणबुडीचा समाचार घेण्यासाठी विक्रांतवरील एक बॉम्बफेकी विमान आकाशात अगोदरच भरारी मारू लागले होते. आकाशातून पाणबुडीचा वेध घेऊन त्याने खाली सुळकांडी मारली आणि एक डेफ्त चार्ज दणाणला. हा घाव पाणबुडीच्या वर्मिच बसायचा पण तिचे नशीब बलवत्तर म्हणूनच ती वाचली. विमानाच्या माऱ्यापुढे इथे आपली धडगत नाही असा जणू विचार करून विक्रांतचा नाद तिने सोडला आणि काढता पाय घेतला. पण नशीबानेच वाचलेल्या या पाणबुडीचे दिवस भरतच आले होते. पुढे पाच सहा दिवसांनीच आमच्या दुसऱ्या एका लढाऊ जहाजावर हल्ला करण्याच्या बेतात असतानाच जहाजावरील क्षेपणास्त्राने तिचा घास घेतला आणि तिला समुद्रतळ दाखविला. ही पाणबुडी होती अमेरिकेकडून कर्जाऊ मिळालेली 'गाझी !'

गाझीचा मुख्य उद्देश होता, विक्रांत आणि विशाखापट्टण या पूर्वेकडील नौदलाच्या तळांचा नाश करणे. विक्रांतचा नाद सोडल्यानंतर ती विशाखापट्टणच्या आसपासच

चावरत होती. पण युद्ध सुरू झाल्यानंतर चार पाच दिवसांतच पाकिस्तान्यांची पळापळ सुरू होऊन त्यांच्यात गोंधळ माजला. एका क्षणी तर एका भारतीय पुरवठा जहाजाच्या आसपासच ही पाणबुडी होती. या जहाजावर दारूगोळा व शस्त्रास्त्रे खच्चून भरली होती. हे पुरवठा जहाज असल्याने पाणबुडीविरोधी किंवा विमान-विरोधी अस्त्रे या जहाजावर नव्हतीच. एका टॉरपेडोने हे जहाज सागरतळाशी गेले असते. पण भांबावून गेलेल्या पाकिस्तान्यांनी या जहाजाकडे लक्षच दिले नाही आणि आपल्या सुदैवाने ते जहाज आपल्या कामगिरीवर सुखरूपपणे रवाना झाले !

## भरघोस यश

चार तारखेचा दिवस भारतीय नाविकदलाला भरघोस यश देऊन गेला. युद्ध सुरू झाल्यावर फक्त दोनच दिवसांत पाकिस्तानच्या एका पाणबुडीला यमसदनास पाठवून त्यांच्या चितगाव आणि कॉक्ससबजार या आरमारी तळाची लांडगेतोड करण्यात आम्ही यशस्वी ठरलो होतो. स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्याच आरमारी युद्धात अल्पावधीत इतका मोठा पराक्रम गाजवून आम्ही कान्होजी आंग्र्याचे वारसदार आहोत हे सिद्ध केले. पाणबुड्यांची भीती आता आम्हाला नव्हती. पाकिस्तानच्या चारांपैकी दोघींची थडगी पूर्व सागरात बांधली गेली होती. उरलेल्या दोन होत्या पश्चिमसागरात. त्यातली देखील एक कराचीवरील भारतीय हल्ल्यामध्ये पुढे गारद झाली. सहा तारखेपर्यंत भारतीय विमानदलाने पूर्व पाकिस्तानी आकाशावर पूर्ण कब्जा मिळवला होता. अशा प्रकारे हे युद्ध आम्ही जिंकणार हे पहिल्या आठवड्यातच निश्चित झाले !

सहा तारखेनंतर चितगाव आणि कॉक्ससबजारच्या जितके जवळ जाता येईल तितके जाऊन हल्ला करण्याचे आदेश आम्हाला मिळाले. दोन्ही तळांवर आम्ही अक्षरश: अग्निवर्षाव केला. विक्रांतवरील विमानांनी एका पाठोपाठ एक असे हवाई हल्ले करून तेथील विमानविरोधी तोफा बंद पाडल्या. विशेष गोष्ट ही की, आमच्या बॉंबहल्ल्यामुळे नागरी वस्तीची काडीमात्र हानी झाली नाही. चित-गावच्या विमानतळावरील कंट्रोल टॉवर नष्ट करण्याची आज्ञा आम्हाला मिळाली होती. आमचा मारा इतका अचूक होता, की फक्त कंट्रोल टॉवरच आमच्या दारू-गोळ्यांनी उध्वस्त झाला. आजूबाजूला असलेल्या नागरी वस्तीला थोडीदेखील इजा पोचली नाही. आमच्या अचूक फायरिंगचे खुद्द पाकिस्तानी लष्करातील अधि-काऱ्यांनी कौतुक केले.

पाकिस्तानी किनाऱ्याची नाकेबंदी आता कडकपण सुरू झाली. कारण लष्करी अधिकाऱ्यांची आणि सैनिकांची पळापळ सुरू झाली होती. भारतीय पायदळ झपाट्याने डाक्क्याभोवताली आपले पाश आवळत होते. सुरुवातीचा इशारा न मानणाऱ्या छोट्या बोटींना आम्ही सरळ समुद्रतळ दाखवीत असू. मग या बोटीतील सैनिक आणि अधिकारी यांना बोटीवर उचलून घ्यावे लागे. काही परदेशी व्यापारी जहाजे पाकिस्तान्यांनी चार्टर केली होती, तर काही युद्धसामग्रीची मदत घेऊन

आली होती. या जहाजांना तसे सोडून चालण्यासारख नव्हते. सुरुवातीच्या सहा दिवसांत आम्ही पाकिस्तानी व परदेशी मिळून १३ मोठी जहाजे पकडली. त्यांच्यावर करडी नजर ठेवणे भाग होते. आमचे लक्ष नाही हे दिसताच पाकिस्तानी जहाजे पळून जाण्याचा प्रयत्न करीत. विशेषत: रात्री ! पण आमचे तोफगोळे आजूबाजूला पडू लागले म्हणजे डेकवरील दिव्यांच्या द्वारे संदेश देऊन सरळ शरण येत. तरीही आमचे तोफगोळे थांबले नाहीत तर सरळ आमच्या बोटीशी दळणवळण प्रस्थापित करीत आणि म्हणत ' आम्ही शरण येत आहोत महाराज, तुमच्या आज्ञा आम्ही मुकाट्याने पाळू. कृपा करून भडीमार थांबवा ! ' (We are surrendering sir ! We will follow your orders obediently. Please stop your firing.)

काही परदेशी जहाजेदेखील पळून जाण्याची संधी शोधत. पण आमचा कठोर शब्दांतील हुकूम ऐकल्यावर किंवा एखादा दुसरा तोफगोळा शेजारी आदळल्यावर नांगी टाकत. पकडलेली जहाजे पळून जाण्याचा प्रयत्न करताक्षणी आम्हाला बुडवता आली असती. पण या जहाजांच्या राष्ट्रांकडून जहाज सोडवून घेण्यासाठी जहाजाच्या आणि त्यामध्ये असलेल्या मालाच्या किंमतीच्या निम्म्याइतका ' प्राइझ-मनी ' मिळतो. तोही परकीय चलनात तेव्हा ही जहाजे बुडवून टाकण्यात फायदा नव्हताच; तोटाच होता. अशी १३ जहाजे, सुमारे दोनशे गनबोटी आणि असंख्य छोट्या बोटी पकडल्या.

मोठ्या लष्करी आणि व्यापारी जहाजाची शरणागती घेण्यासाठी आमचा एक अधिकारी आणि मशीनगनच्या घोड्यावर बोट ठेवून हुकूमाची वाट पहाणारे काही नौसैनिक त्या जहाजाकडे जात. आमच्या बोटीवरून त्या जहाजाला अगोदरच आज्ञा गेलेली असे. ' मुकाट्याने शिडी खाली सोडा ! ' ' Lower the bloody ladder ) त्या शिडीवरून आमचा अधिकारी डेकवर जाताच प्रश्नांची सरबत्ती सुरू करी, ' कॅप्टन कुठाय ? ' कॅप्टन पुढे होई आणि लष्करी अदबीने सॅल्यूट ठोकून म्हणे ' मी इथे आहे महाराज ! ' कॅप्टनला हुकूम दिला जाई ' तुमच्या बोटीवरील सर्वांना इथे डेकवर ओळीने उभे रहाण्यास सांगा. प्रत्येकाजवळची शस्त्रे काढून घ्या. जहाजात कोणता माल आहे हे जाहीर करा आणि या शरणागतीच्या पत्रावर सही करा. लक्षात ठेवा कुठे दगा फटका करण्याचा प्रयत्न केला तर या माझ्या सैनिकांच्या हाती असलेल्या मशीनगन्स मधील गोळ्यांना रक्ताची तहान लागली आहे ! ' कॅप्टन बिचारा मुकाट्याने सही करी. पकडलेली सर्व जहाजें कलकत्त्यास न्यायची ठरले. मग प्रत्येक जहाजास कलकत्त्याची दिशा दिली जाई. ठराविक वेगा-शिवाय दुसरा वेग न वापरण्याबद्दल तंबी दिली जाई. इतकेच काय बोटींच्या इंजिनरूममधील ऑपरेटर्स देखील कलकत्त्यापर्यंत बदलण्याची परवानगी नव्हती. अशाप्रकारे मेंढरांच्या कळपाप्रमाणे भासणाऱ्या या जहाजांच्या कळपाबरोबर आय. एन. एस. राणा व रजपूत अशा जुन्या झालेल्या लढाऊ बोटी दिल्या जात

आणि मग संथगतीने हा जहाजांचा मांडा कलकत्त्याकडे कूच करी.

युद्धकाळात पाकिस्तानी रेडिओवरील खोटया बातम्यांनी आमची खूपच करमणूक होई. पुढे पुढे पाकिस्तानी रेडिओ लावून बातम्या ऐकणे ही बाब करमणुचीच्या सदराखालीच मोडली जाऊ लागली. ज्या दिवशी आम्ही पाकिस्तानी पाणबुडी बुडविली त्या दिवशी पाकिस्तान रेडिओ जाहीर करीत होता. 'आमच्या पाणबुडीने आय्. एन्. एस्. वियास ही भारतीय विनाशिका बुडवली आहे!' बोट बुडवल्याच्या आनंदात ड्रिंक घेत असलेल्या आम्हाला हा मोठा पार्टी जोक वाटला!

इकडे चितगाववर मुक्तिवाहिनीचे हल्ले जोरात सुरू झाले होते. मुक्तिवाहिनी आणि आमच्यामध्ये दळणवळण प्रस्थापित झाले होते. पाकिस्तानी विमानदलाच्या एका अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली चितगाव लढवले जात होते. मुक्तिवाहिनीच्या हल्ल्यांना दाद न देता प्राण पणास लावून पाकिस्तानी सैनिक लढवत होते. यावेळी आमच्या आरमारी युद्धाच्या टप्प्यास सुरुवात झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस नॉर्मंडीच्या किनाऱ्यावर दोस्त राष्ट्रांनी बोटी भरभरून सैनिक उतरवले आणि विजयी चढाईस जशी सुरुवात केली, त्याचप्रमाणे लॅंडिंगक्राफ्टस्‌मधून चितगावच्या किनाऱ्यास सैन्य उतरविण्याचे आम्ही ठरवले. तोफांच्या भडिमाऱ्यात सुमारे १८०० सैनिकांनी चितगावमध्ये प्रवेश केला. मुक्तिवाहिनी सैनिक आणि आमचे सैनिक यांच्या दुहेरी हल्ल्याने ऑक्सिजनवर ठेवलेला रोगी मृत्यूपुढे जशी शरणागती पत्करतो तद्वतच पाकिस्तानी सैनिकांनी आमच्यापुढे शरणागती पत्करली आणि शस्त्रे खाली ठेवली.

मुक्त चितगावमध्ये ज्यावेळी आम्ही पाय ठेवले तेव्हा पाकिस्तानी नराधमांनी केलेल्या क्रूर कत्तलींच्या खुणा जागोजागी आम्हाला आढळत होत्या. रस्त्याच्या आजूबाजूला कवटया आणि हाडे पडलेली दिसायची. आग लाऊन उध्वस्त केलेली घरे जागोजाग दिसायची, प्रत्येक घरावर बंदुकीच्या गोळयाच्या खुणा आढळून यायच्या. पाकिस्तानी सैनिकांच्या कॅंपमध्ये अत्याचार करण्यासाठी ठेवलेल्या निरपराध स्त्रियांची पातळे, त्यांची अंगवस्त्रे आढळून आली. लोकांकडून पाकिस्तानी राक्षसांच्या क्रूरकर्मांची कहाणी ऐकताना तर अक्षरश: अंगावर शहारे उठायचे पण हे सर्व विसरून मुक्त चितगावमधील आबालवृद्धानी केलेल्या आमच्या स्वागतास तोड नव्हती. त्याच्या दृष्टीने आम्ही भारतीय सैनिक मुक्तिदूत होतो. म्हातारे, तरुण, बालक, स्त्रिया यांनी केलेल्या आमच्या जयजयकाराने आकाश दुभंगून जाते की काय, असे वाटले. आमच्यावर फुले उधळण्याची, भेटी देण्याची, आमच्याशी दोन शब्द बोलण्याची त्यांच्यामध्ये अहमहमिका चालली होती. त्यांच्या चेहऱ्यावर मुक्तीचा आनंद ओसंडून वहात होता आणि डोळयांतून अश्रूंच्या रूपाने गेले नऊ महिने पाकिस्तानी क्रूरकर्म्यांनी केलेल्या राक्षसी अत्याचाराचे दुःख भळभळ वहात होते.

□ □ □



# स्नेहयात्रा

**सौ. निर्मला पुरंदरे : तीन**

ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये जवळजवळ सर्व युरोपमध्ये सुट्ट्या असतात. आपल्याकडे एप्रिल-मेमध्ये फक्त शाळा कॉलेजेसना असतात नं; तशाच परंतु तिकडे कारखाने, सरकारी यंत्रणेची कार्यालयं वगैरेंनाही सुट्ट्या. या सुट्टीतील कार्यक्रमाचं Planning अनेक कुटुंबांमध्ये उरलेले ९–१० महिने चालू असतं. पैसे, त्या अंदाजानं कौटुंबिक बजेटात शिल्लक टाकले जातात. आल्पस् पर्वतावर, कुठंतरी समुद्रकिनारी किंवा परदेशी भेट असा कार्यक्रम आखला जातो. तरीसुद्धा माझ्या माहितीप्रमाणे फ्रान्समध्ये सहा टक्के लोकच हा महागडा खर्च करू शकतात. इतर लोक थोडेच दिवस कुठंतरी हवापालट करून येणं पसंत करतात.

या सुटयांमध्ये शाळा कॉलेजेसतर्फे विद्यार्थ्यांसाठी आठ किंवा पंधरा दिवसांचे कँपस् घेतले जातात. बर्फावरचे खेळ शिकवणं किंवा पोहणं शिकवणं, मोकळ्या हवेवर काही कार्यक्रम आयोजित करणं, मुलांचं सामान्य ज्ञान वाढवण्याचं यात उद्दिष्ट असतं.

१५–२० दिवस आल्पस्मध्ये व १५–२० अटलांटिक मधील एक छोटयाशा बेटावर माझ्या सुट्टीची व्यवस्था होती. अर्थात याही काळात माझं वास्तव्य मित्रांच्या कुटुंबांमध्येच होतं. आल्पसच्या कुशीतलं ग्रनोब्ल हे फ्रान्समधील प्रसिद्ध शहर बरं का. औद्योगिक क्षेत्रात या शहरानं आघाडी मारली आहे. स्वच्छ, सुंदर, प्रशस्त रस्ते, उंचच उंच इमारती. अद्यावत सजावटीची डिपार्टमेंटल स्टोअर्स तुला येथे प्रकर्षाने पहायला मिळतील.

या दुकानांवरून आठवण झाली. आपल्याला सर्वस्वी नवीन असा हा दुकानांचा प्रकार आहे बघ. अशा दुकानांची सोय आपल्याकडे होण्यासाठी अजून फार काळ जावा लागेल. हातरुमालापासून ते मोटर सायकलपर्यंत सर्व जिन्नस एकाच दुकानात मिळण्याची सोय ही वेळ वाचवणारी आहे असं नाही वाटत ? खाद्य पदार्थ, वस्त्र-विभाग, स्वच्छता विभाग, सौंदर्यप्रसाधन विभाग, पेय विभाग, खेळणी विभाग, औषध विभाग, घरातल्या लहान सहान दुरुस्त्यांच्या उपकरणांचा विभाग, भाज्या, असे सर्व वेगळे पण एकाच तीन-चार मजली इमारतीतील विभाग पाहून मन थक्क होतं अगदी, प्रत्येक वस्तूवर किंमत लावलेली. दाराशीच मिळणाऱ्या ढकल-गाडीत आपल्याला पाहिजे त्या वस्तू घ्यायच्या. हिशेबनीस बाई गणकयंत्राच्या साहाय्याने परतताना वस्तूंच्या किंमतींची बेरीज करून देते. आपल्या पिशवीत जिनसा भरायच्या. ढकलगाडी तेथे ठेवायची की संपलं. गर्दी टाळण्यासाठी गृहिणी दुपारी खरेदीला जाणं पसंत करतात.

ग्रनोब्लच्या एका उपनगरात मी आठ दहा दिवस राहिले. या सुट्टीच्या काळात ठरलेला उद्योग काहीच नव्हता. श्री. रने व सौ. एडिथ लामिना दांपत्याला सात मुलं. दचकायला नको बरं का. आपल्या अगदी उलट फ्रान्समध्ये लोकसंख्येचा प्रश्न आहे. लोकसंख्येत वाढ कशी होईल या दृष्टीनं तिकडे प्रयत्न चालले आहेत. प्रसूती-काळातील रजेच्या सवलती तर आहेतच परंतु प्रत्येक मुलामागे पगाराच्या प्रमाणात सरकार बराच आर्थिक भार उचलते. महायुद्धामुळे झालेली अमाप मनुष्यहानी ही या लोकसंख्या टंचाईचं कारण असणार. पण या सर्व सवलती असल्या तरीही अधिक मुलं न होऊ देण्याकडेच सध्या कुटुंबांचा कल असतो. त्यामुळे ७–८ मुलं असणारी कुटुंब यापुढे आढळणं कठीणच.

रने व एडिथ हे दोघंही प्रेमळ. एडिथ खूप शांत आणि हौशी. दिवसभर तिचं काहीना काही काम चालू असायचं. अगदीच काही नाही तर कोणत्या तरी मुला मुलीला स्वेटर विणायचं काम तर नक्कीच. फार थंडी पाऊस नसेल तेव्हा अंगणात

न्याहरी-जेवणाचा कार्यक्रम असायचा. हे ग्रनोब्लचं उपनगर अगदी पूर्णपणे एखाद्या छोटया खेडयाप्रमाणे वाटत होतं. माझ्या खिडकीतून उठल्याउठल्या आल्पसूची बर्फाच्छादित, उन्हात चकाकणारी शिखरं पाहिली, की मन भरकटत केव्हाच हिमालयाच्या आठवणीत गुंतून जायचं बघ. आल्पस् हे हिमालयाचं धाकटं भावंडच म्हणेनास. खूप हिंडलो तिथे. निरनिराळया शिखरांवर, निरनिराळया मित्र-मैत्रिणींच्या गटावरोबर. पार्श्वसंगीतासारखी अमरनाथची घोडयावरून केलेली सफर गुणगुणत असायची. तेथील अमरगंगेचं झुळझुळणारं पाणी आणि आल्पस्-मधील अधूनमधून वाहणारं छोटया मोठया ओहोळाचं पाणी यात काही फरक असेल का? कडाडणाऱ्या थंडीत अमरगंगेत स्नान करणारे स्त्री-पुरुष पाहिले. तसला काही प्रकार येथे नाही. बे दुणे चार या गणिती वातावरणात श्रद्धाळूपणा काढता पायच घेत असावा नाही का?

अठरा हजार फुटांवर आम्ही एका रविवारी गेलो असता दोन वर्षांपूर्वी याच भागात एका गिर्यारोहक तुकडीतील दोघांचा मृत्यू, कडा अंगावर कोसळून झाल्याचं रनेनं सांगितलं. त्यातील एका गृहस्थांच्या पत्नी अपघाताच्या ठिकाणापासून जवळच एका सुरक्षित ठिकाणी एक झोपडी बांधून रहाताहेत. त्यारनेच्या ओळखीच्या असल्या-मुळे आम्ही सर्वजण त्यांच्याकडे गेलो. पतीच्या स्मृतीमध्ये त्याच्या मृत्यूनंतरही या अजस्र पर्वताच्या सान्निध्यात रहाण्याचं धाडस आहे नाही का? सुट्टयांमध्ये मुली, नातवंडं त्यांना भेटायला येतात.

सुट्टीमध्ये आल्पस्च्या निरनिराळया भागांना जत्रेचं स्वरूप आलेलं असतं, आता तर मोठमोठाल्या इमारती या प्रवासी लोकांसाठी बांधल्या गेल्यात. हॉटेल्सची चलती या काळात विचारूच नकोस. निरनिराळया खेळांच्या सोयी अद्यावत. एकदा अम्ही गेलो होतो तेव्हा तेथील चर्चमध्ये कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट लोकांची रविवारची एकत्र प्रार्थना झाली. हा प्रसंग चित्रित करण्यासाठी फ्रेंच टेलिव्हिजनचा संच मुद्दाम आला होता. फ्रान्समध्ये बहुसंख्य जनता कॅथॉलिक धर्माचीच आहे. धर्म, आचरण, रूढी यांवर आजकाल खूप चर्चा चालू असतात. तरुणवर्ग आता डोळसपणानं विचार करू लागला आहे. कॅथॉलिक-प्रॉटेस्टंट यासारखे धर्मभेद त्याना या काळात आवश्यक वाटत नाहीत. दर रविवारी चर्चमध्ये जाणारा तरुणवर्ग आता कमी दिसतो. त्याचप्रमाणे चर्चच्या नियमांविरुद्ध तेथील धर्मगुरूही आवाज उठवू लागले आहेत. धर्मगुरूनं अविवाहितच राहिलं पाहिजे. या मुद्यावर वाद-चर्चा चालू आहेत. अनेक वर्षांमागे, नव्हे शतकांमागे धर्मगुरूंसाठी कॅथॉलिक चर्चनं घालून दिलेले नियम आता कालानुरूप बदलले जावेत ही त्यांची मागणी आहे. या विचार-मंथनाचंच एक दृश्यफल म्हणजे धर्मगुरुच्या शिक्षणासाठी दिवसेंदिवस तरुणवर्गाचा मिळणारा अत्यंत कमी प्रतिसाद आहे. तिथं माझं कुतुहल जागं झालं. आपल्या धर्माच्या बाबतीत येथे आल्यावर मी एका वेदाध्ययन करणाऱ्या गुरुजींना विचारलं,

की तुमच्याकडे नवनवीन विद्यार्थी येण्याचं प्रमाण कसं काय आहे ? 'धर्माच्या सर्वांगाचा अभ्यास करण्यास कमीत कमी बारा वर्षं लागतात. त्यानंतर नेमका नजरेत भरेल असा फायदा निश्चित सांगता येत नाही. यामुळे या शिक्षणास विद्यार्थी जवळजवळ येत नाहीतच.' असं त्यांनी सांगितलं. तुला नाही का असं वाटत, की कालानुरूप धर्माकडे आम्ही डोळसपणानं पाहिला नाही, पद्धतशीर शिक्षण दिलं गेलं नाही तर धर्मातील या काळाशी विसंगत गोष्टींबरोबरच चांगल्या, उपयुक्त गोष्टीही यापुढील विलक्षण पिढीच्या हयातीत नाहीशा होतील म्हणून ? शिक्षण, उद्योगधंदे, शेती वगैरे अनेक गोष्टींबरोबरच धर्माच्या क्षेत्रातही आपल्याला खूपच काम करावं लागेल, सर्वसामान्य माणसापर्यंत एक नवा धर्मविचार पोचला पाहिजे असं वाटतं.

म्हणशील काय पुढारी थाटाच्या गोष्टी बोलायला लागली की काय तरी ! पण तिकडे जे जे पाहीन, अनुभवीन त्याची मनाच्या पार्श्वभूमीवर आपल्या देशातील परिस्थितीच्या संदर्भात लगेच प्रतिक्रिया उमटणं सहाजिकच नाही का ? फ्रान्समध्ये या धर्मविषयक चर्चा पाहून, ऐकून मला माझ्याच धर्माबाबत फारशी माहिती नसल्याचं लक्षात आलं. अर्थात पूजा-अर्चा, देवळात जाणं, नवस बोलणं, यात्रा करणं यापेक्षा काहीतरी भरीव ज्ञानाच्या संदर्भात म्हणते मी. कुठलीही अन् कशाचीही बरोबरी करण्याच्या प्रयत्नापेक्षा हे मला पटलं, की जी गोष्ट आपण आचरतो ती का व कशासाठी हे समजावून घेण्याइतकं कुतुहल, जिज्ञासा आपल्या ठिकाणी असेल तर जे शिक्षण घेतो त्याचा आहे त्यापेक्षा जास्त उपयोग होऊ शकेल. नाही का !

कुठल्या कुठे गेले रे मी आल्प्समधून ! मी तुला म्हटलं होतं, की माझ्या सुटीतील १५।२० दिवसांचा काळ अटलांटिक महासागरातील बेल-इल (Belle Ile)—सुंदर बेट-नावाच्या चिमुकल्या बेटावर जायचा होता. १९६८ मध्ये फ्रान्समित्र मंडळातर्फे पुण्यात आलेले श्री. मिशेल व सौ. एडविज आच्ये यांच्याबरोबर त्यांच्या सुटीतील निवासस्थानी जाणार होते मी. चक्क रात्रीच्या १२ तासात रेल्वेनं मी फ्रान्सच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे गेले. रेल्वेचा प्रवास आपल्याइतका त्रासदायक होत नाही. बर्थचं रिझर्वेशन केलं होतं. अंथरूण-पांघरूणही रेल्वेत मिळतं. थंडी वारा गाडीच्या वेगामुळे असह्यच. त्यामुळे खिडक्या जाम बंद. गर्दी आपल्या मानानं खूपच कमी.

पहाटे पाच वाजता गाडीनं नॉन्त (Nantes) या फ्रान्सच्या पश्चिमेकडील एका मोठ्या शहरात आले. अटलांटिक सागराच्या किनाऱ्यावरील हे एक प्रमुख गाव. स्टेशनवर मिशेल व एडविज आले होते. मी जेथे उतरले बरोबर तिथंच ते उभे होते. हो, मारी फ्रान्स्वॉजनं त्यांना कळवलं होतं खरं, की रिझर्वेशन अमुक अमुक डब्यात आहे म्हणून. त्यांनी हा डबा कुठं येणार ही चौकशी केली असावी. दोघांनी 'नमस्ते' असं हात जोडून स्वागत केलं. आता गडबड माझी उडाली होती. गेले ५।६ महिने कोणाला भेटल्यावर हस्तांदोलन करायची सवय झाली होती.

नमस्काराला चटकन हात जुळले नाहीत हे माझ्या लक्षात आलं आणि त्यांच्याही. हसलो सर्वच जण.

नॉन्तपासून १० कि. मीटर्सवरील एका उपनगरात आच्ये कुटुंब रहातं. रस्त्यात मिशेल म्हणतात, ' काय ग तुझ्या गाडीची वेळ बाई ! पहाटे चार वाजल्यापासून घड्याळाकडे पहातोय. झोप लागू नये म्हणून धास्ती नं ! ' म्हटलं, ' मी पण गाडीत केव्हापासून जागी. मलाही धास्ती होती की नॉन्त ओलांडून एकदम समुद्रात कोसळते की काय ! '

उपनगरातलं श्री. आच्ये यांचं घर अगदी सुरेख, शांत वातावरणातलं आहे. चहा न्याहरी आवरून एडविज बरोबर घराच्या अंगणातून चक्कर मारत असताना मध्येच एका ठिकाणी थांबून एडविज म्हणाली, ' बघ, येथून त्या तिकडे बघ. तो येथील चर्चचा कळस दिसतो आहे नं ! म्हातारपणी हातपाय थकले, तरी बागेतून तो कळस पाहून मी माझ्या मनाचं समाधान करून घेईन. घर बांधण्यासाठी जागा निवडताना हा उद्देश मनात होता. ' घराचं बरंच काम अजून व्हायचंच होतं. त्यांची सर्व मुलं सुट्यांसाठी कुठं ना कुठं गेली होती. घरात आम्ही तिघंच. आपल्याकडे आपण घरांच्या भितींना रंग देतो ना, तर तिकडे निरनिराळ्या रंगातील, निरनिराळ्या डिझाइन्स असलेले सुरेख कागद भितींना लावतात. त्यामुळे प्रत्येक घरात नाविन्य असतं. दिसायलाही छान दिसतं. श्री. आच्ये यांच्या नवीन घरात हे काम चालू होतं. गडी माणूस ठेवणं फारच महागाईचं पडतं तिकडे. त्यामुळे बाहेरची कामं संभाळून जसाजसा वेळ मिळेल तसतसं ते काम ही दोघं नवरा-बायकोच करतात. दोघंही जण हौशी, उद्योगी आणि प्रेमळ, अगत्यशील आहेत. मुलांना कामं नको, जबाबदारी नको असं आपण म्हणतो, तेच त्यांच्याही वाट्याला आलं आहे. आपलं घर सुरेख दिसावं, चार लोकांनी घरी यावं, काही सामाजिक कामांमध्ये भाग घ्यावा असं मिशेल, एडविज यांना मनापासून वाटतं. ती करतातही खूप. मुलं त्या सर्वात मनापासून सहभागी होत नाहीत, याचं अर्थातच त्यांना वाईट वाटतं. एडविज बोलून दाखवते. मिशेल चुपचाप असतो एवढंच.

दोन दिवस नॉन्तला थांबून सुटीसाठी बेल-इलला जायला निघालो. १५ दिवसांचं सामान बरोबर घ्यायचं होतं. आमच्या मोटरीत आमच्याबरोबर आता एक नवीन सहप्रवासी होता. ओळख बरं नाही नं ओळखू शकणार ? ऐक तर मग. छंद म्हणून घेतलेली छोटीशी शिडाची होडी. तिचं नाव मला नाही आता आठवत. सेन्ट सँज्याँ जॉन की कायसं असावं. ती होडी मोटरीला मागे व्यवस्थित बांधून आता आमच्याबरोबर रहाणार होती. मिशेल या अशा समुद्रसफरीचे अति वेडे आहेत असं नंतर माझ्या लक्षात आलं.

बेल-इलला पोचण्यासाठी किबरों (quiberon) या फ्रान्सच्या पश्चिमेकडील बंदरावरून निघालो व समारे पाऊण तासाच्या बोटीच्या प्रवासानंतर बेल-इलला

पोचलो. मोठ्या बोटींमधला माझा हा बहुतेक पहिलाच प्रवास. संध्याकाळची वेळ होती. २५–३० मोटारी व ५०० माणसं पोटात घेऊन बोट निघाली. आम्ही डेकवरच उभे होतो. बोटीच्या आवाजाव्यतिरिक्त येणारा लहानमोठ्या लाटांचा आवाज सागराची विशालता, गांभिर्य समजावून द्यायला पुरेसा नाही वाटल्या. एडविज-मिशेलच्या चेष्टामस्करीला तोंड देतादेता मन कुठल्या कुठं उडालं होतं माहीत आहे ? मला आठवले ते सावरकर ! ' ने मजसी ने...' या उत्कृष्ट काव्याचा लहानपणी शाळेच्या पुस्तकात जेव्हा परिचय झाला नं तेव्हा त्या परिचयाच्या पार्श्वभूमीवर मी खडकावर पाण्यात पाय सोडून बसलेल्या तरुणाचं रेखाचित्र काढलं होतं. आणि समोर अथांग सागर पसरला होता. आणि या दोन अथांग, गंभीर संवेदनांतून एक भावना मूर्त झाली. या आर्त काव्याच्या आठवणीनं माझं मन खरंच कासावीस झालं. त्या शब्दांचं सामर्थ्य अशा वेळी प्रतीत होतं का ?...माझ्या नकळत मी गुणगुणत होते, ' ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला.' मिशेल-एडविजना हा प्रसंग सांगत होते.

लहानमोठ्या लाटांवर बोट हेंदकाळत होती अन् मनही असंच आठवणींच्या लाटांवर हेलकावे घेत होतं. एकीकडे गंमत वाटत होती, तर पुढच्याच एखाद्या मोठ्या हेलकाव्यानं ब्रह्म आठवत होतं लाटांचं पाणी तोंडावर स्प्रे केल्यासारखं ताजंतवानं करत होतं आणि जिभेला खारट चव चाखवत होतं.

बेल-इलला घरी पोचायला रात्र झाली. घर सगळं चकपक होतंच. शेजारच्या मादलेन आजी चौकशीला आल्या. आच्ये कुटुंब येथे नसतं, तेव्हा या शेजारीणबाई त्यांच्या घराची काळजी घेतात. मादलेनचं वय ८० वर्षांच्या आसपास आहे. ही प्रौढ कुमारिका जन्मभर एकटीच आपल्या या छोट्याशा घरात रहाते. बेल–इलच्या या छोट्याशा परिसरातील बित्तंबातमी मादलेनला असते. सगळ्या गावात तिच्याबद्दल चांगलं बोललं जातं. आच्ये मंडळी तिला आपल्या घरातलीच मानतात. मिशेलच्या चेष्टेच्या तावडीतून मादलेनची मुळीच सुटका होत नाही. मादलेननं उभ्या आयुष्यात पाहिलेली पहिली भारतीय स्त्री मी होते. रोजच आमची तिच्याकडे किंवा तिची आमच्याकडे चक्कर असे. वय झालेलं असलं, तरी मनानं कणखर अशी ही बाई फार स्वाभिमानी हं. तुला गंमत सांगते. मी तिला माझ्या पुढच्या मुक्कामावरून एक पत्र पाठवलं होतं. तिनं पाठवलेल्या पत्रावर पत्ता इतका गंमतीदार लिहिला होता की बस्स्. माझ्या ओळखपत्रावर पुण्यातला पत्ता होता नं. त्यावरील थोडा भागही तिनं त्या पत्त्यावर लिहिला होता. मला आठवतंय, की तो असा होता, ' मादाम निर्मला, साने गुरुजी रस्ता, इंडिया, ब्रेस्से.' आणि नवलाची गोष्ट अशी, की हे रस्त्याचं, गावाचं, देशांच्या नावाचं कडबोळं असलेलं पत्र मला वेळेवर मिळालं. अशी ही मादलेन.

बोलून चालून बेल-इल हे विश्रांतीस्थान. त्यातून अटलांटिकमधील, अंगठीतल्या

सुबक खड्यासारखं, नकाशात ओळखायलाही जरा पंचाईतच व्हावी असं, अगदी छोटंसं बेट. नेहमीची वस्ती ४००–५०० पेक्षाही कमीच. सुट्यांमध्ये मात्र जिकडे तिकडे माणसंच माणसं. दुकानांची, हॉटेलसची चलती याच दिवसांत. ऑगस्ट–सप्टेंबरमध्ये, समुद्रात मनसोक्त डुबायचं नि मऊसूत वाळूवर, उन्हात लोळत पडायचं. या सुटीत आपला पिठासारखा पांढरा रंग थोडा सावळा झाला, तर कोण आनंद वाटतो त्यांना म्हणून सांगू !

आमच्या छोट्याशा बोटीतून मिशेल, मी व एरवे नावाचा एक मुलगा रोज दुपारी बोटिंगला जात असू. सकाळी उठलं, की अंगणात उभं राहून, खिशातला रुमाल वाऱ्यावर धरून वाऱ्याची दिशा पाहायची अन् दुपारी कुठल्या भागात बोट न्यायची ह्याचा किंवा माशांचा गळ लावून कुठं बसायचं याचे बेत मिशेल करत असत. वाळूवर लांब आणून ठेवलेली बोट पुन्हा ओढतओढत किनाऱ्यावर न्यायची, शीड उभारायचं, वगैरे करेपर्यंत अर्धा तास तरी जायचा. अंगावरील ते संरक्षक



पट्टे बांधले असले तरी साडीमुळे मनात नेहमी धाकधुक. समुद्राचं रंगरूप रोजचं निराळं. पाण्यावरची स्की व मोटर बोट यांचा मनसोक्त आस्वाद अबाल-वृद्ध घेत असत. बोटिंगच्या स्पर्धांमध्ये मुलं-मुली भाग घेतात. सुटीचा मनमुराद आनंद लुटतात.

आर्थिक संपन्नता असणारी कुटुंबंच या सुट्यांचा लाभ घेऊ शकतात. एरवी शिस्तीच्या कामांमध्ये काचलं गेलं मन अन् शरीर येथें काळजीमुक्त करून हा काळ घालवायचा, सगळं विसरून फक्त निसर्गाच्या सान्निध्यात रहायचं हा उद्देश. परंतु या २–२॥ महिन्यांच्या काळात विद्यार्थ्यांनी काय करायचं. शाळा-कॉलेजांशी असलेला संबंध फार खंडित होऊन पुन्हा तो सुरळीत चालू करायला थोडा त्रासच पडतो. तेव्हा ही सुट्टी एवढी मोठी असावी का असा आता लोक विचार करू लागले आहेत.

मीही एका अर्थानं या काळात विद्यार्थीच होते! फ्रेंच वाचायचं, स्पेलिंग्ज काढायची, सकाळी न्याहरीच्या किंवा जेवणाच्या वेळी एडविज्-मिशेलकडून अडचणी विचारून घ्यायच्या हा उपक्रम चालूच होता. घराच्या अंगणासमोर बेल-इलच्या पद्धतीप्रमाणे दगडी भिंत, पारासारखा उपयोग होईल अशी, बांधणं हे काम या सुटीत मिशेलनं ठरवलं होतं. मी लहानलहान दगड फोडून कपऱ्या करून द्यायच्या, एडविजनं वाळू-सीमेंट मिसळून ते मिशेलना पुरवायचं व मिशेलनं दगड रचून भिंतीला आकार आणायचा, अशी वाटणी झाली होती कामाची. ही कामं करता करता मिशेलचं गोष्टी सांगतसांगत मला फ्रेंच शिकवणं चालूच असायचं. 'आता हा कट्टा जोपर्यंत असेल तोपर्यंत आम्हाला निर्मलाची आठवण रहाणार.' असं म्हणत, कट्ट्यावर बसून गप्पा मारायला यायचं त्यांनी मला आमंत्रण देऊन ठेवलं.

या दोघांचा कष्टाळूपणा, प्रेमळपणा, जीवनाची हौस, श्रद्धाळूपणा यांच्या पार्श्वभूमीवर मुलांची सुखलोलुप वृत्ती, स्वतःकडेच बघण्याची प्रवृत्ती ही मला तरी फार खटकत असे. अशा या दोघांना आता त्यांच्या वृद्धपणी फारशी चिंता करावी लागू नये असं साहजिकच मला वाटत होतं. पण आता जगभर एकूण जीवनालाच विलक्षण वेग आला आहे. दोन पिढ्यांमधील अंतर झपाट्यानं वाढतं आहे. साहजिकच जिव्हाळा, ओढ कमी होत चालली आहे असं लक्षात येतं. आपणही या फेऱ्यात सापडणार आहोत. त्याला उपाय नाही.

आज या आच्ये कुटुंबातील वास्तव्याचा माझा शेवटचा दिवस. पुढच्या मुक्कामात ज्यांच्या घरी रहाणार होते, ते कुटुंब माझ्या मुळीच ओळखीचं नव्हतं. ती पति-पत्नी मला घ्यायला येणार होते. मिशेल-एडविज हळूच आपल्या खोलीत जाऊन भारतीय पोषाखात आले. मला तर सकाळपासून इतकं अस्वस्थ वाटत होतं बघ. त्यांची सगळ्यात धाकटी मुलगी मिमी, सारखी माझ्या अवतीभवती करत होती. दुसरं कुटुंब आता कसं असेल याची तिला माझ्यासाठी काळजी वाटत होती. वेडी कुठची.

जॉर्ज मुस्ताकी या सुप्रसिद्ध फ्रेंच गायकानं गायिलेल्या काही प्रसिद्ध ध्वनिमुद्रिकां-मधील गाणी लिहून दिली व म्हणते, 'तू पाठ कर ही गीतं.' हो म्हटलं मी. आजही मनातल्या मनात काही ओळी गुणगुणल्या, की हेमिंग्वेसारख्या दिसणाऱ्या मुस्ताकीची आणि त्या गोड मिमीची आठवण येते.

दुपारी श्री. अल्बेर व सौ. सोलाँज कँतों हे उभयता ठरल्याप्रमाणे घ्यायला आले. त्यांच्याबरोबर १९६९ मध्ये पुण्याला आलेला ॲलँ शमँ हा कॉलेज-तरुण आला होता. फ्रान्सच्या पश्चिम भागात मी जवळजवळ ४ महिने रहाणार होते. ॲलँ या वास्तव्याची व्यवस्था करणार होता. त्याचा व माझा अगोदरचा परिचय जुजबीच होता. आता भाषेची अडचण दूर झाल्यामुळे बरंच सुलभ झालं होतं. त्याच्या पत्त्यावर आलेली खिसाभर पत्रं त्यानं मला दिली. या पत्रांच्या सोबतीचं इतकं महत्त्व कधीच वाटलं नव्हतं बघ. पण आनंदाची गोष्ट, की मला संपूर्ण वर्षभर भारतातून नि फ्रान्समधूनही सतत पत्रं येत होती. अर्थात लिहावीही लागत होती बरं का! पत्रलेखनाचा माझा छंद या वर्षभरात चांगलाच पुरवून घेतलास म्हणेनास का!

आच्ये कुटुंबातील 'निरोप समारंभ' पाहून सोलाँज-अल्बेर जरा गडबडलेच. नंतर मला म्हणाले, 'अग, आम्हाला वाटलं, त्या कुटुंबानं तुझ्यावर किती प्रेम केलं हे त्यांना व तुला दूर होताना किती जड वाटलं यावरून आम्ही ओळखलं आणि आमच्या घरी आमच्यानं कसं इतकं आतिथ्य करणं जमेल अशी धास्ती आम्हाला वाटली.' पण एक-दोन दिवसांतच त्यांची धास्ती दूर पळाली. या कुटुंबानं भारता-बद्दल कधीही काही पाहिलं–ऐकलं नव्हतं. भारतीय मनुष्य पाहिला नव्हता. नाही म्हणायला मी त्यांच्या घरी होते त्याच सुमाराला त्यांचा मोठा मुलगा जिल हा आमच्या फ्रान्स मित्रमंडळातर्फे फ्रान्समधून आलेल्या गटाबरोबर पुण्यातल्या एका कुटुंबात आतिथ्याचा लाभ घेत होता. त्याचं आलेलं पत्र वाचून ही मंडळी अगदी भारावून गेली होती. जिलनं एका पत्रात लिहिलं होतं, 'भारतातला या कुटुंबातला माझा मुक्काम हा माझ्या आयुष्यात, आकाशात वीज जशी क्षणभरात लखकन् आपलं अस्तित्व दाखवून जाते, तसा फारच अल्प पण कायमचा स्मरणात राहील असा झाला आहे. पुन्हा भारतात येईन तो दीर्घ काल रहायला येईन.'

या कुटुंबाचा व्यवसाय म्हणजे वासरं विकत घ्यायची, वाढवायची व नंतर मांसासाठी त्यांची विक्री करायची. गाव अगदीच लहान. ३००–४०० वस्तीचं. यांचं सुरेखसं घर, दोन गाड्या, गाईंचा गोठा. दुधाची व्यवस्था जरी संपूर्ण यांत्रिक पद्धतीनं होत नसली तरी हळूहळू जमेल तसतसं यांत्रिकीकरण चाललं आहे. खाऊन पिऊन सुखी असलेलं हे कुटुंब. पण तुला सांगते, की इथली मुलं कशी शिस्तीत वाढत असतात. आता जिल भारतात येणार होता नं! तर ते प्रवासाचे पैसे जमवण्यासाठी त्यानं रेल्वेतील कामगाराचं काम करून, तसंच एका द्राक्षाच्या दुकानात द्राक्षं मोजण्याचं काम करून जमवले. तेही पुरेसे नव्हते तर सोलाँजनं, त्याच्या आईनं

त्याला उरलेले कर्जाऊ म्हणून दिले. भारतातून परत गेल्यावर शक्य तेव्हा नोकरी करून तो ते पैसे फेडणार आहे आणि हे अगदी सहज होतं. यात कोणाला काही अब्रह्मण्यम् वाटत नाही. कुटुंबात सर्वांचे एकमेकांशी संबंध स्नेहाचे आहेत. तुला सांगते, अरे हा जिल भारतातून ज्या दिवशी पॅरिसला व नंतर गावी येणार म्हणून कळलं होतं नं तेव्हा त्याची आई व धाकटा भाऊ पात्रिक इतके कासावीस झाले होते की बस्स्. टेलिफोनची घंटी वाजली, की हातातलं काम सोडून दोघांनी एकदम पळावं. 'जिलच असणार' असं पुटपुटत. अपेक्षेपेक्षा खूपच उशीर लागला बरं का त्याला. शेवटी रात्री १० ला फोन आला, की आमच्या छोट्या गावापासूनच्या मोठ्या रेल्वेस्टेशनवरून बोलतोय. गाडी घेऊन या म्हणून. लगेच अल्बेरनं गाडी काढली. आम्ही सर्वजण ४० कि. मीटर्सवरील लाव्हाळ नावाच्या गावी गेलो. गंमत सागू का? त्यानं सांगितलं, 'पॅरिसला आमचं चार्टर विमान उतरलं. सर्वांची कस्टम तपासणी झाली नि फक्त मलाच अडकवून ठेवलं.' का तर म्हणे त्याची दाढी वाढली होती. तेव्हा तो हिप्पी आहे आणि त्याच्या सामानात त्यानं पुण्याहून नेलेली भिकुसा यमासा क्षत्रीय छाप विडयांची बंडलं, उदबत्त्या होत्या. तेव्हा त्यात बहुतेक अफू असावी. अगदी त्यानं पुनःपुन्हा ते काय आहे हे समजावून सांगितल्यावरही त्यांनी चक्क त्यातील काही विडया, उदबत्त्या पेटवून कशा जळतात, कसा वास येतोय हे पाहून, ती अफू नाही याची खात्री करून घेऊन मगच त्याला जायला परवानगी दिली. त्याला झालेल्या उशीराचं हे कारण ऐकून हसावं की रडावं हेच समजेना. या हिप्पी तरुणांची पोलीस, कस्टम्सनी इतकी धास्ती घेतलीय बघ आणि मग फ्रेंच पोलीस हाही तरुणांच्या टवाळीचा विषय झालाय.

जिलच्या पुणे-प्रवासाच्या निमित्तानं भारताशी झालेली ओळख नि लगेच माझं त्यांच्या घरचं वास्तव्य यामुळे कँतो कुटुंब, त्यांचे स्नेही, नातलगांना भारताच्या अस्तित्वाची जाणीव झाली. इतक्या प्रेमानं, जिव्हाळ्यानं वागले सर्वजण, की विचारू नकोस. यांच्या घरी असताना वृद्धाश्रम, शेतीची जुनी नवी पद्धत, दुधाच्या डेअऱ्या, सामुदायिक पद्धतीनं केलेली शेती, गुरांचे बाजार, खेड्यांमधील आठवड्याचे बाजार, खेड्यातील कुटुंबांचं जीवन, लहानलहान शाळा वगैरे पाहण्याची संधी मिळाली. चहा-जेवणाच्या निमंत्रणांच्या निमित्तानं भारताची माहिती सांगण्याची संधी मिळाली. Slides shows कितीतरी झाले. वृत्तपत्रांनी मुलाखती घेतल्या. या संपूर्ण प्रवासात, एका गोष्टीला अनंत वेळा तोंड द्यावं लागलं, अन् ती म्हणजे युरोपियन लोकांची कल्पना असलेला 'इंडिया' म्हणजे भारत नव्हे; तर दक्षिण अमेरिकेतील रेड इंडियन्स, उदाहरणार्थ एकच गंमत सांगते. ती माझ्या यापुढच्या मुक्कामात झाली. पण आठवली आताच.

एका मोठ्या शहरात होते मी तेव्हा एका कुटुंबात. मला व माझ्या मैत्रिणीला रात्रीच्या जेवणाचं निमंत्रण होतं. आम्ही दोघी वेळेवर गेलो. बेल वाजवली. दार



Swastik FOAM
is so intimate because...
It is restful: Lie back and relax. Swastik Foam offers a soft support to your tired limbs.
It is protective: Does not harbour insects and is anti-moisture too. Keeps cool and fresh by "breathing" through a million air-cells
It is dependable: Lasts a lifetime. Can be used wherever cushioning is needed, so you're always supported by the gentle firmness of Swastik Foam. Available in a wide range of ready-to-use items like back rests, car seats, bolsters, mattresses and pillows, as well as by the metre in hard, medium or soft foam.
Swastik Foam– for the rest in your life.
SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
Swastik House,
Kirkee, Poona 3.
Dattaram-SRP-4-A

उघडून घरमालक व त्यांच्या हाताला धरून त्यांची ६।७ वर्षांची मुलगी समोर उभे. क्षणभर मला निरखून पहात ते आपल्या लेकीला म्हणाले, "पाहिलंस किती सुरेख कपडे आहेत यांचे. बघ यांच्या कपाळावर कुठं आहे पिसांचा मुकुट?' या या संभाषणानंतर क्षणभरातच माझ्या डोक्यात उजेड पडला की, टेलिव्हिजनवर काऊ-बॉय छापाचे रेड इंडियन चित्रपट सतत पाहून आपल्याकडे येणारी इंडियन ही अशाच वेशात, धनुष्यबाण, पिसांचा टोप घालन येणार ही तिची कल्पना.

महात्मा गांधी, विनोबा भावे, वेरुळ अजिंठ्याच्या लेण्यावर, हिंदु धर्मावर वगैरे निरनिराळ्या विषयांवर आज फ्रेंचमध्ये पुस्तकं उपलब्ध आहेत. पूर्वेकडील या देशाकडे पाहण्याची आजपर्यंतची दृष्टी बदलू पहाते आहे. तरीपण हे झालं जरा वैचारिक पातळीवर, सर्वसामान्य जनतेमध्ये फार अज्ञान आढळून येतं. भारताची यथायोग्य ओळख करून देणं, स्वातंत्र्यानंतरच्या सर्व क्षेत्रातील वाटचालीचा परिचय करून देणं आणि हे कल्पकतेनं-चातुर्यानं करणं ही भारताच्या परराष्ट्रांच्या संबंधित अनेक जबाबदाऱ्यांपैकी एक फार महत्वाची जबाबदारी आहे असं फ्रान्समध्ये वावरताना मला आढळून आलं. एवढ्या बाबतीत मी तुर्त अभिमानानं सांगू शकते की आमच्या फ्रान्स मित्रमंडळ व फ्रान्समधील पुणे-मित्रमंडळ या संस्थांच्या कौटुंबिक पातळीवरील परस्पर परिचयानं फार कौतुकास्पद काम केलं हे खरं आहे. महाराष्ट्रात येऊन गेलेल्या सुमारे ४०० फ्रेंच लोकांनी भारताबद्दल जिव्हाळ्याची, स्नेहाची स्मृती बरोबर नेलेली आहे. आपल्या भारतातील महिनाभराच्या वास्तव्यावर ही मंडळी निरनिराळ्या गटामध्ये आपल्या जवळच्या स्लाईडसच्या सहाय्यानं फार अभिमानानं, कळकळीनं, आपुलकीनं बोलताना आढळली. फ्रान्स मित्रमंडळाच्या परिश्रमांना हे फळ आम्हाला अनपेक्षित होतं. मला संपूर्ण मुक्कामात त्याचं महत्व पटलं. यापुढेही अनेक प्रकारांनी ही योजना वाढवणं, निरनिराळ्या स्वरुपांत आकर्षक करणं शक्य आहे. अर्थातच आम्ही प्रयत्नात आहोत,

लिहिताना अनेक आठवणी वर उसळून येताहेत. नेमकी कुठलीच जबाबदारी माझ्या प्रवासात माझ्यावर टाकलेली नव्हती.फ्रेंच कुटुंबजीवन अनुभवणं, सामाजिक संस्था पहाणं, सामाजिक कार्यकर्त्यांसाठी असलेले काही अभ्यासक्रम करणं व १।२ संस्थांमध्ये तेथील कार्यकर्त्यांबरोबर काम करणं, यांचा अन्तर्भाव माझ्या कार्यक्रमात तेथील ऑफिसनं केला होता.

(क्रमशः)

खतूडलेले आम्ही. तिच्यापायी. ती खुषीत. या गुंडाळीवरून त्या गुंडाळीवर दोरा भरत. दात नसलेल्या तोंडात जीभ लकलका हलवत. लालबुंद पडलेल्या, नावाला असलेल्या एवढाश्या नाकावर पडलेल्या सुरकुत्या. डोळ्यांत वेडं हंसू, जगाची पर्वा नसल्यासारखी.

किंकाळ्या फोडत, गुदमरणारा आमचाच प्राण... तिच्या पिंगट डोळ्यांनी घेतलेला प्राण. आमच्या मनाला लागलेलं बांडगूळ. आमच्याच जीवावर पोसत असलेलं. आमचा जीवनरस संपायच्या आत ते कुणीतरी तोडलं पाहिजे. कोण तोडणार ? ती राजाची लाडकी होती. वेडी होती म्हणूनच राजाची लाडकी होती. तिला रागवणाऱ्याला राजा डोळ्यांनी फटके मारायचा. बोलायचा नाही. पण



त्याच्या डोळ्यांकडे पहायला भीती वाटायची तेव्हा ती घोरायची. ती घोरायची तेव्हा आम्ही फटके खात रडायचो.

ती वेडी होती म्हणून सकाळी उठल्यावर, हंसत बसायची. आणि दर दिवशी आम्ही दुबळे व्हायचो. कण कण शक्ती नाहीशी व्हायची. चहा अंगावर सांडला तरी हंसायची. अर्थशून्य. अंगावर भात सांडला तरी हसायची. भेळवाला दारावरून गेला तरी त्याच्याकडे पाहून हसायची. कुठल्याही 'त्याच्या'कडे लसलसल्या नजरेनं पहायची. मूर्तीत खोदलेल्या तटस्थतेनं पहात रहायची. प्यायची. त्याला डोळ्याना भोगायची त्याला नुसत्या डोळ्यांनी.

"आम्ही आहोत म्हणून ती रहातीय इथे. आम्ही ठेवून घेतलं म्हणून. नाहीतर

कुणी जबाबदारी स्वीकारली असती ? आमच्या गळ्यात बांधलं हिला. अजीबात काळजी नाही केली. पिंडाला कसा क्षणात शिवला कावळा. त्यांना माहीत होतं. आम्ही काही हिला कमी पडू देणार नाही. हिच्या आईला...पण हिला काही आहे का ? जो जो शिकवायला जावं तो तो जास्तच. सांगितलेलं ऐकत नाही. या घरात हे खपवून घेतलं जाणार नाही. हे का नाही सांगत ' हिला ' कुणी !

हे आमच्यातलं बोलणं. कावळ्याच्या चांगुलपणावर आमचा चांगुलपणा बांधत बसलेले...आम्ही. ती नि:शंक, डोळ्यांत पिसाटलेल्या वाऱ्यासारखं पिसाट हसू दाखवत. दात नसलेल्या तोंडात लकलका जीभ हालवत. बांगड्यांचा खळखळ आवाज करत. एका गुंड्यावरून दुसऱ्या गुंड्यावर दोरा भरत...

अन घरच्या राजाचं आम्हाला पत्र. तिच्यावर तुम्ही प्रेम...जीवापाड प्रेम कराल अशी माझी अपेक्षा आहे...

त्या अपेक्षेनं खचलेली राणी. आता ह्याच्या किती इच्छा पूर्ण करायच्या ? ... तिला हंसऱ्या घरकुलात आणलं राजाच्या आज्ञेनं ! ती.. ती त्याची बहीण होती ! ... आणि रात्र रात्र एकमेकींच्या कुशीत आम्ही रडत बसलो. राजानं

---

**राजश्री ठकार**

---

मात्र डंडोरा पिटला. दवंडी पिटली की, आता सगळ्यांनी तिच्यावर प्रेम करायचं. आम्ही रडत रडत तिला विचारलं प्रेमाला अट काय ? तिला आपल्यावर प्रेम करायला कुण्णी कुण्णी शिकवलं नाही रे राजा. तिनी आम्हाला काय द्यायचं ? आमच्या प्रेमाला अट काय ? राजा म्हणाला संपूर्ण शरणांगती पत्कारा...

तेव्हापासून ती स्वत:चे वेडे डोळे आमच्यावर रोखते. राजा, राजा ती तुझ्यावरसुद्धा नाही प्रेम करत. वेळ पडली तर तुला विष देईल खायाला. तू आमच्यात हो राजा पण राजा हलला नाही. आमच्या विनवण्यांना राजा म्हणाला तुम्ही मोठ्ठा गुन्हा केला आहे...

राजाची राणी कोलमडली. विषारी वाऱ्यानी वाळली. पार पार वाळली. तिला आठवले. दहा रुपये...

" नाही वहिनी मी तुम्हाला दहा रुपये नाही देऊ शकत."

" इंजेक्शनला पाहिजेत. जरूरी आहे "

" हं ऽऽ पण माफ करा, मी देऊ शकत नाही."

" पण ' ह्यांच्या ' करता पाहिजेत. इंजेक्शनला..."

" माफ करा. माझा नाईलाज आहे."

वहिनी म्हणजे राणीची आई होती.

पण राजा भिकारी...ढुम ढुम ढुमाक ! ढुम ढुम ढुमाक !

राणीचे बाबा वारले. दहा रुपयांकरता नाही. ते मरायचे होतें. पण राजा कायमचा भिकारी राहीला. दहा रुपये पण दिले नाहीत. आणि आता ' हिच्यावर ' जिवापासून प्रेम करायला सांगतो. तेव्हा राणीची आई रडली. आत्ता राणी रडली. पण राजा हलला नाही. द्रवला नाही. त्यानी त्याची दवंडी मागे घेतली नाही...

...घरातल्या आनंदाचे मढं करून ती त्यावर विजयोन्मादानं ओरडत होती. आम्ही राजाचे गुलाम आहोत, गुलाम. फक्त गुलाम...पण ती मात्रा राजाची बहीण आहे. राजाची राणी नावाची राणी. राजाच्या राजकन्या नावाच्या राजकन्या.

राजाचा राजपुत्र राणीच्या कमरेला मिठी मारून रडतो पण राजाला काही कळत नाही....

...ते पिल्लू आम्ही आणलं. छोटसं नाजूक. नाजूक आवाजात म्यांव म्यांव करायचं इकडून तिकडे धावायचं. त्याच्या पायात बांधली दोन छोटीशी घुंगरं

सगळे लाडोबाचे लाड करायचे.

आनंदाच्या मढ्याचा पुर्नजन्म झाला बहुधा.

' तीला 'सुद्धा आम्ही विसरलो.

तिनं केलेले अपमान सहन करायला लागलो.

राणी म्हणाली राजा आपलाय.

त्याच्याकरता सहन करायला हवं.

तिची चेष्टा करू लागलो.

कावळयाच्या कृपेने मिळालेलं ' मोठ्ठेपण ' आठवू लागलो.

ते मांजराचं पिल्लू घुणू घुणू करत भटकायला लागलं आणि अवेळी कोळपून जायला लागल्याच्या अवस्थेतल्या आम्हाला परत हिरवे हिरवट हिरवट कोवळे लालसर कोंब फुटायला लागले...

तिची विषारी नजर आम्ही विसरून गेलो....पण...तिची विषारी नजर पिल्लानं झेलली.

सक्काळी सक्काळी त्याचा आवाज.

येईचना...येईचना...

घुणू घुणू पावलं.

वाजेचना वाजेचना..

राणीनं बशी वाजवली. तरी येईचना.

राणी वेडावली. राजकन्या दोन्ही वेडावल्या. घरभर शोधलं घरभर शोधलं कुठ्ठे कुठ्ठे मिळेना....

डोळ्यातनं पाणी यायला लागलं. आमचा आनंद गेला. छोटचा छोटचा मिशांवाला.

छोटचाछोटचा गडद तपकिरी डोळ्यांचा आनंद गेला.

कुणी पळवलं ? कुणी कुणी शेवटलं पाहिलं ?

तू ? मी ? राणीनं ? 'तिनं'. नाही नाही.

'ती' बसली होती. डोळ्यांत वेडं हसू खेळवत. दात नसलेल्या तोंडात जीभ लकलका हलवत. या गुंड्यावरचा दोरा त्या गुंड्यावर भरत. लालबुंद पडलेल्या इवल्याश्या नाकावर सुरकुत्या पाडत. तिला काहीच नव्हती आमच्या घालमेलीची कल्पना. का होती ? ती वेगळी तिच्या भिंतीआड. इकडे आमचा आनंद हरवला होता.

...रात्र झाली. पिल्लू नाही आलं रडून डोळे सुजले. पाणी आटलं, तळी, विहिरी, समुद्र आटला. सगळीकडे शुष्क कोरडं झालं.

विषारी वारा फुंकर घालत हिंडायला लागला. आमचे कोवळे कोंब जळले, त्यानं....

...'तिनं' झोपायला गादी काढली. उलगडली...आणि...राणीनं किंकाळी फोडली. राजकन्या ओक्सा-बोक्सी रडत बसल्या....

तिच्या अंथरुणात आमचा आनंद परत मंद होऊन पडला होता. घुणू घुणू आवाज कायमचा थांबला होता. आणि....

त्यानं किती कष्ट केले असतील सुटण्यासाठी, आमच्यासारखे...पण तिनं त्याला राक्षसी हातांनी बांधून टाकलं. तिच्या वळकटीत....

श्वास कोंडला असेल ना ? ओरडलं असेल ना ? मग सावकाश सावकाश त्याचा प्राण गेला असेल ना ? त्याचा आवाज आम्हाला का नाही ऐकू आला ?

आम्हालासुद्धा ती राक्षसी हातानं कवटाळते आहे....

राजाला माहीत नाही. राजाला माहीत नाही. राजाला काहीसुद्धा माहीत नाही...

आम्ही मात्र खत्रुडलेले, गुदमरलेले, तिच्यामुळे. ती मजेत. आम्हाला राक्षसी हातांनी कवटाळून. डोळ्यांत वेडं हसू घेऊन. या गुंडाळ्यावरचा दोरा त्या गुंडाळ्यावर भरत. दात नसलेल्या तोंडात जीभ लकलका हलवत....

□ □ □

## पुस्तके

# शिवायन

### शिवछत्रपतींची दिव्य गौरवगाथा

**डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी**

अलीकडे महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाकडे आणि त्यातील ऐतिहासिक व्यक्तींकडे कलावंतांचे निर्मितीक्षम मन विशेष आत्मीयतेने वळले आहे. यामुळे ऐतिहासिक वाङ्मयाला नवा बहर आलेला आहे. मराठ्यांच्या इतिहास भांडारातील तेजस्वी नररत्ने कलावंतांच्या प्रतिभेला आकर्षून घेत आहेत. यातील कोहिनूर म्हणजे शिवछत्रपती. छत्रपतींच्या महान व्यक्तिमत्वाने आणि उदात्त जीवनाने अनेक कलावंतांना निर्मितीची प्रेरणा दिली. यातूनच कथा, कादंबऱ्या, नाटके व महाकाव्य अशी विविध प्रकारची वाङ्मयसंपदा निर्माण झाली. श्रीमान योगी, रायगडाला जेव्हा जाग येते, छत्रपती शिवराय हे यातील विशेष उल्लेखनीय वाङ्मय होय. शिवछत्रपतींच्या व्यक्तित्वाचा वेध घेण्याचे आणि त्यांच्या जीवन रहस्याचा शोध घेण्याचे हे प्रयत्न आहेत. याच प्रेरणेतून ' शिवायन ' हे महाकाव्य अवतरले आहे.

कविवर्य श्री. ना. रा. मोरे यांनी ' शिवायन ' हे २९४ सर्गांचे महाकाव्य रचले आहे. शिवचरित्राचे मंथन करणे हे कलावंताला मोठे आव्हान आहे याची जाणीव त्यांच्याजवळ आहे म्हणूनच प्रारंभीच्या आवाहनात ते म्हणतात.

> पूर्ण चरित नच गाया आम्ही क्षम शिवरायांचे
> कथन असे हे सागरातल्या एका थेंबाचे
> लक्ष लक्ष कवि शिवरायांचे थकतिल यश गाता
> ठाव काय येईल नभाचा कोणाच्या हाता ?

तरीही आपल्या प्रतिभेला चौदा वर्षांच्या दीर्घ तपस्येची, अखंड परिश्रमांची आणि योगबलाची जोड देऊन श्री. मोरे यांनी हे आव्हान जिद्दीने स्वीकारले आहे. प्रतिभेला व्युत्पत्तीची, स्फूर्तीला व्यासंगाची साथ मिळाल्यामुळे गरुडभरारी घेऊन अमर्याद नभाचा ठाव घेण्याचा कवीचा प्रयत्न फलप्रद झाला आहे.

महाकाव्याला साजेसे शिवछत्रपतींचे बहुरंगी व्यक्तिचित्र कवीने मोठ्या भार-

भारदस्तपणे उभे केले आहे. स्वधर्म आणि स्वराज्य याचा निदिध्यास असलेला महत्त्वाकांक्षी तरुण, अनुयायांत चैतन्य निर्माण करणारा शूर वीर, चातुर्याने परिस्थिती हाताळणारा राजकारणी पुरुष आणि निग्रही न्यायी शास्ता या विविध भूमिकातून आकार घेणारे हे व्यक्तिचित्र विलोभनीय आहे. व्यक्तित्वाचे बारीकसारीक पैलूही कवीने रसपूर्ण रंगविले आहेत. शिवाजीचे प्रभावी वक्तृत्वच घ्या ना. रोहिडेश्वरी स्वराज्याची शपथ घेण्यापूर्वीचे भाषण, मुरारबाजीला केलेला तळमळीचा उपदेश किंवा अफजुलखानाच्या वकीलाला आपलासा करणे या प्रसंगांत शिववाणीचे वैभव किती सहजपणे मनावर ठसते. परंतु गोष्ट ही, की या वाणीमागे उत्कट तितकेच विशाल असे अंतःकरण आहे; याची सखोल जाण कवीला आहे. वीर, राजकारणी, स्वराज्यसंस्थापक यापलीकडे असणारे शिवाजी हे महापुरुषाच्या उंचीचे व्यक्तिमत्त्व आहे याचे भव्य दर्शन मोऱ्यांनी प्रतिभासामर्थ्याने आणि ओजस्वी वाणीच्या साहाय्याने घडविले आहे. शिवाजी महाराजांचे उज्ज्वल चारित्र्य, मनाचे औदार्य, त्यांचा भक्तिभाव व श्रद्धा या गोष्टी त्यांना महापुरुषाची उंची प्राप्त करून देतात. या गुणांचे गान करताना कवीच्या वाणीला भरते येते. "सत्यं, शिवं सुंदरम्' हा ८३ वा सर्ग पहावा. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला छत्रपतींनी मातेसमान लेखले, सन्मानाने तिची पाठवणी केली याचा गौरव कवी करतो.

> युद्धातील यश शिवरायांचे उंच ताडमाड
> सुयश परी हे अहा अमृताहून गोड गोड
> वदता काही करिता काही श्रीशिवरायांनी
> नीतीने जणु धावुनि जावे त्यांच्या मागोनी

महाराजांची साधुसंतावरील भक्ती, देवी भवानीवरील श्रद्धा, राज्यवैभव पदी लोळण घेत असता उद्रेकणारे वैराग्य यांचे चित्रण लक्षणीय आहे.

मुळातच वेधक असणाऱ्या या महापुरुषाच्या व्यक्तिचित्राची शोभा वाढली आहे, ती त्यावरील रंगीबेरंगी प्रकाशझोतांनी. मातापिता, साथीसेवक, पंडित गागाभट्ट व समर्थ रामदास यांच्या शिवाजीबद्दलच्या प्रतिक्रियांतून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची वेगवेगळी परिमाणे (पुत्र, स्वामी, राजा, योगी इत्यादी) आपल्याला जाणवतात. या सुपुत्राच्या यशाने मातापिता धन्य होतात, तर साधा दूतसुद्धा 'परम भाग्य जगि शिवरायांचे अनुयायी होणे' म्हणतात, तर समर्थ रामदास 'महा श्रीमंत योगी, यशवंत, पुण्यवंत नृप' असा त्यांचा गौरव करतात. श्री. मोऱ्यांची महाकवीची प्रतिभा प्रगट होते ती आणखी वेगळ्याच अद्भुत प्रकाशझोतात. पन्हाळगडच्या भूमीचे या पुत्राबद्दलचे वात्सल्य, तिची व्याकुळता, चिंता हा कवीच्या प्रतिभेचा ऊर्जस्वल आविष्कार आहे. प्राणांचा प्राण असलेला हा पुत्र वेढ्यातून सुखरूप बाहेर पडावा म्हणून ही भूमी देवदेवतांची प्रार्थना करीत आहे अशी भव्य कल्पना आणि

उदात्त भावना कवीने रंगवली आहे. मातृभूमीसाठी केलेल्या प्रार्थना आपण ऐकल्या आहेत पण पुत्रासाठी मातृभने केलेली ही प्रार्थना अद्वितीयच म्हणावी लागेल.

शिवछत्रपतींचे व्यक्तिचित्र म्हणजे गौरीशंकराचे हिमधवल शिखर. त्यांच्या साक्षात्काराने, दिव्यतेने मन भारावते. या भोवतालची लहानसहान शिखरेही सौंदर्याने नटलेली आहेत. शिवाजीच्या निष्ठावंत सेवकांची चित्रे म्हणजे या महाकाव्याचे भूषण आहे. या सेवकांची उत्कट स्वामिभक्ती, दुर्दम्य स्वातंत्र्येच्छा, आत्मार्पणाची तयारी; नव्हे, आत्मबलिदानाचा ध्यास शिवछत्रपतींच्या विरोधकांनाही गौरवाई वाटला आहे. शाहिस्तेखान म्हणतो, 'धन्य शिवा अनुयायी ज्याचे हे निष्ठावान'. स्वामीसाठी मरण ही या सेवकांची जीवननिष्ठा झाली आहे. बाजीप्रभूला शत्रूच्या तोंडावर एकटे सोडताना महाराज कष्टी होतात पण बाजीप्रभू उत्तर देतो—

राष्ट्रामध्ये हजार बाजी होतिल रणशूर
असा मोहरा परी शिव दुजा न होणार
मम शेवटला श्वासही जावो अपुल्या सेवेत
एवढाच हा प्रभो माझिया अंतरिचा हेत

या शब्दांना 'निष्ठेच्या संपुटातले तेजदार मोती' असे कवी म्हणतो, ते किती यथार्थ आहे! विरोधी पक्षातील सरदार या सेवकांना लालूच दाखवून आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करतात, त्यावेळची त्यांची तडफदार प्रत्युत्तरे कवीने ओजस्वी शैलीत ग्रथित केली आहेत. मुरारबाजीचे बोल ऐका :

कोसळून नभ पडेल, पृथ्वी दुभंग होईल
उदधिही लंघिल मर्यादा, हिम हिमालय त्यजिल
पूर्व दिशेचा उदया येईल सूर्य पश्चिमेस
फितूर होणे मुरार तरिही अशक्य यवनास

या उद्गांतील सेवकांची दृढ स्वामिनिष्ठा आणि कवीचे ओजस्वी कवित्व यांचा हा संगम मोठा मधूर वाटतो.

वीर रसाचा प्रकर्ष हे शिवायनचे आणखी एक बलस्थान आहे. वीररत्न बाजीप्रभु देशपांडे, संग्रामसिंह मुरारबाजी देशपांडे आणि नरवीर तानाजी मालुसरे या प्रदीर्घ सर्गातून येणारा वीररस अंगावर रोमांच उभे करतो. येथे कवीची लेखणी 'पूर्ण निमज्जित वीररसी' अशी झाली आहे. वीरांच्या पराक्रम वर्णनांत कवीचे कल्पना वैभव प्रगट झाले आहे. 'कल्पांतीचा रुद्रच मांडी तांडव समरात' अशी भीषण कल्पना बाजीप्रभूच्या संदर्भात येते, तर मुरारबाजी म्हणजे 'शौर्यास्त्रच हे मूर्तिमंत शिवरायांचे सुटले' असे बहारीचे रूपक योजले जाते. स्वामिभक्तीच्या सुगंधाने

दरवळणारे हे शौर्याचे पुष्प कविवर्य मोऱ्यांच्या प्रतिभेला गुंगविते आणि तिच्यातून सुंदर उपमा, दृष्टान्त, अर्थांतरन्यास या अलंकारांची खैरात होते. दाणेदार सुभाषितांची पखरणही काव्यात सहजपणे होते. वर्णनाला अर्थगांभिर्याची जोड लाभते, ती रामायण, महाभारत, पुराणे यांतील उचित संदर्भांनी. उदेभानने तानाजीच्या शवाला लाथ मारली तेव्हा 'जयद्रथा थांब, तुझा बघ अर्जुन ये काळ' म्हणून पुढे शेलारमामांचा पराक्रम वर्णिला आहे. अफजुलखान देवालयांचा विध्वंस करीत आला तेव्हा 'करीत अत्याचार असा जा दुष्टा शिशुपाला, चक्र सुदर्शन तयार आहे तुझ्या स्वागताला' हा संदर्भ नेमका टिपला जातो आणि अखेरीस अफजुलखानवध म्हणजे 'राक्षसवध शिवदेवे केला.' अशी वर्णनाची सांगता केली जाते.

पराक्रमाचे पोवाडे गाणारी ही प्रतिभा नाजुक कलाकुसर करण्यातही प्रवीण आहे. 'शिवायन'मधील काही काव्यात्म सर्ग याची ग्वाही देतात. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचे लावण्य मृदुमुलायम शब्दांनी, काव्यमय कल्पनांनी आपल्यापुढे साकार होते; तर झेबुन्निसाचा प्रीतिभाव, प्रेमभंगानंतर प्रीतीचे टिकलेले पावित्र्य यांतून माधुर्य निथळते. शिवराज्याभिषेक प्रसंग म्हणजे तर मूर्तिमंत मांगल्य आणि पावित्र्य. हृदयाच्या तबकात निष्ठा-भक्ती यांची निरांजने घेऊन मानवता शिवरायांना ओवाळते आहे असे भव्योदात्त वर्णन कवीने केले आहे. कवीने प्रश्न केला आहे, की हे रम्यतम दृश्य आहे, मग प्रतिभाचंडोल भरारी का मारणार नाही? तो योग्यच नाही का?

मांगल्य, पावित्र्य, सौंदर्य शौर्य व निष्ठा यांचे प्रभावी, प्रत्ययकारी चित्रण करणारी ही प्रतिभा कारुण्याला मात्र ओझरताच स्पर्श करते याची थोडी रुखरुख वाटते. छत्रपतींना आयुष्याच्या अखेरीस गृहकलह व पुत्राचा द्रोह या दारूण दुःखांचे घाव सोसावे लागले. या महापुरुषाला याबाबत जी भयानक पराभूती स्वीकारावी लागली, भयंकर अपयशाचे वाटेकरी व्हावे लागले, त्यावेळचा त्यांचा अंतःसंघर्ष,

---


# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य : रुपये चौदा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०


---

मानवाच्या एकाकीपणाची मूलगामी जाणीव, विश्वनियामक शक्तीचा-नियतीचा-दाहक प्रत्यय यांच्याद्वारे मानवी मन आणि मानवी जीवन यांच्या अंतिम रहस्यावर क्षकिरण टाकण्याचे महाकवीचे कार्य पार पाडण्याची संधी मोऱ्यांनी साधलेली नाही. शोकांतिकेची बीजे असणाऱ्या या घटनांचे व त्यांचे छत्रपतींच्या मनावरील आघातांचे चित्रण आपल्याला हलवून सोडते, हादरवून टाकीत नाही. ही उणीव सोडली तर शिवछत्रपतींची ही दिव्य गौरवगाथा प्रत्येक मराठी माणसाला पूजनीय वाटेल हे निःसंशय.

शिवायन : नारायण रामचंद्र मोरे : सोमैय्या
पब्लिकेशन्स, मुंबई : पृष्ठे ५३२ : मूल्य रु. ३६.

□

# चार बालगीत संग्रह

**केशव मेश्राम**

समाजात शिक्षितांचे प्रमाण वाढते आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण वाढीकडे अधिक जागरूकपणे व समजुतदारपणाने लक्ष पुरवणाऱ्या पालकांचा वर्ग विविध थरात वाढतो आहे. मुलांना पाठांतराची असलेली आवड, त्यांच्या ठिकाणी उपजत असलेली अफलातून कल्पनाशक्ती, त्यांच्या मर्यादित विश्वातील राग-लोभ, गमती-जमती लक्षात घेऊन, ध्वनी, नाद व अर्थवलयांना स्पर्श करणारी, क्वचित निरर्थक, गीते मुलांच्या वाचनासाठी मोठ्या प्रमणात निर्माण होऊ लागली.

मराठी कवी तर अशा संधीसाठी तयारच असतात. मुलांच्या गरजेपेक्षा ही निर्मिती मोठ्या प्रमाणात झालेली दिसते.

सौ. वृंदा लिमये यांच्या ७५ छोट्या उखाण्यांचा, गीतांचा संग्रह म्हणजे 'लॉलिपॉप.' वृंदाबाईंच्या कवितांतले जग हे संमिश्र विषयांनी गजबजून गेलेले आढळते. टेलिफोन, ट्रॅन्झिस्टर, रेडिओपासून तो लाडू, भेळ, फणी, केरसुणीपर्यंत सगळ्या गोष्टी त्यांनी वापरात आणल्या आहेत. काही कोडी अतिशय रेखीव अशी आहेत.

'कोवळी आणि ताजी । कोल्हा हिला राजी ।
चव हिची फाकडी । ओळखा बरे...'

आपोआप मुलांकडून 'काकडी' हे उत्तर मिळावे ही अपेक्षा पूर्ण होते. ह्यापेक्षाही–

‘ अलिकडे धागा । पलिकडे धागा ।
करामत केवढी । कोनाड्यात बघा ।। ’

ही कविता अधिक हृद्य आणि बहारदार आहे. पण ढेकूण, भळ, वगैरे कविता फारच सामान्य आहेत. मुलांच्या कल्पकतेकडे व जिज्ञासेकडे बघण्यापेक्षा सौ. वृंदा लिमये यांनी आठवेल तेवढ्या वस्तूंची यादी करून मग त्याभोवती कवितांची उभारणी केली हे जाणवल्याशिवाय रहात नाही आणि कवितांच्या कृतकपणाचा पुरावा मिळून खंत वाटते.

दत्ता श्री. टोळ यांच्या १७ कविता ‘ अट्टी गट्टी फूऽ ’ ह्या पुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. ह्या कवितांत ‘ छोटा गप्पीदास ’, ‘ मंतरलेलं तळं ’ या दोनच कविता जमून आल्या आहेत. त्यातील छोट्यांचं विश्व व कुतूहलाची तार त्यांनी ह्या कवितांत पकडली आहे, पण ‘ आला पाऊस आला ’, ‘ हसली थंडी ’, ‘ उन्हाळ्याची करामत ’ या कविता नुसत्या जंत्रीवजा व भोंगळ झाल्या आहेत. टोळांनी लहानग्यांचे जग अधिक जागरूकतेने बघायला हवे आहे.

सोमैय्या पब्लिकेशन प्रा. लि. यांनी प्रकाशित केलेल्या दोन बालगीतांच्या पुस्तकांपैकी श्री. राजा मंगळवेढेकर यांचे ‘ अगडं बगडं ’ हे पुस्तक खूप चांगले साधले आहे. मंगळवेढेकरांना बालमनोरचनेचे रहस्य अवगत झाले आहे. अतिशय वेधक अशी नादमधुर व कर्णमधुर लयबद्ध रचना ते सहजतेने करतात. यातील एक ‘ पिशवी ’ ही कविता वगळली तर हे पुस्तक खरेखुरे बालांचे वाटते. ‘ ठकी ’ ‘ अक्कणमाती ’ ‘ विदूषक ’ या कविता खूप प्रभावी व जिवंत उतरल्या आहेत. ‘ खाऊसाठी युक्ती ’ ही तर खूप वेळ घोळत राहते.

‘ अर्ध्या रात्री हळूच ऊठ
नदीच्या दिशेने पळत सूट
पळताना लागेल डोंगर बारका
तोच देईल पंचवीस खारका ’

या पुस्तकाप्रमाणेच ‘ अंगतपंगत ’ हेही एक वेधक, बालांचे पुस्तक आहे. यातील रचनेत आकर्षकता व सहजता आहे. वसुधा पाटील आणि राजा मंगळवेढेकर यांची बालगीते प्रवाही आहेत. आमचं बाळ, झिमझिम झरती, माझी ताई, ट्रिंगट्रिंग या कविता चांगल्या उतरल्या आहेत. मंगळवेढेकर आणि वसुधा पाटील यांचे यश पहाता शरच्चंद्र वडोदेकर व शैलजा राजे यांच्या कविता बोजड वाटतात. त्यांच्या ठिकाणी सोपेपणाचा व सफाईचा अभाव आहे. या दोन्ही पुस्तकांना चित्रकार श्री. कृष्णा परब यांनी काढलेली चित्रे आणि केलेली अक्षररचना व मांडणी यामुळे उठाव येऊन त्यांच्या आकर्षकतेत भर पडली आहे. त्याचप्रमाणे वृंदा लिमये यांच्या ‘ लॉलिपॉप ’-मधील कवितांपेक्षा यशोदा भागवतांची सजावट बोलकी व रसरशीत आहे.

आजच्या बालवाङ्मयाचा साकल्याने विचार केला, तर अजून मराठीत खरेखुरे बालवाङ्मय निर्माण व्हायचे आहे असेच म्हणावे लागेल. लेखक आपल्या प्रौढपणाचे ओझे टाकून तरल व हलक्या मनाने जाणीवपूर्वक लिहितील तरच हे साध्य होईल. ◻

१. **लॉलीपॉप : वृंदा लिमये**
मौज प्रकाशन गृह, मुंबई : किंमत दीड रुपया.

२. **अट्टीगट्टी फूऽ : दत्ता श्री. टोळ**
दत्त प्रकाशन, पुणे : किंमत सव्वा रुपया.

३. **अगडं बगडं : राजा मंगळवेढेकर** : किंमत १ रुपया

४. **अंगतपंगत : शैलजा राजे, राजा मंगळवेढेकर, शरच्चंद्र बडोदेकर, वसुधा पाटील** : किंमत १ रुपया.
सोमैय्या पब्लिकेशन, मुंबई

---

# सुंदर सुखसंवाद

श्रीयुत रा. रा. गोपीनाथ तळवलकर यांसी, स. न. वि. वि.

हे पत्र लिहिण्यात माझ्याकडून खूपच उशीर झाला आहे. 'ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व' हे आपले पुस्तक आपण स्मरणपूर्वक मला भेट दिलेत, त्यापूर्वीच केसरीच्या माध्यमातून या गुणवान पुस्तकाची आणि माझी थोडीफार ओळख झाली होती. पण पुस्तक हाती आल्यानंतर मी ते उत्सुकतेने संपूर्ण वाचले. ज्ञानेश्वरी संबंधीचा जो जिव्हाळा आपल्या सुखसंवादातून प्रगट झाला आहे त्याने मला विशेष आनंद वाटला. ज्ञानेश्वरीच्या 'प्रसादरस कल्लोळात' तुम्ही स्वत: रंगला आहात व इतरांना रंगविले आहे. एखाद्या रसिक व कुशल मार्गदर्शकाने अंगावर सर्वत्र शिल्पकलेची सुंदर लेणी मिरवीत असलेल्या पुरातन शैलमंदिराचे बाह्यसौंदर्य दाखवीत दाखवीत हौशी प्रवाशांना त्या मंदिराच्या शांत व गंभीर गाभाऱ्यात नेऊन पोचवावे तसे तुमचे पुस्तक वाचीत असता होते. मला विश्वास वाटतो, की ज्ञानेश्वरीतील सौंदर्य विश्वाचे जे दर्शन तुम्ही करून दिले आहे त्याने ज्ञानेश्वरीला नवा वाचकवर्ग लाभणार आहे. मराठी साहित्याची ही मोलाची सेवा आहेच, पण ज्ञानेश्वरीच्या संपर्कात आलेला वाचक जी आंतरिक धन्यता पावेल त्याचे श्रेय त्यापेक्षा फार मोठे आहे. आपल्याकडून असेच संस्कारवाङमय प्रसिद्ध व्हावे ही ज्ञानेश्वर चरणी प्रार्थना.

**धुंडा महाराज**

**ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व : केसरी प्रकाशन : पृष्ठसंख्या १०० : मूल्य रुपये ६**

---

'डी ड'च्या सिद्धीसाठी उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच भूमिगत सैनिकांशी दुवा सांधणे, कॅ.जिरॉदच्या सुटकेचा बेत आखणे इत्यादी कारवायांसाठी आखलेली एक नाट्यपूर्ण मोहीम...

# आफ्रिकेतील गुप्त मोहीम

**जिप्सी मधुकांत**

त्यांच्यापैकी प्रत्यकाला सूचना मिळाली होती, 'एक तासापेक्षा अधिक वेळ परतायला लागणार नाही, इतक्याच सहजपणे आपल्या ऑफिसातून बाहेर पडायचे. एका हॅवरसॅकमधे (पोतडीत) मावतील तेवढयाच जिनसा सोबत घ्या. कसलेही कागदपत्र नकोत. आज रात्री निघू या...'

हॅवरसॅक खेरीज त्याच्यावरोबर गॅरेड टाइप रायफल, टॉमीगन, सोन्याच्या चिपा वेळप्रसंगी वापरायला होत्या. १८ ऑक्टोबर ४२ ला संध्याकाळी विमाने घोंगावली. आणि ही उत्तर आफ्रिकेतली गुप्त मोहीम सुरू झाली.

काय घडले होते ? डी डे–एच. अवर ८ नोव्हेंबर १९४२ ला ब्रिटिश आणि अमेरिकन सैनिकांनी उत्तर आफ्रिकेवर अचानक टपकायचे ठरवले होते. फ्रेंच सैनिकांशी जर येनकेन मार्गाने काही दुवा सांधला गेला, तर ही मोहीम बरीच यशस्वी होणार होती. लंडनमधल्या जनरल आयसेन हॉवरच्या कचेरीत एक अत्यंत गुप्त संदेश येऊन थडकला होता. आल्जिअर्स जवळ आयसेन हॉवरच्या पाच ऑफिसर्सनी त्वरित येऊन भेटावे. आल्जेरियातली काही व्हिची फ्रेंच ऑफिसर्स दोस्तांना पूर्ण अनुकूल आहेत. आणि त्यांना ॲक्सिस प्लॅन्सची माहिती आहे. परिस्थितीबाबत चर्चा करण्यास त्वरा करावी.

जनरल आयसेन हॉवरच्या पुढयात त्याचा तगडा डेप्युटी कमांडर, मेजर जनरल मार्क वेन क्लार्क उभा होता. 'मला वाटते, वेन हे जमू शकेल.' आयसेन हॉवरने

शांतपणें म्हणाला.

निर्णय पक्का झाला. आयसेन हॉवर आणि क्लार्क त्वरित १० डाऊनिंग स्ट्रीटवर येऊन ठेपले. जेवणानंतर चर्चिलने सारी योजना समजावून घेतली. चर्चिलने त्या धाडसी योजनेचे मनापासून स्वागत केले. 'जमले, तुम्हाला आमचे संपूर्ण सहकार्य राहील.'

## मोहिमेची तयारी

नंतर क्कार्कची आपले सोबती जमवण्यासाठी धावपळ सुरू झाली. अमेरिकन नौदलातला कॅ. जेरॉल्ड राईट, कर्नल, ज्युलियस होम्स, याला फ्रेंच भाषेचे ज्ञान होते, आल्जेरियातला अनुभव होता. कर्नल आर्च हॅम्ब्लेन, याला नौकानयनातील पूर्ण जाणकारी होती. अमेरिकन ऑपरेशन ब्रँच जी–३ चा ब्रिगेडियर जनरल लिमन लेम्निव्झर.

आणि त्यांना त्याच रात्री निघायच्या सूचना दिल्या होत्या.

इकडे ब्रिटिश नौदलाकडे गुप्त संदेश पाठवून एक पाणबुडी आणि चार केयाक्सची लाकडी फळ्या व कॅनव्हासपासून तयार केलेल्या होड्या यांची तयारी ठेवण्यास सांगण्यात आले. याशिवाय नौदलातील तिघे अधिकारी या मोहिमेच्या दिमतीस देण्यात आले. कॅ. जी. बी. (जंबो) कर्टने, लिव्हिंग्स्टन, लेफ्टनंट फूट.

संध्याकाळी क्लार्कचा हा जथा रॉयल नेव्हीच्या तळावर पोचला. तेथल्या एका कॅप्टनने सारी योजना लक्षपूर्वक ऐकून घेतली. नंतर म्हटले, 'यात खतरा खूप आहे. आम्ही तुम्हाला विनातकलीफ किनाऱ्यावर सोडू. पण केयाक्समधून लाटांचे तडाखे सोसता येणे कठीण. त्या बोटी उसळत्या दर्यात लोटणे जिकिरीचे आहे.'

क्लार्कने ते आव्हान स्वीकारले. कॅप्टनने गंमतीने म्हटले; 'हे एखाद्या गूढ कथेसारखे आहे. वीर नायक जसा त्या वैराण झोपडीकडे जातो, मध्यरात्री त्यातून दिव्याची तिरीप दिसते, मग ती खलबतं...'

क्लार्क कुरकुरला, 'हे कुणा सैतानानं सांगितलं तुला?' कारण किनाऱ्यावर उतरायचे त्यांचे जे ठिकाण होते, तेथेही असेच एक खोपटें होते आणि त्यातून दिव्याचा संकेत मिळणार होता!

बऱ्याच रात्रीनंतर ते निघाले, तेव्हा चंद्रकोर पूर्वेकडे वर आली होती. लेफ्टनंट जेवेलच्या नेतृत्वाखालील पाणबुडीत ते पाच अमेरिकन आणि तिघे ब्रिटिश अधिकारी निघाले. त्यांच्यापाशी निळे संकेतदीप होते. तसेच छोटे 'वॉकी टॉकी' सेटस् होते. किनाऱ्यावर उतरल्यानंतर पाणबुडीशी संपर्क साधायला त्या बेतार साधनाचा उपयोग होणार होता. निळ्या दिव्यांतून मोर्स कोडच्या धर्तीवर शलाका टाकता येत होत्या. पाणबुडीचे एंजिन घरघरू लागले. त्यांचा प्रवास सुरू झाला.

दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता आफ्रिकन किनाऱ्यावर संकेतस्थळी उतरायची खूण त्यांना दिव्याने मिळाली. पण बरेच फटफटले होते. त्यामुळे किनाऱ्यावर पाय

ठवायचा धोका त्यांनी पत्करला नाही. पुन्हा संध्याकाळपर्यंत पाणबुडीतच त्यांना ताटकळत बसायचे होते. पेरिस्कोपमधून क्लार्कला ते यूरिशटाइप, उतारावरचे खोपटे दिसत होते. त्या खोपटाच्या मागून आल्जिअर्सला जाणारा हमरस्ता होता. पण कुठेही हालचाल असल्याचे जाणवत नव्हते.

पंधरा तास त्यांना तसेच पाणबुडीत काढावे लागले. एक प्रकारची मरगळ त्यांना आली होती. हवाही इतकी सर्द, की आगपेटीवरची काडी पेट घेईना. त्या वातावरणात ते सगळे कोंडून गेले. पण संध्याकाळ झाल्यानंतर मग अंधारात त्यांच्या पाणबुडीने पाण्यावर डोके काढले. रात्रीची थंडगार हवा डोक्याला शांतवत होती. दीपसंकेत झळकण्याची ते वाट पाहू लागले.

रात्री आठ वाजले. नऊ वाजले. पण त्या खोपटयातून कसलीही तिरीप दिसेना. क्लार्कची पार्टी आराधना करीत बसली. पुन्हा चोवीस तास पाण्याखाली काढावे लागणार की काय? लेम्नित्झर पुटपुटला, 'काहीतरी घडलेले दिसते. कदाचित आपल्याला संकेत मिळणार नाही.'

पण रात्री ११-१० ला त्याचा अंदाज चुकला आणि दीपसंकेत मिळाला—

**सारे काही ठीक आहे !**

पाणबुडीच्या टोर्पेडोद्वारातून त्यांनी आपल्या केयाक्स बोटी बाहेर ढकलल्या. झणकत्या बर्फगार पाण्याचे तुषार झोंबत होते. किनाऱ्यापासून सुमारे ५०० यार्ड पोचल्यावर ते थबकले. काही दगाफटका होऊन तो मिळालेला संकेत नकली असला तर...? त्यांना जरा शंका आली. पोलिसांना खबर मिळून त्यांनी पाळत ठेवली तर सापळयात अडकायचे का? मनातली शंका दूर करण्यासाठी कुणी तरी पुढे जाऊन खरेखोटे काय आहे, याचा तलास काढायचे ठरले. ज्यूलियस होम्सला फ्रेंच चांगले येत होते. तसेच किनाऱ्यावरचे लोकही माहीत होते. कमांडो कॅप्टन लिव्हिंग्स्टन व तो मिळून जायचे ठरले. जर आलबेल असले तर बाकीच्यांनीही पुढे सरायचे. दहा मिनिटांत होम्सचे होडके निघाले. रायफल्स तयार होत्या. त्यांनी पलीकडे किनाऱ्यावर जाऊन तलास सुरू केला.

अचानक कुणाचीतरी चाहूल जवळच्या झुडपात त्यांना जाणवली. ते चमकले. चापावर बोटं घट्ट झाली. इंग्रजीतून कुणीतरी विचारले,

'कोण आहे?'

'तू कोण?' होम्सने उलट प्रश्न केला.

'मी रिजवे नाईट.'

(रिजवे नाईट हा अमेरिकन व्हाईस कॉन्सल होता. या मिलाफाची आखणी त्यानेच केली होती.)

'मी ज्युलियस होम्स. बॉब मर्फी कुठाय?' (मर्फी अमेरिकन कॉन्सल-जनरल होता.)

'एका मिनिटातच तो येईल. सारे काही ठीक आहे.'

मग होम्सने लिव्हिंग्स्टनला खुणेने संकेत कळवण्याची सूचना दिली.

त्याने समुद्राकडे निळा दिवा चमकवला. 'के'चा संकेत-करेक्टसाठी. 'एफ'-फोनी,-काही गडबड असली तर. असे मोर्स कोडमधले हे संकेत ठरले होते. 'के'चा संकेत मिळाल्यावर आणखी केयाक्स बोटी लाटांवरून डुचमळत निघाल्या. आणखी सहाजण लवकरच किनाऱ्यावर येऊन पोचले. मग पाणबुडीला सारे काही आल-बेलची खूण दिली. पाणबुडी घरघरत परतली.

थंडीने आणि ओलेत्याने काकडत त्यांनी त्या बारक्या बोटी खोपटात खेचून आणून सैंपाकघरांत त्यांचा सरणासारखा ढीग रचला. मग अंगावरचे घट्ट ओले कपडे खेचून काढून वाळत घातले. मग जेवणानंतर थोडीशी डुलकी घेतली. सकाळी ७ वाजता फ्रेंच मंडळी आली तेव्हा बैठक सुरू झाली.

या बैठकीत मिळालेली माहिती मोलाची होती. कासाब्लँका, आल्जिअर्स, ओरान व ट्युनिस या बंदरांची क्षमता; फ्रेंच नौदलाची तयारी; फ्रेंचाची जेथे मजबुती आहे अशा तळांची यादी, तसेच कमकुवत व नाममात्र तळ कोणते; विमानतळाच्या धावपट्टीबाबतची माहिती पुढे अतिशय मौल्यवान ठरली. 'डी डे'च्या मोहिमेत याचा खूप उपयोग झाला.

सूर्य वर आला. कलला. संध्याकाळ होऊ लागली; तरी या मंडळींची गुप्त चर्चा आणि नकाशावरच्या खुणा चालूच होत्या.

आणि जनरल क्लार्कच्या नशिबालाही आता हेलकावे बसणार होते!

कसलातरी आवाज ऐकून जेरी राईटने बाहेर येऊन पाहिले, तो खोपटाच्या लाल कौलांना घसटून वारा वेगाने शीळा फुंकत होता. किनाऱ्यावर पुरुषभर उंचीच्या लाटा उसळत असलेल्या दिसल्या. अशा थैमानात त्या बारक्या केयाक्स बोटी पुन्हा सागरात घालून परतणे अशक्य होते. निराश होऊन तो घरात वळला. तातडतोब परतायची आवश्यकता होती.

## अरब नोकरांची खबर

त्या दिवशी त्या खोपटाच्या मालकाने आपले दोन अरब नोकर सुरक्षिततेची खबरदारी म्हणून काढून टाकले होते. ते शेजारच्या गावात जाऊन पोलिसांना भेटले होते. आणि त्यांनी अशी माहिती पुरवली, की काही अज्ञात इसमांनी कसली-तरी बंडले त्या खोपटात आणली आहेत! ते खोपटे चोरट्या व्यापाराचा अड्डा असावा, असा पोलिसांचा पूर्वीपासून कयास होता. तसे पूर्वी एकदा घडले होते. यावेळी तसेच काही असण्याचा पोलिसांचा होरा. आणि एक पोलिसांची गाडी तेथे धाड घालण्यासाठी रस्ता कापू लागली...!

सूर्य सागरात बुडाला आणि खोपटातल्या खलबतखान्यात दिवे लागले. चर्चा-माहितीची देवाणघेवाण संपत आली होती. केवळ एकच बाब शिल्लक होती. एका

फ्रेंच ऑफिसरने म्हटले, ' सर्वांना बरोबर नऊ शकेल असा एखादा नेता आम्हाला हवा आहे. आणि मी हेन्री ह्यूनोर जिरॉद–कॅप्टन जिरॉदचे नाव सुचवतो ! '

' पण तो तर फ्रान्समध्ये अटकेत आहे. '–क्लार्कने म्हटले.

' त्याची सुटका करवून त्याला येथे आणलेच पाहिजे. तोच या संदिग्ध काळात सर्वांच्या निष्ठा मिळवून नेतृत्व देऊ शकेल. '

क्लार्कने वचन दिले. कॅ. जिरॉदची सुटका घडवून त्याला उत्तर आफ्रिकेत आणायचे ठरवले.

त्याचवेळी पलीकडल्या खोलीतला फोन घणाणला सगळेजण ताडकन उठून उभे राहिले ! एकमेकांकडे पाहू लागले. घरमालकाने फोन उचलला. जबाब देऊन दुसऱ्या क्षणी तो यांच्यासमोर उभा ठाकला. त्याच्या डोळ्यांत भीती विस्फारली होती. ' पोलीस ! पाच मिनिटात ते येथे येऊन ठेपतील ! ' तो किंचाळला.

बहुतेक ज्येष्ठ फ्रेंच अधिकारी त्वरित बाहेर सटकले. ते तेथे आढळले म्हणजे गोळीची शिकार होणेच ! एंजिनची घरघर, क्लच, गिअर्सचा आवाज ऐकू येऊ लागला. तोवर ते पसार झाले होते.

क्लार्कच्या मंडळींनी झटपट नकाशे वगैरे गुंडाळून शर्टात खोवले ! बाहेर दर्यावरचे थैमान आणि हे व्हिचीचे पोलीस यांच्या कैचीत ते अडकणार होते. खोपटाच्या भिंतीवर पोलिसांच्या मोटारीच्या दिव्यांचा उजेड पडू लागला होता. आता लपायचे कोठे ? क्लार्कच्या मनात जवळच्या झाडीत दडायचे होते. पण मर्फीने शंका काढली. पोलिसांना जराही वास लागायचा अवकाश, त्यांनी तो परिसर विंचरून काढला असता. मर्फीने सुचवले, ' या माझ्या खोपटात एक रिकामे मद्याचे तळघर आहे. त्यात तुम्ही दडा. बाकी पोलिसांचे मी पाहून घेतो. '

क्लार्कला ती कल्पना सुरुवातीला तितकीशी रुचली नाही. ते तळघर उंदराच्या पिंजऱ्याप्रमाणे ठरले असते ! पण आता अन्य कुठलाच मार्ग नव्हता. ते लन्फन् पोलीस मोटारीतून बाहेर पडल्याचे आवाज येत होते. रायफल्स व टॉमी गन घेऊन चट सारे ते आठ ऑफिसर तळघरात घुसले. मर्फीने झटक्यात वरचे सपाट दार बंद करून त्यावर पेटचा ठेवल्या.

## नाटक रंगू लागले

मघाचे ते बैठकीचे टेबल मद्याच्या बाटल्या आणि सिगारेटच्या थोटकांनी सजलेले होते. दोन साध्या वेशातील फ्रेंच ऑफिसर तेथेच थांबले होते. आपले प्राण तळहातावर घेऊन त्यांनी एक नाटक रंगवायचे ठरवले. अट्टल पिणाऱ्यांच्या पार्टीतले असणाऱ्यांचा आव आणला. ते दोघे व मालक मर्फी बरळू लागले ! मोठ्याने गाऊ लागले ! त्यांच्या हसण्याचा व गाण्याखिदळण्याचा एकेक मजला वाढत होता. पोलीस आत आले तो त्यांना ही दारुड्याची मैफल दिसली !

खालचे तळघर केवळ दहा चौरस फूटांचे होते ! समजा कुणी आलेच खाली

तर क्लार्कने चाप ओढायचा हुकूम दिला होता...

बॉब मर्फी पोलिसांशी हुज्जत घालीत असल्याचा ओरडा त्यांना ऐकू येत होता. आपली आणि मित्रांची ही रंगेलपार्टी चालली होती, तर गुन्हा कसला, ही मर्फीची बतावणी होती. पण आवाज हळूहळू जवळ येत होते. काही क्षणात तळघराच्या वरचा आवाज येत असल्याचे खालच्यांना जाणवत होते !

आणि त्याचवेळी तळघरातल्या जंबो कर्टनेयाला खोकल्याची उबळ आली. खोकला दावण्याची तो पराकाष्ठा करीत होता. त्याची ती धडपडही साऱ्या गावभर ऐकू जाईल, अशी इतर सहकाऱ्यांना भिती वाटत होती. कर्टने मेटाकुटीला आला. क्लार्कने त्याला ऐनवेळी च्यूइंगगमचा एक तुकडा दिला ! काही क्षण त्याची उबळ संथावल्यासारखे वाटले. त्यांची हृदये थाडथाड उडत होती. एकेक मिनीट एकेका युगासारखे चाललेले. वर ते दोन फ्रेंच ऑफिसर धिंगाणा करीत होते. मर्फी तंडत होता. त्याने बरीच बतावणी केली. अखेर पोलिसांची खात्री पटली, की तेथे काही चोरट्या व्यापाराचा धागादोरा नसावा. पण त्यांनी वरिष्ठांकडे रिपोर्ट करायचे ठरवले. वेळ पडल्यास वरिष्ठ अधिकारी पुन्हा धाड घालण्याचा धोका कुठल्याही क्षणी होताच.

त्याचवेळी कर्टनेला पुन्हा उबळ आली. ते मघाचे चघळ म्हणून क्लार्कने सांगितले. पण त्यातला गोडवा सरल्याचे अगदी बारीक आवाजात कर्टने म्हणाला, तेव्हा क्लार्क म्हणाला, 'त्यात नवल नाही. मीच आधी तासभर तो तुकडा चघळत होतो.'

अखेर वरचा खेळ थोडासा निवळला. ते बुटांचे रपरप आवाज दूर गेल्यासारखे वाटले. मोटार निघून गेल्याचा आवाज आला. साऱ्यांना हायसे वाटले. तळघरातले वीर बाहेर आले ! त्यांना पटकन पाणबुडीचा आसरा घ्यायचा होता. पण सागराचे थैमान अजून बंद झाले नव्हते. लाटा उसळत होत्याच.

## पाणबुडीला पाचारण

ती मौल्यवान लष्करी गुपिते घेऊन त्वरित बाहेर पडणे त्यांना जरूर होते.

मग पाणबुडीला एक गुप्त संदेश पाठवण्यात आला. शक्य तितक्याजवळ राहण्याचा प्रयत्न करा. आम्ही संकटात आहोत. लवकरच येऊन थडकत आहोत.

त्या बारक्या खेळण्यातल्यासारख्या होड्या घेऊन तशा उसळत्या लाटांत समुद्रात शिरणे म्हणजे दुःसाहसच होते. क्लार्क आणि लिव्हिंग्स्टनने आपले सूट उतरवून होड्या उतरवल्या. त्यात बसायची धडपड ते करू लागले. तेवढ्यात एक प्रचंड लाट येऊन तुषारांखाली ते दिसेनासे झाले. क्षणभरानंतर त्यांची डोकी पाण्यावर दिसू लागली. किनाऱ्यावर ते घरंगळत आले. वाळू, खारे पाणी यांचा मार खाऊन. मग बाकीच्यांनी आपला नेट थोडा आवरता घेतला. पण यांचे कपडे पाण्यावर वहात जाऊ लागले. तशीच छोटी वल्हीही. पण कपड्यांची तेवढी पर्वा न करता ती

वल्ही हस्तगत करण्यात आली. त्या रात्री तशा खवळलेल्या सागरात छोटया होड्या घेऊन काही जाणे जमणार नाही, हे क्लार्कनेसुद्धा कबूल केले. पण पोलीस असो नसो, त्या तळघरात मात्र परतायचे नाही, हा निश्चय ठरला ! त्याऐवजी जवळच्या झाडीत लपणे ठीक. वेळप्रसंगी दोन हात करणे शक्य होते. त्यांनी ती होडकी झाडीत लपवली. सारेच काकडत होते. दुसऱ्या दिवशी ते हायकमांड ऑफिसर बनियन-चड्डी घालून संत्र्याची ड्यूटी करत होते. पहारा देत गस्त घालीत होते ! वारा तसाच जोरदार वहात होता.

त्या रात्री पोलीस पुन्हा अकरा वाजता आले. झाडीतले हे लोक बंदुकीसह सावध होतेच. बॉब मर्फीने खोपटात हसत हसत चटपटीतपणे पोलिसांचे आगत-स्वागत केले. जाताना त्यांचे काही समाधान झाले नाही. पुन्हा सकाळी येण्याचे ठरवले. निदान तेवढ्यापुरती ब्याद टळली होती !

## अखेरचे तडाखे

पहाटे चार वाजता वारा थोडा पडला होता. पण लाटा तशाच जोरदार उसळत होत्या. क्लार्कने पुन्हा प्रयत्न करायचे ठरवले. पाणबुडीला जवळ येण्याचा संदेश दिला. जंबो, नाईट आणि दोघा फ्रेंच लेफ्टनंट्सनी केयाक्स स्थिर करण्यात यश मिळवले. क्लार्क आणि राईट आत चढले. थोड्याच वेळात ते सफाईने प्रवाहाला लागले. पण लाटांचे तडाखे खाताना तीस वर्षे नौदलात घालवलेल्या कॅप्टन राईटलाही मुष्किल झाले. अखेरची मंडळी येऊन पोचताना मात्र पाणबुडीपाशीच जोरदार लाटेने त्यांच्या केयाक्सचे दोन तुकडे झाले. माणसं मिनतवारीने बचावली. होडीचे तुकडे वहात गेले ! हा मोठाच धोका होता. क्लार्कने किनाऱ्यावरच्या मर्फी व त्याच्या साथीदारांना संदेश दिला. होडीचे अवशेष आणि त्यातली कागदपत्रें, सोने इ. किनाऱ्याला लागतील ते त्वरित नष्ट करा.

पाणबुडी क्लार्कच्या यशस्वी कंपूला घेऊन निघाली. क्लार्कने एकेक क्षण महत्त्वाचा मानून, रेडिओ संदेशाचा धोका पत्करूनही जवळच्या ब्रिटिश तळाला संदेश पाठवून विमानाची मागणी केली. त्याला लवकरात लवकर लंडनला पोचायचे होते. दुपारी ३–२० ला आकाशात विमान दिसू लागले.

आफ्रिकेतील ही मोहीम संपली होती. पण त्या गुपीतावरून युद्धाचे रंग पालटणार होते. ' डी डे ' सफल होणार होता.

□ □ □

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलाची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का?



त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का ?

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. **निरोध** वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. **निरोध** हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रबरी संतति–प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे **निरोध** अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि **निरोध** का नाही वापरीत?

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

# निरोध

लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक

केमिस्ट, वाणी जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/460

 पृष्ठ ८ वरून

मर्यादित राहिले नाहीत तर क्यूबात कॅस्ट्रो व चे, व्हिएटनामचे चाचो हो व जनरल जियाप, फिलिपाइनमधील 'हूक' चळवळ, मलायामधील साम्यवादी लढा आणि अगदी अलीकडे सिलोनमध्ये भडकलेला असंतोषाचा वणवा (बंगला देशच्या गडबडीत त्याकडे आपले साफ दुर्लक्ष झाले आहे) यांच्या रूपाने ते निनादत राहिले आहेत. वरील सर्व चळवळी साम्यवादी होत्या. (क्यूबातील लढा प्रथम साम्यवादी नव्हता) म्हणून क्रांतिकारी गनिमी युद्ध म्हणजे साम्यवादी अस्त्रच असा जर निष्कर्ष कोणी काढेल तर त्याने अशा लढ्याचे नेतृत्व अखेर साम्यवाद्यांकडेच का जाते याचा डोळे उघडून व जमिनीवर पाय ठेवून विचार करणे जरूर आहे.

बहुतेक अविकसित देशांत लोकांचे साधारणत: दोन गट पडतात. एकीकडे मूठभर अतिश्रीमंत लोक तर दुसरीकडे भुके-कंगाल, पिडलेले-नाडलेले असंख्य लोक. अशा देशातील वकील, डॉक्टर्स, प्रोफेसर इ. चा मध्यमवर्ग राजकीय, वैचारिक व धार्मिक-सामाजिक भेदाभेदाने विदीर्ण झालेला असतो, त्यामुळे राजकीयदृष्ट्या विशेष प्रभावशाली असत नाही. देशातील तरुण वर्ग बेकारीने व निराशेने गांजलेला असतो व त्याला काहीतरी भव्य-दिव्य बदल व तोही तडकाफडकी पाहिजे असतो. आयुष्याच्या प्राथमिक गरजांना पारख्या झालेल्या उघड्या-नागड्या असंख्य माणसांना मध्यमवर्गीयांची लोकशाही-विचारस्वातंत्र्य-समाजवाद इ. उच्च तत्त्वे समजूच शकत नाहीत व जाणवतही नाहीत. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' ही श्रद्धा जोवर असते तोवर सर्व काही ठीक असते, पण थोडी राजकीय जाणीव आल्यावर वा जागवल्यावर हे असे कुठवर जाणार याचा विचार तोही करावयास लागतो व मनाच्या अशा अवस्थेत पाव-रोटी-निवारा यांचे साधेसरळ आश्वासन देणारे साम्यवादी त्याला स्वातंत्र्य-समता-बंधुभाव इ. उच्च तत्त्वांची आश्वासने देणाऱ्या लोकशाहीवाद्यांपेक्षा जास्त जवळचे वाटायला लागतात. इथे कोण बरोबर वा कोण चूक याचा प्रश्न नाही, तर प्रत्यक्षात काय घडते ती वस्तुस्थिती आहे. हा नंगा-भुका दुबळा माणूस एखाद्या 'वादा'ने झपाटला, की किती बलवान् व कडवा बनतो याचे दर्शन व्हिएटनामच्या रणांगणावर सर्व जगाला बघायला मिळाले आहे. जगातील नंबर एक सामर्थ्यवान अमेरिकन राष्ट्राच्या पराभवाचे धडगे व्हिएटनामच्या भूमीवर उभारले जात आहे. माणूस व त्याच्या श्रद्धा यांना कमी लेखून त्याच्याशी बंदुकीने लढायला गेलेल्या प्रत्येक राष्ट्राच्या नशिबी हेच दुर्दैव आलेले आहे. काही लष्करी अंमलदार क्रांतिकारी गनिमी युद्धाचा 'रानटी' व 'अगदीच प्राथमिक' (प्रिमिटिव्ह) म्हणून उपहास करताना आढळतात व शस्त्र-संभाराच्या दृष्टीने ते खरे असेलही, पण क्रांतिकारी गनिमी युद्धात खरे महत्त्व बंदुकीला नसून

ती धारण करणाऱ्या माणसाला आहे व कोणत्याही अत्याधुनिक मानव निर्मित यंत्र-शस्त्रापेक्षा स्वतः मानव हा जास्त बुद्धिमान, शक्तिमान व संवेदनाशील आहे हे इतिहासाने वेळोवेळी सिद्ध केले आहे.

माओला समजवून घेण्यात चूक करण्याचा मक्ता काही केवळ त्याच्या शत्रूंनीच घेतला नाही तर माओवादाचा टिळा लावलेल्या त्यांच्या भक्तांनी तर आणखीनच घोर अपराध केले आहेत. 'क्रांतिकारी गनिमी योद्धे व जनसमुदाय यांचा परस्पर संबंध समजावून सांगण्यासाठी माओने त्यांना समुद्र व मासे यांची समर्पक उपमा दिली आहे. तो म्हणतो, 'समुद्रात मासा जसा सहजतेने जीवन जगतो, तसे गनिमी योद्धयाने जनसागरात जीवन गुजारले पाहिजे.' याचा अर्थ त्याने जनसागराशी एकरूप झाले पाहिजे व त्याकडूनच अन्न-वस्त्र-निवारा-संरक्षण सर्व काही मिळवले पाहिजे. ही कल्पना आणखी स्पष्ट करताना त्याने लिहिले आहे, की 'सामाजिक राजकीय-आर्थिक उद्दिष्टांशिवाय क्रांतिकारी गनिमी युद्ध असूच शकत नाही व ते उद्दिष्ट जर जनसागराच्या आशा-आकांक्षात प्रतिबिंबित झाले नाही तर तरूच शकत नाही. पण इतके सरळ व स्पष्ट विचार समजावून न घेता साहसवाद वा दादागिरीच्याच आहारी जाऊन ज्यांनी चार-दोन जमीनदारांना मारण्याची व बॉंब फेकण्याची 'क्रांती' केली त्यांची स्थिती पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखी झाली. केवळ पश्चिम बंगाल, बिहार, आंध्र या भारतातील राज्यांमध्येच नव्हे तर मलाया, फिलिपीनीज् इ. ठिकाणी ही गनिमी चळवळ जेव्हाजेव्हा जनमानसाच्या आशीर्वादापासून व आकांक्षेपासून दूर सरकली तेव्हातेव्हा तडफडून मेली. पण 'साम्यवाद' काय किंवा इतर कोणताही 'वाद' काय याची खरी शोकांतिका हीच आहे, की जे खरोखरच काही विचार करू शकतात ते प्रत्यक्षात कृती काहीच करत नाहीत व जे कृती करायला उतावीळ झालेले असतात ते एकतर फारसा विचार करू शकत नाहीत वा भावनेच्या वेशीवर एकदम मूलभूत व दूरगामी विचारांचाच बळी देतात.

आजच्या 'भीती-समतोला'च्या (Balance of Terror) युगामध्ये छुप्या घातपाती युद्धांना व क्रांतिकारी गनिमी युद्धांना आणखी महत्त्व प्राप्त झाले आहे. युद्धानंतर आपल्याला पाहिजे तशी 'सुखदायी शांतता' (स्मशान शांतता नव्हे !) हाच प्रत्येक युद्धाचा अंतिम उद्देश असतो. (नसल्यास लोकशाही 'दोस्त राष्ट्रां'चे नशीब वाट्यास येते) त्यामुळ आज अण्वस्त्रांच्या जमान्यात, बड्या राष्ट्रांना त्यांच्या अण्वस्त्र सज्ज तलवारी नुसत्या उगारूनच ठेवाव्या लागतात, त्यानिशी प्रहार करता येत नाही. छुप्या घातपाती युद्धाबाबत त्या निरुपयोगी ठरतात. त्याच-प्रमाणे क्रांतिकारी गनिमी युद्धासारख्या सर्वस्वी वेगळ्या प्रकारच्या युद्धांचा प्रतिकार करायलाही त्या सर्वस्वी असमर्थ ठरतात. या संदर्भात क्रांतिकारी गनिमी युद्ध व अण्वस्त्रांच्या युद्धानंतर उपयोगात आणले जायचे चपळ-चिलखती दलाचे छुपे युद्ध

यातील फरक स्पष्ट करणे आवश्यक आहे. अण्वस्त्र युद्धातील पहिल्या आघात-प्रत्याघातातून शिल्लक राहिलेल्या नंदनवनावर राज्य करायला सुरक्षित-चपळ-चिलखती दल निर्माण करण्याचा पाश्चात्य राष्ट्रे विचार करीत आहेत. पण त्यांचे स्वरूप व उद्दिष्ट हे केवळ लष्करी डावपेच व गरज यांपुरतेच मर्यादित आहे. त्या फौजांनाही जरी 'गनिमी फौजा' म्हणून संबोधण्यात येत असले तरी त्यांच्या मर्यादा आपण लक्षात घेतल्या पाहिजेत व क्रांतिकारी गनिमी फौजांशी त्याचा घोटाळा करता कामा नये.

पारंपारिक गनिमी युद्ध व क्रांतिकारी गनिमी युद्ध यातील मूलभूत फरक आत्तापर्यंत आपण समजून घेतला. आता या संदर्भात मुक्ति-वाहिनीचे स्वरूप व कार्य, परवाच्या मुक्तिसंग्रामात तिच्या स्पष्ट झालेल्या मर्यादा, पण भविष्यात त्यातून होणारा स्फोट व त्याला तोंड देण्याची आपली तयारी इ. गोष्टींचा आपल्याला विचार करायचा आहे. ◻

२५ मार्चच्या रात्री पाकिस्तानी सेनेने सुरू केलेल्या हत्याकांडातून मुक्ति-फौजचा जन्म झाला व पाक फौजेच्या प्रत्येक जुलुमाबरोबर तिचा आकार वाढत गेला. म. गांधी व अहिंसा यांवर निष्ठा ठेवणारा शेखसाहेबांचा अवामी लीग पक्ष अशा लढाऊ फौजेचा अगोदर विचार करणे सर्वथैव अशक्य होते व असा विचार करणाऱ्या नेत्यांचा गट अवामी लीगच्या मानाने कमजोर होता. पण मानवतावादी व क्रांतिप्रिय शेखसाहेबांना अखेर 'बंदुकीच्या नळी'तूनच राजसत्ता मिळवावी लागली, अशी इतिहासाची साक्ष आहे. ही मानवतावाद्यांची वा शेख मुजीब यांची शोकांतिका नाही, तर आपल्या सुसंस्कृत मानवी जीवनाची शोकांतिका आहे. पण या अपूर्ण मानवांच्या अपूर्ण दुनियेत, हजारो लोकांच्या नियतीचा वाली म्हणून मुजीबसाहेबांनी सावध पावले योग्य वेळीच उचलायला पाहिजे होती असे दुर्दैवाने म्हणावे लागते.

'मुक्ति-फौजे'चा जन्म व कार्य याचे क. उस्मानी (आता सरसेनापती) यांनी केलेले विवेचन उद्बोधक आहे. ते म्हणतात, '२५ मार्चच्या पाकिस्तानी सेनेच्या अघोर कर्मातूनच एका रात्रीत 'मुक्ति-फौजे'चा जन्म झाला. त्याअगोदर अशी फौज निर्माण करण्याचा विचारही कधी आमच्या मनाला शिवला नव्हता. याउलट ब्रिटिश परंपरेत वाढलेला एक सेनाधिकारी या संस्कारामुळे सैनिकाने राजकारणापासून दूर राहिले पाहिजे, असे माझे ठाम मत होते. पण साधारण १९ मार्चच्या सुमारास पाक फौजांच्या कुटिल बेतांचा आम्हाला सुगावा लागला व त्यानुसार शेखसाहेबांनी मला वरिष्ठ बंगाली अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याची सूचना केली. त्याप्रमाणे लष्करातल्या विश्वासू बंगाली अधिकाऱ्यांना व सैनिकांना मी एक गुप्त

परिपत्रक पाठवले व त्यांत मुख्य तीन मुद्दे अगदी स्पष्ट केले :

१. स्वतःहून राजकारणाच्या भानगडीत पडू नका.

२. तुम्हाला निःशस्त्र करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला विरोध करा.

३. तुमच्यावर जर कोणी हात उगारला, तर त्याला चांगला तडाखा हाणा.

पाकिस्तानी फौजेने आपले लक्ष्य निवडक राजकीय नेत्यांपुरतेच मर्यादित ठेवले असते, तर लष्कर व पोलिसांतले आमचे लोक तटस्थ राहिले असते. पण त्यांनी बंगाली विद्वत्जनांवर आणि आमच्या सहकाऱ्यांवर जेव्हा हात उगारला, तेव्हा मात्र आम्ही बंड करून उठलो.'

वरील माहितीवरून एक गोष्ट स्पष्ट होईल, की २५ मार्चच्या रात्री उत्स्फूर्तपणे 'फौजे'चा जन्म झाला व पाक फौजांशी लढायची काहीही प्रभावी योजना 'अवामी लीग'कडे तयार नव्हती. मुख्य म्हणजे स्वतःवर घाला येईपर्यंत लष्करातले व पोलिसातले बंगाली लोक लढाईला तयार नव्हते.

मुक्ति-फौजेच्या एकूण संख्याबळाचा बरोबर आकडा सांगणे जरी कठीण असले, तरी सुरुवातीच्या १० हजार सैनिकांपासून ते डिसेंबरच्या अखेरीस एक लाख पन्नास हजार इतका तो फुगत गेला, असा एक अंदाज आहे. फौजेत सामान्यतः तीन प्रमुख गट होते.

१. राजकीय नेतृत्व पुरविणाऱ्या अवामी लीगमधील वयस्कर लोकांचा गट.

२. एकेकाळच्या पूर्व पाकिस्तान रेजिमेंट, पूर्व पाकिस्तान रायफल्स, पोलीस, अन्सार, मुजाहिद यांतील सैनिकांचा लढाऊ गट, पाक फौजांचे अत्याचार व पश्चिमी पाक अधिकाऱ्यांची वागणूक, बदली इ. बाबतींत त्यांच्याशी केलेला पक्षपात हे त्यांच्या क्रोधाचे मुख्य कारण होते. हा गट फौजेचा लढाऊ कणा होता.

३. शाळा-कॉलेजातील तरुणांचा गट—(काही तरुणींनीही त्यात भाग घेतला.) हा गट राजकीय दृष्टया जास्त जागृत होता. पेकिंगवादी मौलाना भशानी व मास्कोवादी मुझफ्फर यांचे अनुयायी व निरनिराळ्या संघटनेतील कामगार यांचाही या गटात समावेश होता.

तरफेल अहमद व फजलुल हक चौधरी यांच्या प्रभावाखालील विद्यार्थ्यांचा 'मुजिब—वाहिनी' हा गट नंतर उजेडात आला. मुक्ति-फौजेत सुरुवातीला एकही हिंदू लढवय्या नव्हता, पण आस्ते-आस्ते तीन हजार हिंदूंनी फौजेत प्रवेश केला.

'मुक्ति-वाहिनी'च्या ('फौज' हा शब्द उर्दू असल्याने पुढे तो बदलून सर्वव्यापी 'मुक्ति-वाहिनी' हे नवे नाव घेण्यात आले.) वरील संघटनेकडे दृष्टी टाकली असता एक गोष्ट लक्षात येईल, की त्यांतील सैनिक देशप्रेमाने व सूडाच्या भावनेने कितीही भारले गेले असले, तरी स्वातंत्र्योत्तर काळातील नव्या मनूचा त्यांच्यामधील फारच थोड्या लोकांनी विचार केला होता. शिवाय आजही अवामी लीगने जरी 'निधर्मी लोकशाही समाजवादा'चा वसा घेतला असला, तरी या तिन्ही शब्दांचा

'वाहिनी 'मधील बऱ्याच जणांना एक तर पत्तापण नाही वा त्याबद्दल त्यांच्या फारच रोमांचक व अवास्तव कल्पना आहेत.

'वाहिनी 'च्या सैनिकांचे शिक्षण बंगला देशच्या सीमेवरील तळांपासून ते डेहराडूनपर्यंतच्या निरनिराळ्या शिक्षण केंद्रांवर पार पडले व हे उघड गुपित आपल्या संरक्षणमंत्र्यांनीही जाहीरपणे कबूल केले आहे. साधारणत: तीन आठवडे ते सहा महिन्यांपर्यंतच्या शिक्षणकाळांत सैनिकांना त्यांच्या लायकीप्रमाणे व आवडी-प्रमाणे शिक्षण मिळाले. त्यात घातपात करण्यापासून ते मुख्य माहिती भारतीय लष्करी केंद्रांना पुरविण्यापर्यंतच्या निरनिराळ्या गोष्टींचा समावेश होता. त्यांच्या लढण्याच्या व सूडाच्या भावनेला पाक फौजेने आयतेच भरपूर खाद्य पुरविले होते. पुढे त्यांनी केलेल्या कामगिरीचा आढावा घेण्यापूर्वी 'वाहिनी 'च्या प्रतिकाराची सुरुवात कशी झाली हे कर्नल उस्मानींच्याच शब्दांत ऐकण्यासारखे आहे...' मुक्ती-संग्रामाच्या प्रारंभकाळात आम्ही आमच्या सैनिकांना पारंपारिक युद्धाचेच शिक्षण दिले व पारंपारिक स्वरूपाच्याच लढाया दिल्या. जगतिक लोकमत व बलशाली राष्ट्रे आमच्या मदतीस धावून येऊन ही असमान लढाई थांबवतील अशी आशा आम्हाला होती. पण ती आशा व्यर्थ ठरली. आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज अशी साडे-चार डिव्हिजन सेना (८०,०००) पाकिस्तानने आमच्या विरुद्ध लढाईत ओतली. पण मे महिन्यानंतर मात्र आम्ही आमच्या फौजा सर्वत्र विखरून टाकल्या व छुपे हल्ले करावयास सुरुवात केली. प्रमुख शहरी भाग सोडून इतर ठिकाणी सर्वत्र रात्री आमचेच राज्य सुरू झाले.'

## वेडे साहस

याचा अर्थ असा, की जागतिक लोकमताच्या व बड्या राष्ट्राच्या खोट्या आशेवर राहून कर्नल उस्मानी यांनी बलशाली पाक फौजेविरुद्ध खुली लढाई दिली व हाराकिरी पत्करली. लढाई देण्याची काही एक प्रभावी योजना वा शिक्षण 'वाहिनी 'कडे नसताना कर्नल उस्मानी यांनी हे वेडे साहस का केले तेच समजत नाही. (कदाचित् एक 'लष्करी' अधिकारी म्हणून त्यांना तेवढाच एक मार्ग सुचला असेल.) मार्च–एप्रिलच्या काळात पाक फौजा सर्वत्र सपाटून मार खात असल्याच्या अतिरंजित कहाण्या आपल्याकडे प्रसृत झाल्या होत्या, पण वर्षाकालाला आरंभ होण्यापूर्वी पाक फौजांनी सर्व देशभर अंमल बसविल्याचे कटु सत्य आपल्याला गिळावे लागते याचे इंगित इथेच आहे. नंतरच्या काळात पाक फौजांना मोठ्या प्रमाणावर गुंतवून ठेवणे व दूरवरून रसद पुरवठा होणाऱ्या पाक सेनेच्या युद्ध साहित्याचा नाश करणे ही 'वाहिनी 'ची प्रमुख उद्दिष्टे असावयास पाहिजे होती. पण ती त्यांनी मोठ्या प्रमाणात पूर्ण केल्याचे पुरावे माझ्या पहाण्यात नाहीत. याउलट गस्त घालणाऱ्या पाक सैनिकांच्या व रझाकारांच्या तुकड्यांनाच त्यांनी प्रमुख लक्ष्य बनविले.

सप्टेंबर अखेरपर्यंत पंचवीस हजार पाक सैनिकांना कंठस्नान घातल्याचा व एकवीस बोटी, सहाशे छोटे-मोठे पूल इ. चा नाश केल्याचा दावा कर्नल उस्मानी यांनी केला आहे. पण दिल्लीच्या 'दि इन्स्टिटयूट फॉर डीफेन्स स्टडीज ॲण्ड अनॅलिसिस' या संस्थेने मिळविलेल्या माहितीनुसार वरील काळात बांगला देशमध्ये ठार मारण्यात आलेल्या पाक सैनिकांची संख्या अवघी सहा हजार आहे. ब्रिटिश तेलवाहू जहाज 'टिव्होट बँक' वा दहा हजार टनी जहाज 'चकदीना' यांना 'वाहिनी'च्या सोजिरांनी जबरदस्त तडाखे मारल्याची गोष्ट जरी खरी असली तरी 'वाहिनी'चा एकूण दावा मान्य करणे कठीणच जाते. प्रसिद्ध युद्ध वार्ताहर श्रीमती क्लेरा हॅलिंगवर्थ यांचेही असेच मत आहे. भारतीय सैनिक व 'वाहिनी'च्या सैनिकांशी केलेल्या चर्चेवरून मलापण ही गोष्ट स्पष्ट जाणवली.

मुक्ति-वाहिनीला कमी लेखण्याचा माझा अजिबात उद्देश नाही. आपल्या दैदिप्यमान विजयात 'वाहिनी'ने आपल्याला बहुमोलाची मदत केली आहे. आपल्या सेनेच्या 'नेत्र व श्रवणेंद्रियाचे' महत्त्वाचे काम तिने बजाविले याची मला जाणीव आहे. पण तिच्या लढाईचे स्वरूप स्पष्ट करणे जरूर आहे. 'वाहिनी'च्या शूर-वीर सैनिकांना हीन लेखण्याचा माझा हेतू नाही, तर शाळा-कॉलेजातील माझ्या या दोस्तांनी जिवावर उदार होऊन दिलेल्या लढायाच्या कहाण्या मी प्रत्यक्ष ऐकल्या आहेत. त्यात त्यांनी झेललेले वार या डोळ्यांनी पाहिले आहेत. माझ्या बांगला देशच्या सफरीत त्यांचाच आतिथी बनून त्यांच्या प्रेमळ पाहूणचाराचा मी अनुभव घेतला आहे. म्हणूनच आत्ता 'गनिमी युद्धा'च्या मर्यादित चौकटीत लढलेले हे जागृत शूर-वीर उद्या ही चौकट तोडून-मोडून 'क्रांतिकारी गनिमी युद्धाच्या' झेंडयाखाली माझ्यासमोर कोणत्या नात्याने उभे रहातील याची मला काळजी वाटते. ◻

आज 'बांगला देश'वर स्वातंत्र्याची पहाट उमलली आहे. जुलुमांची व अगतिकतेची अंधेरी रात संपून आशेचे सोनेरी दूत चमकू लागले आहेत. स्वाधीन बांगला देशमधील प्रत्येकाला समर्थ-संपन्न 'सोनार बंगला'ची स्वप्ने पडू लागली आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काही गुलाबी पहाटे आपल्याला पण ती पडली होती. (असं म्हणतात!) पण स्वप्न ते स्वप्नच! वास्तवाचा स्पर्श होताच त्याचे तुकडे-तुकडे उडतात. निदान आशिया–आफ्रिकेतील नव-स्वतंत्र राष्ट्रातल्या नव्वद टक्के गोर-गरीबांचा तसा अनुभव आहे.

बांगला देशमधील जनतेच्या मनात व मुक्ति-संग्रामात लढलेल्या तरुण वर्गाच्या हृदयात आशा-आकांक्षाची एक प्रचंड लाट फुटली आहे व 'रामराज्याचा' (पाहिजे तर 'रहीम' राज्याचा म्हणू) किनारा काही दशकांच्या नाही, तर काही वर्षांच्या अवधीत गाठण्याची भाषा तेथील प्रत्येकाने माझ्याजवळ बोलून दाखविली. पण

आज बांगला देशपुढे असंख्य प्रश्न उभे आहेत. नैसर्गिक साधनसामग्रीचे वरदान लाभलेल्या या देशाला यंत्र-सामग्रीच्या अभावाचा शाप लाभलेला आहे. मुख्यतः उच्च प्रशासकीय व औद्योगिक व्यवस्थापनाचा अनुभव असलेली फार थोडी तज्ज्ञ मंडळी उरली आहेत आणि याचा उत्पादनावर निश्चित परिणाम होणार आहे.

पण गोर-गरीबांचे प्रश्न केवळ कमी उत्पादनाच्याच पातळीवर थांबणार नाहीत, व ते कधी थांबतही नाहीत. मुख्यतः वितरणाच्या प्रश्नाभोवती ते केंद्रीभूत होतात आणि इथे देशाची कसोटी लागते. 'पुरेशी रोटी तयार होऊ द्या, मग तुम्हाला भरपेट खायला घालू' असा गोड घास, प्रत्येक अविकसित देशातील मूठभर लोक ढीगभर लोकांना भरवत असतात. रोटीचा वाढता आकार टिचभर लोकांच्या वाढत्या पोटामध्येच समावून जातो व आश्वासनांच्या मृगजळामागे भोळी-भाबडी जनता निवडणुकांमागून-निवडणुकांमागे धावत असते. पण सहनशीलतेलाही मर्यादा असतात. 'मर्यादा पुरुषोत्तम' सागराने एकदा मर्यादा ओलांडली, की तो बेफाम बनतो. त्याचप्रमाणे जनसागराने सहनशीलतेची सीमा एकदा ओलांडली, की ते तुफान सर्व काही गिळंकृत करत सुटते. पण तोपर्यंत वरून शांत दिसणाऱ्या जन-सागराच्या पोटातील वादळाची कोणाला कल्पनाही येत नाही!

## धूसर भविष्यकाल

बंगला देशाच्या सुदैवाने व केवळ तकदीरच्या करामतीने आज शेख मुजीब परत आले आहेत. शेख साहेब अतिशय थोर आहेत, लोकप्रिय आहेत. पण ते काही परमेश्वर नव्हेत किंवा त्यांच्याकडे अल्लाउद्दीनचा जादूई चिराग नाही. आजवरच्या आंदोलनात बिनीवर लढलेला 'आवामी लीग' हा पक्ष काही एकसंघ विचारांचा व आचारांचा मजबूत पक्ष नव्हे. स्वातंत्र्य प्राप्तीकरता झटलेल्या आपल्या काँग्रेस-सारखीच ती एक आघाडी आहे व 'समाजवादाचे' तप आरंभलेल्या सच्च्या साधु-पेक्षा, समाजवादाची माळ ओढणाऱ्या ढोंगी बगळ्यांचाच त्यात भरणा असल्याचा जास्त संभव आहे. आज त्यातील प्रत्येकजण देशप्रेमाने लोकहिताच्या प्रेमाने निःसंशय भारावला आहे, पण असल्या खुळचट कल्पना स्वार्थाच्या खडकावर सहजासहजी फुटतात असा आजवरचा इतिहास आहे. खुद्द 'बंगला देश'मध्ये मोठे भांडवलदार नसल्याने तिथे 'समाजवादी अर्थकारण' करणे सोपे जाईल असा युक्तिवाद काहीजण करतात, पण छोट्या व्यापाऱ्यांचा व हितसंबंधियांचा मोठा वर्ग त्याला छुपा विरोध केल्याशिवाय रहाणार नाही. त्यातून 'आवामी लीग' हा प्रामुख्याने 'मध्यमवर्गीयांचे नेतृत्व व प्रभाव' असलेला राजकीय पक्ष आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. सत्तारूढ पक्षाचे लोक दीर्घकाळपर्यंत राष्ट्रीय पाव-रोटीतील किती हिस्सा गोरगरीबांना निस्वार्थीपणे वाटून देतील व आशा-आकांक्षा उंचावलेला गरीब वर्ग व राजकीय दृष्ट्या जागृत असलेला तरुण वर्ग किती धीर धरेल हा यक्षप्रश्न आहे आणि माझ्या दृष्टीने त्याचे उत्तर निराशजनक आहे.

६ मे १९७२

प्रत्यक्ष संग्रामाच्यावेळी अंग चोरून सुरक्षित स्थळी राहिलेल्या व उपदेशाच्या चार गोष्टी सांगणाऱ्या काही देशभक्तांच्या बद्दल आजच विद्यार्थिवर्गात राग आहे. शेख मुजीब विद्यार्थ्यांना जानसे भी जादा प्यारे आहेत पण अखेर तेही माणूसच आहेत. राजकीय दृष्टया जागृत विद्यार्थी वर्ग व आशेच्या मेघाकडे डोळे लावून बसलेला गोर गरीब वर्ग आजतरी फक्त 'मुजीबवादाचीच (मुजीविझम) भाषा बोलत असला, तरी उद्याची भव्य-दिव्य स्वप्न लवकर साकार झाली नाहीत वा आशेचा मेघ बोळंवला नाही, तर दिसेल तो 'वाद' स्वीकारेल. लोकशाही, साम्यवाद इ. च्या गुणावगुणांची बौद्धिक चर्चा आपण करत बसतो. पण तहानेने व्याकुळ झालेला व तापलेला माणूस मिळेल ते पाणी प्राशन करतो. मग ते 'मानस सरोवरातील' असो वा डबक्यातील असो. बंगला देशमध्ये तेच होईल. शिवाय विफलतेने ग्रासलेल्या लोकांच्या असंतोषात ठिणगी टाकायला चीन सारखा 'मुक्तिदाता' दारात उभा आहेच. मग मात्र असंतोषाची ही लाट 'गनिमी युद्धाच्या' सीमेपुरतीच मर्यादित रहाणार नाही ती 'क्रांतिकारी गनिमी युद्धाचे' स्वरूप घेऊन सर्व 'बंगला देश' ग्रासून टाकेल. बंगला देशमधील प्रत्येक जीवन-प्रवाह व्यापून टाकेल, इतकेच नव्हे तर उधळलेली ही तुफानी लाट, गंगा-यमुना-ब्रह्मपुत्रेच्या पात्रातून उलटी येऊन सर्व पूर्व भारतात पसरेल. आज भारतात दारिद्र्याची व जुलुमाची तापलेली वाफ लोकशाहीच्या सुरक्षित झडपांमधून (सेफ्टीव्हॉल्व्हज) जरी बाहेर पडत असली तरी फक्त वाफ जाऊ देणारी पण वाढती गरीबी व बेकारी कायम करणारी लोकशाही यंत्रणा त्यात कोलमडून पडल्याशिवाय रहाणार नाही.

बंगला देशात व पर्यायाने पूर्व भारतात अशी असंतोषाची आग पसरू नये अशी आपल्या प्रत्येकाचीच इच्छा आहे, पण आपल्या स्वार्थाचे तेल टाकून आपण ती भडकवणार आहोत. ती आग पेटूच नये याकरिता लागणारी असीम निष्ठा व त्याग आपल्यापाशी नाही, पण ती आग काबूत आणणारी यंत्रणा तरी आपल्या-


# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

मूल्य : रुपये अठरा

राजहंस प्रकाशन, पुणे

पाशी कुठे आहे ? आपली सेनादले व पोलीसदले पारंपारिक युद्धात तरबेज असली तरी हजार जिभांनी लवलवणाऱ्या या वणव्याचा ते व लोकशाही सरकार मुकाबला शकतील का ? निदान आज तरी त्याचा प्रत्यय येत नाही. तेलंगण, आंध्र, पश्चिम बंगाल, बिहार इ. ठिकाणी मूठभर नक्षलवाद्यांनी जनमानसावर आपला प्रभाव न बसवता, आततायीपणा करून आपल्या पायावर धोंडा पाडून घेतल्याने सैन्यदले व पोलिसदले यांची झाकली मूठ सव्वा लाखाची राहिली. एरवी वरील ठिकाणी व परवा महाराष्ट्रात शहादे व तळोदे या ठिकाणी त्यांनी परिस्थिती ज्या रितीने हाताळली, त्यावरून अशा तऱ्हेचे लढे काबूत आणण्याची त्यांची लायकी सिद्ध होत नाही. अर्थात 'क्रांतिकारी गनिमी युद्ध' व ते निर्माण करणारी स्फोटक परिस्थिती याचीच जर माहिती त्यांना नसेल, तर त्याविरुद्ध ते लढणार काय ? लोकशाही सरकारांनी परिस्थितीने गांजलेल्या लोकांच्या जखमेवर फुंकर न घालता त्यांच्यावर सैन्य व पोलीसदळे यांचे मीठच जर चोळले तर त्यातून जखम बरी होणार की चिघळणार ? संसदीय लोकशाही व समाजवाद यांना जीवनमूल्ये मानणाऱ्या लोकांना भविष्याच्या पोटातील काळ्याकुट्ट अंधाराची जाणीव आहे काय ? रात्री नंतर पहाट फुटते हे जितके खरे आहे, तितकेच पहाटेनंतर रात्रही येते हेही खरे आहे.

पूर्णत्वाला कधीच न पोचलेल्या व खऱ्या अर्थाने क्रांतिकारी गनिमी युद्धात परिणत न झालेल्या, मलायातील पाच हजार साम्यवादी गनिमांचा बंदोबस्त करण्यासाठी ब्रिटिश-मलाया इ. चा अडीच लाख फौजफाटा सतत आठ वर्षे अहोरात्र धडपडत होता. प्रत्येक गनीम मारण्यासाठी सरासरी तीस हजार पौंडाची प्रचंड किंमत मोजत होता. आपल्याला हा खर्च परवडणार आहे काय ? क्रांतिकारी गनिमी युद्धाचे दुःख व स्वरूप समजून न घेता आपणही तहान लागल्यावर विहीर खणायला सुरवात करून शेवटी आगीत भस्मसात होणार आहोत काय ?

म्हणनच प्रसिद्ध इंग्लिश लष्करी टीकाकार कॅ. लिडेल हार्ट याने बजावून सांगितले आहे :

If you wish for peace understand war, particularly the guerrilla & subversive forms of war.'



सर्व पढिक तत्वज्ञान जीवनातील समर प्रसंगाना स्वत्वाचे भान ठेवून तोंड देण्याला पुरेसे नाही. अशा वेळी कलाकाराच्या जीवनाकडे पाहून वाटू लागते की सामाजिक तत्वनिष्ठांची पोथी पुराणे न मानताही उमर खय्यामप्रमाणे तो जीवनाचा संप्रदायविहीन पुजारी बनू शकतो. जागीरदारांच्या निवेदनातून मधून मधून हळूच डोकावणारा हा उमर खय्याम मोठा विलोभनीय आहे.

अच्युतराव पटवर्धन

# संध्याकाळ

एक
वेधक
आत्मकथन

गजानन
जागीरदार

राजहंस
प्रकाशन

मूल्य
दहा रुपये

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649



"सध्याच्या विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीचा विचार करून प्रश्नपत्रिकेच्या शेवटी मी एक सूचना टाकली आहे, 'वरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शेजारचा विद्यार्थी लिहिल तशी लिहा.' "